
डिसेंबर २०१७/पाने ६८/किंमत ₹१०

# लोकराज्य



## महापरिनिर्वाण दिनविशेष




## विदर्भ : सुंदर, समृद्ध आणि स्मार्ट




महाराष्ट्र शासनाने ‘महालाभार्थी’ या वेबपोर्टलची निर्मिती करून नागरिकांच्या हितासाठी एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. विद्यार्थी, महिला, शेतकरी, सैनिक, बेरोजगार, छोटे उद्योजक, अल्पसंख्यांक अशा सर्व नागरिकांसाठी राबविल्या जाणाऱ्या शासनाच्या २२९ हून अधिक कल्याणकारी योजनांपैकी स्वतःला लागू पडणाऱ्या निवडक योजनांची व्यक्तिअनुरुप (**Personalized**) माहिती पोहोचविण्यासाठीचा एक महाप्रयत्न म्हणजे ‘महालाभार्थी’ पोर्टल.

## महालाभार्थी सेवेचा लाभ कसा घेता येईल?

cmo.maharashtra.gov.in या वेब पोर्टलला भेट द्या. महालाभार्थी लोगोवर क्लिक करा



१ मोबाईल क्रमांकवापरून ’महालाभार्थी ’ पोर्टलवर नोंदणी करा.

२ लॉगीन आईडी अणि पासवर्ड वापरून लॉगीन करा.

३ आपली प्राथमिक माहिती भरा.

४ आपली शैक्षणिक माहिती भरा.

५ भूमिका निवडा जसे: शेतकरी/विद्यार्थी इत्यादी.

६ विविध योजनांच्या दर्शवलेल्या लाभांपैकी आपल्या आवडीनुसार योजना निवडा.

७ आपण निवडलेल्या योजनांनुसार, आपली संपूर्ण माहिती भरा.

८ आपली पात्रता तपासण्या-साठी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.

९ आपल्याला, आपण पात्र असलेल्या योजना, शासन निर्णय (GRs) आणि अर्ज यांची यादी दर्शवली जाईल..

१० संपूर्ण माहिती छापील स्वरुपात (प्रिंटआउट) काढून घ्या.

अनेक वर्षांपासूनची तक्रार होती की सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोचत नाही आणि त्यावरच उपाय म्हणून सुरु करण्यात आलेला महालाभार्थी हा असा प्लटफॉर्म आहे जो निश्चितपणे महाराष्ट्रातील कुठल्याही व्यक्तीला शासनाच्या कुठल्याही योजनेचा फायदा मिळवून देईल. आपले सरकार सेवा केंद्र, एमएस-सीआयटी प्रशिक्षण केंद्र आणि मोबाईल ह्या तिन्ही माध्यमांतून प्रत्येक व्यक्तीने महालाभार्थींचा वापर करावा आणि योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.


देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**cmo.maharashtra.gov.in** या वेबसाईटचा वापर तुमच्या कंप्यूटर, लॅपटॉप, मोबाईल किंवा टॅबवरही करता येईल. तसेच आपल्या नजीकच्या **MS-CIT** केंद्रातही ही सेवा उपलब्ध आहे.

---

तुमच्या सर्जनशीलतेची जोड द्या, नावीन्यपूर्ण महाराष्ट्राचे साक्षीदार व्हा !

माझा महाराष्ट्र माझे सरकार | my GOV मेरी सरकार



महाराष्ट्र शासन | MSSDS

# महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी

बोधचिन्ह रेखाटन स्पर्धा:
**रु. ५०,०००**
चे रोख बक्षीस

घोषवाक्य स्पर्धा:
**रु. ५०,०००**
चे रोख बक्षीस

## 'बोधचिन्ह रेखाटन आणि घोषवाक्य सुचवा'

स्पर्धेत भाग घ्या आणि जिंका रोख बक्षिसे



भाग घेण्यासाठी
भेट द्या: www.maharashtra.mygov.in

स्पर्धेची अंतिम तारीख: २० डिसेंबर २०१७

# अंतरंग



**महापरिनिर्वाण दिन विशेष**

**५ – १८**

- भीम धनूचे सप्तरंग
- तात्त्विक अधिष्ठान
- ....आणि शिष्यवृत्ती सुरू झाली
- हैदराबादाचा लढा आणि डॉ. आंबेडकर
- बाबासाहेबांचे पुतळे
- महापरिनिर्वाण दिन कसा पाळावा?



**'इंडियाज् हार्ट, नागपूर स्मार्ट'** १९

'इंडियाज् हार्ट, नागपूर स्मार्ट' असे ब्रीद घेऊन महाराष्ट्राच्या उपराजधानीची अर्थात नागपूर शहराची वाटचाल 'स्मार्ट सिटी'च्या दिशेने सुरू झाली आहे. त्यामुळे केवळ राज्याचे नव्हे तर देशाचे लक्ष भविष्यातील 'स्मार्ट सिटी' म्हणून नागपूरकडे लागले आहे.

**प्रारंभ नव्या युगाचा...** २४

३० सप्टेंबर २०१७ हा दसऱ्याचा दिवस नागपूरच्या इतिहासाला वेगवान वर्तमानाची जोड देणारा ठरला. नागपूरची 'माझी मेट्रो' धावू लागली. शहराचे चित्र बदलणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, केवळ २७ महिन्यांत साडेपाच कि.मी.च्या ट्रायल रनला सुरुवात झाली आहे.

**आयटी@नागपूर** ३२

संसाधन संपन्न असलेले नागपूर माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी पुढे सरसावले आहे. नागपूर आणि आसपासच्या भागात माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित अनेक कंपन्या स्थापन झाल्या आहेत. गेल्या काही काळात माहिती तंत्रज्ञानातील उद्योजकता वाढलेली आहे.




| | |
|---|---|
| 'इंडियाज् हार्ट, नागपूर स्मार्ट' | १९ |
| प्रारंभ नव्या युगाचा... | २४ |
| आर्थिक स्वयंपूर्णतेकडे | २८ |
| समृद्ध शैक्षणिक केंद्र | ३० |
| आयटी@नागपूर | ३२ |
| अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांची नगरी | ३६ |
| तृप्त करणारी भूमी | ३८ |
| भारनियमनमुक्तीचे यश | ४६ |
| गोसीखुर्द झाले गतिमान | ४८ |
| मासे पिकवा, समृद्ध व्हा... | ५० |
| आता मिटेल पाणीटंचाई | ५२ |
| शेतकऱ्यांना वरदान | ५५ |
| प्रेरणादायी प्रयोग | ५६ |
| खनिज संपत्तीची श्रीमंती... | ६० |
| रम्य आठवणी | ६२ |
| सहजसाध्य मुक्ती | ६६ |


**अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांची नगरी** ३६

विदर्भाचेच नव्हे तर मध्य भारताचे 'मेडिकल हब' म्हणून नागपूरची नवी ओळख निर्माण झाली आहे. 'मेडिकल हब' म्हणजे असे वैद्यकीय केंद्र, की जिथे अत्यंत अद्ययावत सोयीसुविधांनी सुसज्ज अशी रुग्णालये असतात.

**तृप्त करणारी भूमी** ३८



विदर्भाची भूमी पर्यटकांना तृप्त करून टाकणारी आहे. व्याघ्र प्रकल्पांसोबतच नैसर्गिक, ऐतिहासिक, धार्मिक व सामाजिक स्थळांचा मोठा वारसा या भूमिला लाभला आहे.

**आता मिटेल पाणीटंचाई** ५२

महाराष्ट्रात पावसाची अनियमितता आणि पडलेल्या पाण्याच्या योग्य नियोजनाअभावी बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. यावर रचनात्मक उपाययोजना म्हणून जलयुक्त शिवार अभियान प्रभावीपणे राबवण्यात आले.



**प्रेरणादायी प्रयोग** ५६

विदर्भाच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये प्रशासनामार्फत नवनवे प्रयोग राबवण्यात येत आहेत. यामुळे प्रशासनात गतिमानता आणि पारदर्शकता आली आहे. याचा नागरिकांना मोठा फायदा होत आहे.

**खनिज संपत्तीची श्रीमंती...** ६०

महाराष्ट्र नररत्नांची खाण आहे. तशी ती उत्तम खनिज संपदेची भूमी आहे. उद्योग जगताच्या मागणीनुरूप लागणारी इतर अनेक खनिजे विदर्भात मोठ्या प्रमाणात आढळतात.



वर्ष ६९ वे | अंक ६ | डिसेंबर २०१७

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

**संपादन**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर

**प्रशासन**

- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ

**मांडणी**

- मुखपृष्ठ — सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

**पत्ता**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

**वितरण आणि वर्गणीदार**

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

संपादकीय

# महामानवास विनम्र अभिवादन

६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन आहे. यादिनानिमित्त आम्ही डिसेंबर लोकराज्यच्या अंकात ज्येष्ठ विचारवंत व लेखक प्रा. दत्ता भगत, डॉ. कमल गवई, नागसेन कांबळे, कृष्णा इंगळे यांच्या लेखांची विशेष पुरवणी समाविष्ट केली आहे. डॉ. आंबेडकरांचे विचार आपणास सदैव प्रेरणा देणारे व जीवनात उत्तुंग प्रगती साध्य करण्यासाठी दिशादर्शक ठरणारे आहेत. या दिनानिमित्त लोकराज्यचे या महामानवास विनम्र अभिवादन!

डिसेंबर महिन्यात महाराष्ट्राच्या उपराजधानीत विधिमंडळाचे अधिवेशन भरते. हे अधिवेशन हिवाळी अधिवेशन म्हणून ओळखले जाते. या अधिवेशन काळात विदर्भाच्या विविध प्रश्नांविषयी सभागृहात चर्चा केली जाते. अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. विकासाचे प्रश्न मार्गी लागतात. विदर्भाच्या नागरिकांसाठी हे अधिवेशन म्हणूनच जिव्हाळ्याचे ठरत आले आहे.

या अधिवेशनाच्या निमित्त हा अंक आम्ही विदर्भ विकास विशेषांक म्हणून प्रकाशित करत आहोत. या अंकात गेल्या तीन वर्षात विदर्भामध्ये जी विकासकामे झाली आहेत त्याचा आढावा घेतला आहे. नागपूर शहराने गेल्या तीन वर्षात उंच अशी झेप घेतली आहे. 'माझी मेट्रो'चे काम झपाट्याने पूर्ण होत आहे. मिहानच्या कामाला गती आली आहे. माहिती तंत्रज्ञान, वस्त्रोद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग असे विविध उद्योग या भागात येत आहेत. त्यामुळे रोजगार आणि स्वंयरोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, इंडियन इंस्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी अशा राष्ट्रीय दर्जाच्या शिक्षणसंस्था नागपुरात सुरू झाल्याने हे शहर महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र म्हणून उदयास आले आहे. ऑल इंडिया इंस्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स ही संस्थाही २०१८ पर्यंत सुरू होणार आहे. नागपूरमध्ये अत्याधुनिक सुविधांनी युक्त अशा वैद्यकीय सेवासुविधा देणारी रुग्णालये सुरू झाली आहेत. त्यामुळे विदर्भ आणि मध्य भारतातील रुग्णांची फार मोठी सोय झाली आहे. या विषयांवरील लेखांसह, गोसीखुर्द प्रकल्प, जलयुक्त शिवारचे यश, कृषी पंपांना वीज पुरवठा आणि विविध जिल्ह्यातील नव्या उपक्रमांचा आढावाही या अंकात घेतला आहे. महत्त्वाच्या वैशिष्ट्यांमध्ये महाराष्ट्र टाइम्सच्या नागपूर आवृत्तीचे संपादक श्रीपाद अपराजित यांनी विदर्भातील बहुविध पर्यटन स्थळांचे अतिशय रम्य शब्दात केलेले वर्णन, याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांच्या ओघवत्या शैलीतून ही पर्यटनस्थळे त्यांच्या सौंदर्यासह आपल्या नजरेसमोर उभी राहतात.




हा अंक आपणास आवडेल, असा विश्वास आहे.

**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**



# भीम धनूचे सप्तरंग

**कुसुमाग्रज (वि.वा.शिरवाडकर)**

अस्पृश्यता म्हणजे माणसाला जनावरापेक्षाही
हीन आणि अन्याय जीवन
बांधून देण्याचा एक अघोरी प्रयोग. माणसाचे
मन मारणे, त्या किळसवाण्या नरकाचा
रहिवास तो स्वेच्छेने पत्करील अशी
शरणवृत्ती त्यांच्या ठिकाणी उत्पन्न करणे,
निर्वाहाच्या दरवाजांवर जागोजाग
निषेध नियमांचे पहारे बसवून त्याला
अगतिक व अभिमान शून्य करणे,
अन्यायांनी करकचून बांधल्यावर
अधूनमधून ह्या दातृत्वाचे खरकटे त्यांच्या
अंगावर फेकून त्याला कृतज्ञ करू पाहणे
इ. तंत्रांचा अवलंब केल्याने हा प्रयोग
कमालीचा यशस्वी झाला होता. या
व्यवस्थेचा तिरस्कार, द्वेष इतरांना तर
राहोच पण जे तिच्या चाकाखाली भरडले
जात होते त्यांनाही वाटेनासा झाला.
एखादा महान युगकर्ता, धन्वंतरीच
समाजाला त्या व्याधीतून मुक्त करू शकतो
त्या निर्जीव तेजोहीन मानवांना नवीन
चेतना, नवीन प्राण निर्माण करू शकतो
भारतामधील कोट्यावधी लोकांच्या
संबंधात हे ऐतिहासिक कार्य डॉ. बाबासाहेब
आंबेडकर यांनी केले. अस्पृश्यतेच्या
बाह्यनियम निर्बंधांना नव्हे तर तो
मूकपणाने सहन करणाऱ्या आणि दुसऱ्या
बाजूला क्रूरपणा जोपासणाऱ्या मानवी
मनाशीच त्यांनी मुकाबला केला आणि
हजारो वर्षाच्या इतिहासात जे कधीच
घडले नव्हते, ते घडवून आणले.
डॉ. आंबेडकरांनी पेटवलेल्या या
आकाशगामी ज्वालेवरच कविराज
सद्गुरू चंद्रमोहन वाघ यांनी आपली
मशाल पेटवून घेतली आहे.
काही केल्या येतच नसे राग
चिडवलं, बडवलं, तुडवलं तरी.
.. भीम धनूचे सप्तरंग
स्वतंत्र प्रज्ञेचा नवीन वारा
शहारतोय माझं अंगांग

**('मनूची आत्महत्या' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेतून)**

**भारतीय घटनाकार, थोर समाजसुधारक आणि अभ्यासक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संबोधले जाते. परंतु यापलीकडे जाऊन असे म्हणता येईल की, मनुष्य हा केंद्रबिंदू धरून त्याला न्याय मिळण्यासाठी त्यांनी जो अभूतपूर्व संग्राम उभा केला; त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. या अन्यायाविरुद्ध झगडण्यासाठी त्यांनी आपली उभी हयात वेचली. या त्यांच्या कार्यामागे एक तात्त्विक अधिष्ठान होते. या थोर महापुरुषाच्या आठवणी त्यांच्या स्वभावाच्या अष्टपैलूंवर प्रकाश टाकतात.**

# तात्त्विक अधिष्ठान

**डॉ. कमल रा. गवई**

मला असे वाटते की, ते वर्ष १९३७ असावे. परळला एका सभेचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर एका बाजूला श्री. बाळासाहेब खरे आणि दुसऱ्या बाजूला डॉ. ना. भा. खरे बसले होते. भाषणाला प्रारंभ करण्यापूर्वी बाबासाहेबांनी एकदा बाजूला मग दुसरीकडे वळून पाहिले आणि थोडे हसत म्हणाले, आज माझ्या एका बाजूला काँग्रेसची आवडती आणि दुसऱ्या बाजूला नाआवडती अशा दोघी जणी बसल्या होत्या. मी मात्र दोघींच्या मध्ये बसलो असल्यामुळे माझी स्थिती मोठी विचित्र झाली आहे. तेव्हा उपस्थित श्रोत्यांना बोलण्याचे मर्म लक्षात आल्याने हशा पिकला.

बहुधा १९४३ वर्षाची गोष्ट असावी. त्या वेळी बाबासाहेब व्हाईसरॉय एक्झिक्युटीव्ह कौन्सिलचे कामगारमंत्री होते. मंत्री झाल्यावर त्यांच्या असे लक्षात आले की, खाण कामगारांना फार कमी रोजंदारी देण्यात येते. यामध्ये वृद्धी होणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. बाबासाहेबांनी एका दमात ही वाढ दुप्पट करण्याचे आदेश दिले. म्हणजे दिवसाची रोजंदारी सहा आण्यावरून बारा आणे करण्यात आली. खात्यातील अनुभवी अधिकाऱ्यांनी अशी घाईघाईने वृद्धी करू नये असा सल्ला दिला. परंतु बाबासाहेब थोडेच ऐकणार? गरिबीचे चटके स्वत:च अनुभवले असल्यामुळे बाबासाहेबांनी अधिकाऱ्याचा सल्ला मानला नाही. काही दिवसानंतर बाबासाहेबांनी काढलेल्या आदेशामुळे कोणता परिणाम झाला याची सहज विचारपूस केली. तेव्हा त्यांना असे सांगण्यात आले की, आदेश निघून दोन-चार दिवस काम केल्यावर अनेक खाणीतील कामगार कामावरच आले नाहीत. ते दारू पिऊन घरी बेहोष पडले आहेत.

बाबासाहेबांना या वेळेस आपली चूक लक्षात आली. कामगारांना केवळ वेतन वाढवून चालणार नाही. तर त्यासोबत हा मेहनतीने मिळविलेला पैसा कुटुंबातील घरखर्चासाठी योग्यरीत्या कसा वापरला जाईल याचेही त्यांच्यावर सुरुवातीपासून संस्कार केले पाहिजेत. ही बाब बाबासाहेबांच्या लक्षात आली.



**व्हॉईसरॉय काऊन्सिलमध्ये कामगार मंत्री म्हणून समाविष्ट असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर जनतेशी संवाद साधताना.**

### सिद्धार्थ महाविद्यालय

सिद्धार्थ महाविद्यालय अगोदर मरीन लाईन्स वरील सुंदराबाई हॉल शेजारी असलेल्या मोकळ्या जागेतील बॅरॅक्समध्ये भरत असे. हे बॅरॅक्स दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात तात्पुरत्या स्वरूपात बांधले असल्यामुळे, तेथे नियमित राहणे शक्य नव्हते. यावेळेस फोर्ट इलाख्यात फ्लोरा फाऊंटनच्या जवळ जपानी बँकेच्या मालकीच्या दोन इमारती रिकाम्या होत्या. या इमारती महाविद्यालयासाठी सुयोग्य आहेत असे लक्षात येताच बाबासाहेबांनी दिल्ली मुक्कामी हालचाली सुरू केल्या. परंतु यश मात्र येईना. तेव्हा बाबासाहेबांनी लेडी माऊंटबॅटनला भेटून सविस्तर कथन केले. तिचे पत्र घेऊन भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची भेट घेतली. पंडितजींचे शिक्षणावर अतिशय प्रेम होते. शिक्षणासारख्या पवित्र कार्यासाठी या दोन्ही इमारतींचा वापर होणार आहे हे पाहून पंडित जवाहरलाल नेहरूंनी या दोन्ही इमारती पीपल्स एज्युकेशन सोसायटीला देण्याचे

आनंदाने संमती दिली.

आजही आपण पाहतो फ्लोरा फाऊंटनवर मोठ्या दिमाखाने उभ्या असलेल्या आनंद व बुद्धभवन ह्या इमारती आणि त्यामध्ये सुरू असलेले सिद्धार्थ महाविद्यालय म्हणजे बाबासाहेबांच्या प्रयत्नाचे फळ म्हणावे लागेल.

### गरिबांविषयी दया

सकाळचे महाविद्यालय सुरू करण्यासाठी नोकरीला असलेल्या लोकांसाठी मुंबई विद्यापीठाने मान्यता दिली. त्याप्रमाणे अनेक महाविद्यालयांमध्ये व्यवस्था करण्यात आली. या व्यवस्थेमुळे उच्च शिक्षणापासून दूर झालेले असंख्य जन उच्चशिक्षण घेऊ शकले. इतकेच नाही तर बहुतेकजण विद्यापीठाच्या अंतिम परीक्षेत पहिल्या वर्गात चमकले. सर्व काही सुरळीत चालले होते. परंतु काही दुढ्ढाचार्यांना हे पाहवेना. सकाळच्या महाविद्यालयामुळे शिक्षणाचा दर्जा घसरला आहे. असा डांगोरा पिटून त्यांनी त्या महाविद्यालयाची चौकशी करण्याचा प्रयत्न केला. या वेळेस बाबासाहेब धावून आले आणि त्यांनी अनेक पातळीवर या प्रचाराला पायबंद घातला. त्यामुळेच सकाळची महाविद्यालये सुरू राहिली आणि हजारो गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे शक्य झाले. ही गोष्ट केवळ बाबासाहेबांमुळे झाली हे फार थोड्यांना ठाऊक असेल.

### युवकांचे आदर्श पुरुष

युवकांचे खरे आदर्श पुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. कारण त्यांनी युवकांना अनेक महत्त्वाचे बहूमुल्य उपदेश केले आहेत. डॉ. बाबासाहेबांचा जन्म अतिशूद्र म्हणून समजल्या जाणाऱ्या समाजात झाला होता. त्या अस्पृश्यतेचे चटके त्यांना बालपणापासून बसत होते. जातीतून होणारा विरोध व अवहेलना सहन करतच त्यांनी उच्च शिक्षण घेतले. हे शिक्षण आपल्या अधिकाराच्या जाणिवेसाठी, तद्वतच समाज जागृतीसाठी प्रभावी साधन असल्याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यांना मंत्र दिला तो हाच की, 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा'.

११ व्या अस्पृश्य विद्यार्थी युवक संमेलनाचे सन १९३८ मध्ये पुणे येथील संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून शिक्षणाचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. युवकांना आत्मविश्वासाने विद्यार्जन करण्याचा हितोपदेश दिला. मात्र त्यांना इतर



महापरिनिर्वाण दिन विशेष

लोकसेवेमुळे युवकवर्गाकडे पाहिजे तसे लक्ष देण्यास वेळ मिळू शकला नाही. त्याबद्दल नेहमी खंत वाटत होती. ती खंत त्यांनी दिलगिरीरूपाने आपल्या वक्तव्यातून व्यक्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विद्यार्थिदशेतील जीवन फार संघर्षमय होते. अस्पृश्याच्या मुलांकरिता प्रामुख्याने तो काळ विद्यार्थी जनास प्रतिकूल होता. अशाही स्थितीत त्यांनी घासलेटच्या दिव्यावर, प्रसंगी रस्त्यावरील दिव्याखाली, दिवसातील जास्तीत जास्त वेळ अभ्यास करून विद्यार्जन केले. तल्लख बुद्धिमत्तेमुळे प्रेमापोटी बाबासाहेबांना शिक्षकांनी त्यांचे अंबाडवेकर हे नाव बदलून आंबेडकर हे नामाभिधान दिले. पुढे तेच रूढ झाले. आठवड्यातून एक दिवस उपवास करून, त्यांनी वाचलेल्या पैशातून अनेक पुस्तके विकत घेऊन, आपल्या ज्ञानात भर टाकली.

## स्त्रियांचे कैवारी

स्त्रियांचे उद्धारक भारतात पुष्कळ झाले. परंतु कैवारी मात्र एकच झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर माता रमाईंना पाठवलेल्या एका पत्रात त्यांनी स्त्रियांच्या प्रगती व मुक्तीसाठी संघर्ष करणारा मी योद्धा आहे, असे म्हटले आहे. ते सर्वार्थाने सत्य आहे. दोन्ही हाती शस्त्र घेऊन, महिलांच्या हक्कासाठी संघर्ष करणारा असा योद्धा पुन्हा होणे नाही. कायद्याचे शस्त्र एका हाती तर चळवळीचे शस्त्र दुसऱ्या हाती सर्व भारतीय महिलांनी मानले पाहिजे. आपल्या ६५ वर्षांच्या उण्यापुऱ्या आयुष्यात लढणाऱ्या योद्ध्याने राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक अशी चारही शस्त्रे पादाक्रांत केली. परंतु या पराक्रमाला जोड होती करुणेची, महिला आणि शूद्रादी प्रजेवर पराकोटीच्या जातीय व्यवस्थेने केलेल्या अन्याय अत्याचाराचा राग व त्या पिळवणुकीला बळी पडलेल्यांविषयी करुणा, यातून बाबासाहेबांनी या देशात सामाजिक क्रांती केली. तथागत बुद्धाने केलेल्या क्रांतीनंतर ही दुसरी महत्त्वाची सामाजिक क्रांती होय. सर्व प्रकारच्या विषमतेपैकी एक म्हणजे स्त्री-पुरुष विषमता. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी वापरलेले महत्त्वाचे अस्त्र म्हणजे कायदा. स्वत:चे सर्व




अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषद, नागपूर (१९४२)

पांडित्य त्यांनी स्त्रियांना अधिकार मिळवण्यासाठी (हिंदू कोडबिल) पणाला लावले. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी जुन्या कायद्याची संहिता बदलली पाहिजे व स्त्री केंद्री बनवली पाहिजे, हा त्यामागील हेतू होता.

**समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या व नोकरीच्या संधी मिळणे सहजसुलभ नव्हते. ही बाब डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चांगलीच लक्षात होती. वंचित समाजाला प्रगतीच्या वाटेवर आणायचे असल्यास त्यांना अशा संधी मिळणे आवश्यक असून, त्यासाठी शिक्षणशुल्कामध्ये सूट आणि आरक्षण मिळणे गरजेचे असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्याचेच फळ म्हणून या घटकातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होत आहे.**

# ....आणि शिष्यवृत्ती सुरू झाली

**कृष्णा इंगळे**



***शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे !***
***ते पिल्याने माणूस गुरगुरते !!***

हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले. परंतु हे वाघिणीचे दूध मिळवणे हे अस्पृश्यासाठी अशक्य होते हेही सर्वश्रुत आहे. अस्पृश्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार हिरावण्यात आला होता.

महात्मा फुले यांनी १८४८ ला अस्पृश्यासाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले त्यांनी सावित्रीबाईंना पहिली शिक्षिका केले. याच दरम्यान धारवड येथे सिद्धाप्पा कांबळे नावाचा तंबाखूचा व्यापारी होता. तो अडाणी असल्याने त्याला हिशोब लिहिण्यासाठी एका शिक्षिताची फार आवश्यकता होती. त्याच्या मित्राने सल्ला दिला की, तुझ्या मुलाला शाळेत टाक. तो आपल्या मुलाला घेऊन प्राथमिक शाळेत गेला, तेव्हा त्याला शाळेच्या मुख्याध्यापकांनी सांगितले की, 'तू अस्पृश्य आहेस. तुमच्या जातीला शिक्षण घेण्याचा अधिकार नाही. तेव्हा, तुझ्या मुलाला शाळेत का घालतोस?' तेव्हा सिद्धाप्पा म्हणाला, 'मी तंबाखूचा व्यापारी आहे. मला हिशोब लिहिण्यासाठी माझ्या मुलाला शिकवायचे आहे. तेव्हा माझी कळकळीची विनंती आहे की, त्याला पहिल्या वर्गात घ्या.' मात्र मुख्याध्यापकांनी सांगितले, 'त्याच्यामुळे आमची शाळा बाटेल व सर्व शाळा सोडून जातील.' त्यामुळे त्याला शाळेचा प्रवेश नाकारण्यात आला.

त्या प्रवेशाविरुद्ध सिद्धाप्पा हा जिल्हाधिकारी यांच्याकडे गेला. आपल्या मुलाला प्रवेश नाकारल्याच्या विरुद्ध कैफियत सादर केली. दुर्दैवाने जिल्हाधिकारी यांनी त्याची कैफियत फेटाळली. सिद्धाप्पा त्या विरुद्ध प्रीव्ही कौन्सिलपर्यंत भांडला; मात्र उपयोग झाला नाही.

१८९० मध्ये इंग्रज सरकारने अस्पृश्यांना सैन्यातील भरती बंद करून जे सैन्यात होते त्यांना सैन्यातून काढले.

रामजी आंबेडकर हे सातारा येथे नोकरीनिमित्त स्थायिक झाले होते. त्यांनी आपला मुलगा भिवाला प्रतापसिंह हायस्कूलमध्ये ७ नोव्हेंबर १९०० मध्ये पहिल्या वर्गात दाखल केले. भिवा त्या शाळेत चौथा वर्ग पास झाला. त्याला शुल्क भरावे लागत असे. जेव्हा शाळा सोडली, तेव्हा १९०४ मध्ये त्यांच्या वडिलांनी पूर्ण शुल्क भरले. शाळेच्या रजिस्टरमध्ये 'नो ड्यूज' म्हणून लिहिले आणि रामजी मालोजी आंबेडकर अशी सही केली.

याचा सरळ अर्थ आहे की, उच्चवर्णीयांना फुकट शिक्षण दिले जात होते. तर अस्पृश्यांना शुल्क भरावी लागत असे.

दुसरे महत्त्वाचे उदाहरण बुलडाणा जिल्ह्यातील चिखलीचे आहे. काळुजी

जाधव हे चिखलीजवळ सातगाव भुसारी येथे राहत होते. ते मोळ्या विकण्यासाठी चिखली येथे येत. एक दिवस लहानगा मारुती त्यांच्याबरोबर चिखली येथे आला. तेथे श्री. रंभाजी (ज्युरी) व श्री. रायजी (वन अधिकारी) या जाधव बंधूंचे मागासवर्गीयांसाठी खासगी वसतिगृह होते. त्यांनी काळबाला विचारले की, का..रे.. काळबा याला शाळेत टाकले नाही काय? तेव्हा तो उद्‌गारला की, मी गरीब अस्पृश्य कोठून पैसे आणू. मी मोळ्या विकून पोट भरतो. तेव्हा जाधव बंधूनी त्याला चौथ्या वर्गापर्यंत शिकवले. पुढे मारुतीला बुलडाणा येथील ख्रिश्चन मिशनरी या शाळेत घातले. तेथेच तो मॅट्रिक पास झाला.

बुलडाणा मिशनरी शाळेने त्याला पुणे येथे पुढील शिक्षणाकरिता पाठवले व तो तेथे बी.ए. पास झाला. मारुती काळुजी जाधव यांचा पुणे येथे अस्पृश्य मंडळीनी सत्कार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निवेदन दिले. त्यात एक असे नमूद केले. अस्पृश्य मुलगा बी.ए. पास झाला आहे. त्यांना वरच्या श्रेणीची नोकरी मिळवून द्यावी. या निवेदनाच्या अनुषंगाने डॉ. आंबेडकर हे गव्हर्नरला भेटले. १९२६ साली जाधव यांना उपजिल्हाधिकारी करण्यात आले. जाधव हे १९३४ साली आयसीएसमध्ये पदोन्नत झाले.

### बाबासाहेबांचा आग्रह

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रज सरकारपुढे अस्पृश्यांना शिक्षण, नोकरी आणि सामाजिक उत्थानासाठी आग्रह धरला. या आग्रहाचा विचार करणे भाग पाडले. इंग्रज सरकारने आदिवासी आयुक्त इएमएस स्टार्ट या आयसीएस अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. ती समिती स्टार्ट कमिटी १९२८ ला स्थापन झाली. त्याचे सदस्य म्हणून डॉ.बी. आर. आंबेडकर, डॉ. व्ही. बी. सोळंकी, ठक्कर बाप्पा व कॅ. देशपांडे होते. या समितीने १९२८-१९३२ पर्यंत अस्पृश्यांचे शिक्षण, नोकरी आणि सामाजिक बाबींवर सविस्तर काम केले. या वेळेस भयानक स्थिती त्यांच्या नजरेस आली. त्यावेळी श्री. घट कांबळे, हे अव्वल कारकून होते, तर श्री. कांबळे हे उप शिक्षण निरीक्षक, श्री. इंगळे फॉरेस्टर तर श्री. शेगोकर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक होते. याच दरम्यान पोलीसमध्ये फक्त ९६ पोलीस होते. त्या समितीने जेव्हा पोलीस प्रमुखास विचारले की, पोलीस उपनिरीक्षक किती? तेव्हा समितीला सांगितले की, पोलीस दलात जमादार नाहीत तर पोलीस उपनिरीक्षक कोठून येणार?

एवढेच नव्हे तर या पोलिसांना घरे नाहीत. जर यांना पोलीस मुख्यालयात घरे दिली नाही तर आहेत ते पोलीस नोकऱ्या सोडून जातील.

या समितीच्या निदर्शनास आले की, १००० अस्पृश्यांमध्ये फक्त एक मुलगा शिक्षण घेतो. ज्याची ऐपत शिक्षण घेण्याची म्हणजे शुल्क भरण्याची आहे. तेच शिकू शकतात. स्टार्ट कमिटीचा अहवाल १९३२ साली सादर झाला. या समितीने खालील शिफारसी केल्यात.

- अस्पृश्याच्या मुलांना मोफत शिक्षण देण्यात यावे. त्यांचे शुल्क सरकारने भरावे.
- शिक्षणाच्या अर्हतेनुसार नोकरी देण्यात यावी.
- अस्पृश्यांना समान वागणूक देण्यात यावी.
- त्यांच्यासाठी सरकारने नवीन खाते उघडून त्यांच्या देखरेखीखाली कार्य करण्यात यावे.



महापरिनिर्वाण दिन विशेष

या समितीच्या शिफारशीनुसार हरिजन खाते उघडण्यात आले. त्यानंतर पुण्याला समाज कल्याण खाते स्थलांतरित करण्यात येऊन, १९४२-४३ ला अनुसूचित जातीच्या मॅट्रिक झालेल्या ११४ विद्यार्थांना महाविद्यालयीन शिष्यवृत्ती देण्यात आली. आणि अनुसूचित जमातीच्या ९८ विद्यार्थ्यांना १९४८-४९ साली शिष्यवृत्ती देण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १९४२ साली कामगार मंत्री म्हणून इंग्रज सरकारने



नेमले. त्या वेळी बंगालचे जोगेंद्रनाथ मंडल हे अस्पृश्यांचे पुढारी होते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मित्र होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे आग्रह धरला की, पदवीधर झालेल्यांना इंग्रजांना आयसीएस करायला सांगा. तेव्हा इंग्रज सरकारने श्री. मल्लिक यांना आयसीएस केले. पुढे ते पश्चिम बंगालचे मुख्य सचिव झाले.

अशा रीतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रज सरकारला शिक्षण शुल्क/ शिष्यवृत्ती सुरू करावयास भाग पाडून वाघिणीचे दूध पिण्याची सुवर्णसंधी अस्पृश्यांना मिळवून दिली.





कुठलेही गैरसमज अकारण निर्माण होत नसतात. कधीकधी इतिहास सामग्रीच अशी असते की, ह्या सामग्रीची संगती लावण्यात चूक झाली की, असे गैरसमज पसरत जातात. म्हणून हैदराबाद मुक्तिसंग्रामातील लढ्याविषयी असे गैरसमज का निर्माण झाले हे आधी समजून घ्यायला हवे. ह्या लढ्याविषयी बाबासाहेब किती नि:संदिग्ध होते हे पुरावे पाहून लक्षात घ्यायला हवे म्हणजे मग डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबादचा मुक्तिसंग्राम ह्या विषयीचे गैरसमज दूर होऊ शकतील.

आणि स्वामीजींचे नाव ह्या गोष्टीशी ज्यांचा संबंध तो हिंदूचा नेता अशी आपली धारणा असते. पण ही धारणा स्वामीजींच्या बाबत चूक आहे. स्वामीजी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे स्नातक होते. गांधीजींचे अनुयायी होते. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत हैदराबादचा भूगोल संपवण्यासाठी त्यांनी थेट पं. जवाहरलाल नेहरूंशी संघर्ष केला हे अनेकांना माहीत नव्हते. मग त्यांची निजामाविरुद्धची लढाई कोणत्या स्वरूपाची होती?

निजाम आपली स्वतंत्र सरंजामशाही

**हैदराबादचा मुक्तिसंग्राम हा हिंदू विरुद्ध मुस्लीम असा कधीही नव्हता. संस्थानाबाहेर मात्र हा गैरसमज अजूनही मोठ्या प्रमाणात आहे. हैदराबादमधील जनतेच्या मनात मात्र हा गैरसमज मुळीच नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतल्या सर्व वरिष्ठ नेत्यांना तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही हा लढा कधीही हिंदू-मुस्लीम लढा होता, असे वाटले नाही. कुठलेही गैरसमज अकारण निर्माण होत नसतात. कधीकधी इतिहास सामग्रीच अशी असते की, ह्या सामग्रीची संगती लावण्यात चूक झाली की, असे गैरसमज पसरत जातात. म्हणून हैदराबाद मुक्तिसंग्रामातील लढ्याविषयी असे गैरसमज का निर्माण झाले हे आधी समजून घ्यायला हवे. ह्या लढ्याविषयी बाबासाहेब किती नि:संदिग्ध होते, हे पुरावे पाहून लक्षात घ्यायला हवे म्हणजे मग डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबादचा मुक्तिसंग्राम ह्या विषयीचे गैरसमज दूर होऊ शकतील.**

# हैदराबादचा लढा आणि डॉ. आंबेडकर

**प्रा. दत्ता भगत**

हैदराबादचा मुक्तिसंग्राम १५ ऑगस्ट १९४७ नंतर हिंदू विरुद्ध मुस्लीम लढा होता असे चित्र रंगवण्याचे प्रयत्न झाले. ते गैरसमज अजूनही पुरतेपणाने पुसले गेले नाहीत. राजकीय निवडणुकीची गरज म्हणूनही काही वेळा हे प्रयत्न करण्यात आले.

इतिहासाविषयी निर्माण झालेले गैरसमज जर वेळीच पुरले गेले नाहीत तर वर्तमानातल्या पिढ्यांना त्याची शिक्षा भोगावी लागत असते. नामांतर विरोधकांनी ह्याच गैरसमजाचा आधार घेत मराठवाड्यात काही ठिकाणी निर्माण झालेल्या उद्रेकांना खतपाणी घातले होते ह्याचे अनेकांना स्मरण आहे.

हैदराबादचा लढा संपल्यानंतर ५ जिल्ह्यांचा मराठी भाषक प्रदेश महाराष्ट्रात, चार जिल्ह्यांचा कर्नाटकात आणि उर्वरित जिल्ह्यांचा तेलगू भाषक प्रदेश तेलंगणात समाविष्ट झाला. पण ह्या तिन्ही भाषकांचे मुख्य नेते एकच होते. ते म्हणजे स्वामी रामानंद तीर्थ. त्यांची मातृभाषा कन्नड होती. पण त्यांचा जास्तीत जास्त वावर मराठी भाषकात होता.

स्वामीजी भगवी कफनी घालत. स्वातंत्र्यानंतर ते २५ वर्षे हयात होते. पण सक्रिय राजकारणात मुळीच नव्हते. त्यांना अध्यात्मसाधनेची आवड होती. म्हणून स्वातंत्र्यानंतरचा काळ ते हैदराबादजवळच्या एका आश्रमात एकांतात उपासना करीत होते. भगवी कफनी,अध्यात्म, उपासना

संस्थान टिकावे ह्यासाठी प्रयत्नशील होता. तर स्वामीजींना संस्थानात जनतेचे जबाबदार सरकार असावे असे वाटत होते. पुढे संपूर्ण भारतात संस्थाने विलीन झाली. त्याचप्रमाणे निमाजाचे संस्थानही विलीन झाले पाहिजे हे स्वामीजींच्या लढ्याचे अंतिम उद्दिष्ट होते.

### पनाहगजी

लोकसंख्येचा मुद्दासुद्धा अत्यंत महत्त्वाचा आहे. सलगपणे सव्वादोनशे वर्षे चालू असलेल्या हैदराबाद येथील असफजाही राजवटीत मुस्लीम फार तर १५% होते. सुमारे ८०% जनता ही हिंदू होती. जबाबदार सरकार असावे ह्या मागणीला पाठिंबा देऊन लढ्यात उतरलेले

स्वातंत्र्य सैनिक, अर्थातच हिंदूंची लोकसंख्या अधिक असल्यामुळे हिंदूच जास्त होते.

जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करणाऱ्या या लढ्यात शिक्षित मुस्लीमही होते. शोएबउल्ला खान ह्या पत्रकाराची ह्या लढ्यात हत्या झाली. तर स्वातंत्र्य चळवळीच्या अंतिम टप्प्यात सर्वसामान्य मुस्लीम जे घाबरले होते त्यांना हिंदूंनी अधिकृतपणे आश्रय दिला. अशा वस्त्यांना 'पनाहगजी' - आश्रयाला आलेले मुसलमान असे म्हणत. नांदेड येथे शिवाजी नगराला जोडून असणाऱ्या या वस्तीतल्या लोकांचा उल्लेख आम्ही लहानपणी 'पनागजी' असाच करीत होता. आज तो भाग मकदूमनगर या नावाने ओळखला जातो.

स्वामी रामानंदतीर्थ ह्यांचा वेष आणि त्यांच्या अनुयायात बहुसंख्य असणारे हिंदू यामुळे स्वामीजी हे हिंदूंचे नेते हा गैरसमज निर्माण करणे सोपे गेले. स्वातंत्र्य चळवळीत हिंदूचे तीन गट सक्रिय होते. स्टेट कॉंग्रेस, कम्युनिस्ट आणि आर्यसमाज. स्वामीजी हे स्टेट कॉंग्रेस ह्या गटाचे नेते होते हा गट गांधीवादी होता. उर्वरित दोन्ही गटांना स्वामीजींबद्दल आदर वाटत असे. सुप्रसिद्ध कम्युनिस्ट नेते ना. म. जोशी यांचे स्वामीजी दिल्ली येथे काही काळ पी.ए. होते आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, ना. म.जोशी यांच्याबद्दल बाबासाहेबांच्या मनातही प्रेम होते. एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये विद्यार्थी म्हणून शिक्षण घेताना गणिताच्या एका शिक्षकाने एक अवघड प्रमेय फळ्यावर सोडवायला सांगितले. ते गणित बॅक बेंचर असलेल्या बाबासाहेबांनी सोडवले. पण ते फळ्याकडे निघाले आणि सवर्ण मुलांनी विटाळ होईल असा एकच गिल्ला केला. कारण त्या फळ्याच्या मागे मुलांचे जेवणाचे डबे होते. पण ते शिक्षक नमले नाहीत. त्यांनी मुलांना त्यांचे डबे काढून घ्यायला सांगितले, पण बालभीमाला अडवले नाही.



बालभीमाने प्रमेय अचूक सोडवले आणि ते शिक्षक अतिशय प्रसन्न झाले. कोण होत ते शिक्षक? ते शिक्षक म्हणजे मराठी साहित्यातील ख्यातनाम कांदबरीकार वामन मल्हार जोशी यांचे ते बंधू होतेच पण हेच शिक्षक म्हणजे पुढे भारतातले महत्त्वाचे कम्युनिस्ट नेते ना. म.जोशी हे होत. म्हणूनच ह्या ना. म. जोशी ह्यांच्याबद्दल बाबासाहेबांच्या मनात आदर होता आणि त्यांचे पी.ए. असणारे स्वामीजी ह्यांच्याबद्दल नेहरू व सरदार ह्यांच्या मनात एक बारीक अशी अढी होती, त्याचेही कारण हेच होते.



महापरिनिर्वाण दिन विशेष

### धर्मांतराची घोषणा

हैदराबाद संस्थानातल्या अखेरच्या निजामाने ज्या राजाज्ञा काढल्या त्यातल्या काही राजाज्ञा हिंदू प्रजेने संघटित होऊ नये ह्या स्वरूपाच्या होत्या. गणेशोत्सवाच्या आयोजनातून लोकमान्य टिळकांनी हिंदूंना संघटित केले. पण ह्या गणेशोत्सवाचे स्वरूप धार्मिक नव्हते हे आपणास माहीत आहे. हैदराबादमधील हिंदू प्रजेनेही संघटित होण्यासाठी ह्याच मार्गाचा अवलंब केला तेव्हा निजामाने राजाज्ञा काढून, सरकारच्या संमतीशिवाय ते भरवले जाऊ नयेत असा अडथळा निर्माण केला. मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी पूर्वसंमती घेणे बंधनकारक केले. निजामाच्या सरकारी नोकरीत ८०% मुस्लीम अधिकारी असत. त्यामुळे पोलिसांच्या सहकार्याने दहशत निर्माण करण्यासाठी ह्या राजाज्ञेची ते विपर्यस्त पद्धतीने अंमलबजावणी करीत. हा लढा हिंदूविरुद्ध मुस्लीम वाटावा, असे चित्र निर्माण करणे त्यामुळे सोपे गेले.

हैदराबाद संस्थानात एकूणच सर्व प्रजा जास्तीत जास्त निरक्षरच होती. त्यामुळे अस्पृश्यही निरक्षरच होते.

## हिंदू विरुद्ध मुस्लीम आभासी चित्र

शेवटच्या निजामाला गादीवर बसवण्यात महाराजा किशनसिंग ह्यांनी फार मोठी मदत केली होती. महाराजा किशनसिंग हे निजामाचे पिढीजात दिवाण होते. अशा निजामाला दूरदृष्टी मात्र नव्हती. इंग्रज भारत सोडून गेले तर 'वऱ्हाड 'प्रदेशासह आपले संस्थान स्वतंत्र होईल असे स्वप्न तो पाहत होता. म्हणूनच आपल्या संस्थानाच्या संरक्षणासाठी निजामाने रझाकारांची संघटना निर्माण केली. हे रजाकार म्हणजे निजामाचे अर्ध सैनिकदल होते. त्यांना दरमहा ६० रुपये वेतन मिळत असे. ह्या अर्ध सैनिकदलात अपवादानेसुद्धा हिंदू नियुक्त केलेला नव्हता तसाच अस्पृश्यही नव्हता. ह्या रझाकारांनी सलग १४ महिने अक्षरश: हैदोस घातला. रझाकार श्रीमंत हिंदूना त्रास देऊन त्यांची संपत्ती लुटून नेत असत. अशा हिंदूचे गडी-नोकर अनेक वेळेला कनिष्ठ जातीचे असत अथवा पूर्वास्पृश्य असत. ते आपल्या मालकांच्या संरक्षणासाठी धावले तर हे रझाकार त्यांनाही त्रास देत असत. ह्या रझाकारांत कर्जवसुली करण्यासाठी निजामानेच आणलेले रोहिले अथवा पठाणही असत. त्यामुळे हैदराबाद संस्थानातील हिंदू प्रजा आणि रझाकारांतील मुस्लीम ह्यांच्यातील ताणतणावामुळे हैदराबादचा लढा हिंदू विरुद्ध मुस्लीम होता हे चित्र रंगवणे सोपे होते.

इथेच एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती अशी की, हिंदू ८०% असूनही या लढ्यात त्यांनी एखाद्या मस्जिदीवर हल्ला केला, मुस्लिमांचा धर्मग्रंथ जाळला अथवा एखाद्या दर्ग्यावर हल्ला केला, असे उदाहरण आढळून येत नाही. उद्‌गीर - गुलबर्गा रस्त्यावरील अतिशय प्रसिद्ध असलेल्या माणिकप्रभू संस्थानाला तर निजामाचे खास संरक्षण होते.

## हिंदू कोड बिल

केवळ हैदराबाद संस्थानच नव्हे तर भारतातील सर्वच संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन व्हावीत आणि त्यातून केंद्रसत्ता बळकट होईल असा एकात्म देश निर्माण व्हावा ही बाबासाहेबांची मूळ भूमिका होती. सर्व संस्थानांच्या विलीनीकरणात जे जे कायद्याचे संभाव्य अडसर होते त्यातून मार्ग काढीत बाबासाहेबांनी सरदार पटेल आणि पं. नेहरू यांना फार मोठे सहकार्य केले. कारण ह्या काळात ते भारताचे 'कायदामंत्री' होते आणि भविष्यात भारत नावाचे राष्ट्र केंद्रीय स्वरूपात बदलावे यासाठी त्यांनी संविधानात फार मोठ्या तरतुदी केल्या. कारण ह्याच काळात ते संविधान लेखनाचा मसुदा लिहीत होते. 'हिंदू कोड बिल' चा संबंध हिंदुधर्मीय जनतेच्या धर्मश्रद्धा, परंपरा, रूढी या घटकांशी जोडला जातो. मुळात आपल्या देशाचे सर्वोच्च न्यायालय प्रबळ कसे होईल हा हिंदू कोडबिलचा तात्त्विक गाभा आहे. ह्याकडे आपण दुर्लक्ष करतो. सर्वच संस्थाने विलीन झाली म्हणजे आपोआप संस्थानांतर्गत असणारी संस्थानी न्यायालयाची सत्ता संपणार होती आणि कायद्यापुढे सर्व समान ही भूमिका कायद्याने संमत व्हायची असेल तर रूढी, परंपरा अथवा धर्मशास्त्रे ह्यांच्या हाती शिल्लक असलेली न्यायाची शक्ती 'हिंदू कोड बिल'मुळेच नाहीशी होणे शक्य होते. तेव्हा बाबासाहेबांची जी व्यापक भूमिका होती त्याचा एक आनुषंगिक राजकीय उपक्रम म्हणून संस्थानांच्या विलीनीकरणाचा मुद्दा आपण लक्षात घेतला पाहिजे.



राजगोपालाचारी पहिले गव्हर्नर जनरल झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कायदामंत्री होते. ३७० व्या कलमाच्या संदर्भात विशिष्ट शब्दांची रचना केली तर शेख अब्दुल्ला यांचे फावणार होते. शेख अब्दुल्ला ह्यांना 'नियुक्त करण्यात आलेले मंत्रिमंडळ' या शब्दांची योजना हवी होती. या एवढ्या शब्दामुळे १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीआधी काश्मीर हे स्वतंत्र राष्ट्र म्हणून जाहीर करणे शक्य झाले असते. 'तुम्हाला भारतात पूर्ण अधिकार हवेत. पण तसेच अधिकार भारतीयांनाही काश्मिरात हवेत. ते तुम्ही (म्हणजे शेख अब्दुल्ला) द्यायला तयार नाहीत ... अशी देशविघातक तरतूद मी कायदामंत्री या नात्याने कधीही करणार नाही' असे बाबासाहेबांनी शेख अब्दुल्ला ह्यांना सुनावले आणि 'त्या वेळचे निवडून आलेले मंत्रिमंडळ' ही शब्दरचना राजगोपालाचारी आणि सरदार पटेल यांच्याशी करून अंतिम मान्यता मिळवली. त्यामुळे काश्मीरचा दर्जा इतर राज्यांप्रमाणेच कायम झाला आहे. जिज्ञासूंनी सुधाकरराव डोईफोडे यांचा लेख वाचावा. मी विचारभयास्तव ह्या मुद्द्याचा सर्व तपशील दिलेला नाही.

अशा या बाबासाहेबांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामातील आपल्या दलित अनुयायांनाही अत्यंत रोखठोक शब्दात त्या वेळी पत्रक प्रसिद्ध करून सुनावले आहे. ते म्हणतात, 'हैदराबाद संस्थानातील मुसलमानांवर किंवा मुस्लीम लीगवर विश्वास ठेवल्याने, दलित समाजाचा घात होईल. दलित वर्ग हिंदू समाजाचा तिरस्कार करतो. म्हणून मुसलमान आपले मित्र आहेत असे मानण्याची वाईट खोड त्यांना जडली आहे, ती अत्यंत चुकीची आहे. हैदराबादमधील दलितवर्गाने निजामाची, जो उघड उघड हिंदुस्थानचा शत्रू आहे त्याची बाजू घेऊन आपल्या समाजाच्या तोंडाला काळिमा लावू नये' हे पत्रक रझाकारांचा हैदोस चालू होता त्या काळात दि.२८/११/४७ रोजी 'द फ्री प्रेस जरनल' मध्ये प्रसिद्ध झाले असून, त्यांनी निजामीतल्या आपल्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांना पाठवले.

हैदराबाद स्वतंत्र झाल्यानंतर काही दलितांना रझाकार ठरवण्याचा उद्योग जो वैयक्तिक पूर्वग्रहातून चालू होता त्याबाबत जनरल चौधरी ह्यांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची सदस्य पावती पाहून निर्दोष म्हणून सोडून दिले.

---

बी.एस. व्यंकटराव हे अस्पृश्यांचे त्या काळातले ज्येष्ठ नेते होते. लोक त्यांना हैदराबादी आंबेडकर ह्या नावाने ओळखत असत. त्यांचा बाबासाहेब आंबेडकरांशी जवळून परिचय होता. १९३६ साली मुंबई येथे बाबासाहेबांनी आयोजित केलेल्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. बी.एस. व्यंकटराव डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशन ही संघटना चालवत.

जे.ए. सुब्बाराव आणि बी.एस. व्यंकटराव सख्खे मामा-भाचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेत सुब्बाराव यांनी हैदराबाद संस्थानात 'संस्थानी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' ही संस्था काढली. हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या





लढ्यात ही संघटना रझाकार विरोधी सक्रिय होती. बी.एस.व्यंकटराव आणि सुब्बाराव ह्यांच्यात मतभेद झाले. त्यातच निजामालाही अस्पृश्यांचा एक गट आपल्या सोबत हवा होता. 'जैसे थे करारा'चा आधार घेऊन निजामाने हैदराबाद संस्थानासाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ नेमले. या मंत्रिमंडळाचे प्रमुख मुख्यमंत्री होते मीर लयक अली. या मीर लयक अलीनी बी.एस. व्यंकटराव यांना मंत्रिमंडळात स्थान दिले. मीर लयक अली हेच रझाकारांच्या हातचे बाहुले होते. त्यामुळे बी.एस.व्यंकटराव ह्यांच्यापासून दलितांचा गट पूर्णपणे दुरावला. पण बी. एस.व्यंकटरावांच्या मंत्रिमंडळातील प्रवेशामुळे, हैदराबाद संस्थानातही दलित रझाकारांना मदत करतात असा अपप्रचार करणे सोपे गेले.

१९३५ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली. त्यांच्या काही आततायी अनुयायांनी मुस्लीमधर्म स्वीकारला आणि भारतीय हिंदूच्या राजकारणात प्रचंड खळबळ निर्माण झाली. खरे म्हणजे त्याआधी काही महिने बाबासाहेब वेरुळला आले होते. दौलताबादचा किल्ला पाहण्यासाठी ते गेले. किल्ल्याबाहेरच्या हौदावर त्यांच्या काही कार्यकर्त्यांनी हातपाय धुतले, पाणी पिले. एवढ्या कारणासाठी 'आमचा हौद बाटवला' असे म्हणत अतिरेकी मुस्लीम अंगावर धावून गेले. असे हे बाबासाहेब धर्मांतराची घोषणा करतात तेव्हा त्यांच्या मनात मुस्लीम धर्म होता असा तर्क करणेसुद्धा केवळ मूर्खपणाच आहे. पण ह्या दोन घटना आणि १९३८ नंतर हैदराबादमधील आंदोलनाने धारण केलेले उग्ररूप, ह्या पार्श्वभूमीवर जणू काही बाबासाहेबांचीही निजामाला साथ होती असा गैरसमज पसरवणे सोपे गेले.

**(संदर्भ : १. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबाद संस्थान डॉ.शेषराव नरवाडे (प्रपाठक (निवृत्त) मुंबई विद्यापीठ) २. संस्थानांचे विलीनीकरण-सुधाकरराव डोईफोडे - संगत प्रकाशन नांदेड ३. हैदराबाद मुक्तिसंग्रामात दलितांचा सहभाग - डॉ. भगवानराव देशपांडे, मुंबई)**

## साधेपणाचा आदर्श

महाडला १९२७ साली एक परिषद झाली. मुंबईहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरबरोबर बरीच मंडळी परिषदेसाठी निघाली होती. मुंबईहून धरमतल बंदराला उतरून पुढे महाडला जाण्यासाठी मोटारीने प्रवास करावा लागतो. महाडपूर्वी दारूगाव म्हणून गाव लागते. तेथील मंडळींनी मुंबईहून येणाऱ्या मंडळींच्या जेवणाची फार चांगली व्यवस्था करून ठेवली होती. शिजवून तयार केलेल्या भाताचा घमघमाट जिकडे-तिकडे पसरला होता. परंतु जेवत बसलो तर महाडला पोहोचून परिषदेच्या कामाला सुरुवात करण्यास उशीर होईल एवढ्याचसाठी बाबासाहेबांनी तेथे जेवणाचे टाळले.



चित्रकार : ज. द. गोंधळेकर

मुंबईबाहेर सभा, परिषदेसाठी बाबासाहेब असताना अनेक लोक त्यांच्याबरोबर असायचे. सर्वांची व्यवस्था लावणे स्थानिक मंडळींना अवघड जायचे. अशा वेळी बाबासाहेब परिस्थितीप्रमाणे वेळ मारून नेत. एकदा सातारा जिल्ह्यात पेठला परिषद होती. दुपारी स्थानिक मंडळींनी व्यवस्था केल्याप्रमाणे व्यवस्थित जेवणे झाली होती. संध्याकाळी जेवण करण्यास त्रास नको म्हणून त्या मंडळींना बाबांनी सांगून टाकले की सायंकाळी आपल्याला जेवण नको. मांडे, शेंगदाणे व गूळ असला म्हणजे काम भागेल. अशा प्रवासात काही वेळा त्यांना बेडिंगची जरूर लागत नसे. साध्या घोंगडीवर आपली पथारी ते टाकून देत.

## प्रेरणादायी

३० मे ते १ जून १९३६ ला पोयबावाडी, दामोदर हॉल येथे बाबासाहेबांनी मुरळ्या, जोगतिणी, देवदासींपुढे दिलेले भाषण प्रेरणादायी आहे. ते म्हणाले,'तुम्हाला आमच्याबरोबर यायचे असेल तर तुम्ही प्रथम हा दुर्गंधित आयुष्यक्रम अजिबात सोडून दिला पाहिजे आणि जर तुम्ही आपला आयुष्यक्रम पूर्वापार चालू ठेवून महार जातीस बट्टा लावण्याचे कार्य सोडणार नाही तर मी तुम्हास बजावून सांगतो की, हजारो तरुण स्वयंसेवक तयार करून; मी तुमचे कामाठीपुऱ्यातून उच्चाटन करीन.' या प्रसंगी त्यांनी द्रौपदीचे दुर्योधनाला दिलेले उत्तर ऐकवले की, 'जर मला नीतीने आयुष्यक्रम कंठता येत नसेल तर मला ऐश्वर्य नको, राजवाड्यापेक्षा कष्टमय वनवास मला अधिक प्रिय आहे.'

आपल्या वर्गाच्या वंचित, शोषितांसाठी त्यांनी आपले समस्त जीवन ओवाळून टाकले होते. स्त्री म्हणजे दलितातील दलित आहे. तिच्या उन्नतीसाठी त्यांनी स्वत:च्या मंत्रिपदावरही पाणी सोडले. ते म्हणत, 'कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे मोजमाप मी त्या विशिष्ट समाजातील स्त्रीच्या प्रगतीवरून करतो.' म्हणून स्त्रीला मानवपदापर्यंत पोहोचवण्यासाठी बाबासाहेबांनी तीव्र संघर्ष केला. मनुस्मृती दहन ते हिंदू कोड बिल हा प्रवास त्याचेच द्योतक आहे.

# बाबासाहेबांचे पुतळे

मिलिंद मानकर

**देशात अत्यंत श्रद्धेने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे सर्वत्र उभारण्यात आले आहेत. हे पुतळे प्रेरणा देणारे आहेत. नवी दिल्लीच्या संसद भवन परिसरात बाबासाहेबांचे भव्य स्मारकशिल्प लोकवर्गणीतून उभारण्यात आले. २ एप्रिल, २०१७ रोजी या ऐतिहासिक संस्मरणीय प्रसंगाला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत.**




बाबासाहेब म्हणजे ज्ञानसूर्य. या ज्ञानसूर्याने आपल्या प्रकांड पांडित्याने साऱ्या जगाला प्रकाशमान केले. शतकानुशतके गुलामगिरीच्या खाईत खितपत पडलेल्या अस्पृश्य समाजाला 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' असा ओजस्वी संदेश दिला. दोन वर्षे, अकरा महिने आणि सतरा दिवस अविरत झटून विविधतेने नटलेल्या भारतीय जनतेला एका सूत्रात बांधून ठेवणारे संविधान दिले. प्रेम, दया, करुणा, मानवतेची शिकवण देणाऱ्या बुद्धधम्माला या देशात अशोका विजयादशमीला अर्थात १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी पुनश्च गतिमान केले. बाबासाहेबांच्या या अष्टपैलू उत्तुंग व्यक्तिमत्त्वाने पुलकित होऊन, पिढ्यान्‌पिढ्या स्फूर्ती घेतील या उदात्त हेतूने; त्यांच्या अनुयायांनी देशभर त्यांचे भव्य-दिव्य पुतळे, स्मारके उभारली.

### भव्य पुतळा

एकदा डॉ. बाबासाहेबांचा भव्य पुतळा तयार करण्याच्या जिद्दीला पेटलेल्या मूर्तिकाराने म्हटले, 'बाबा आपण जरा समोर उभे राहा. मला आपल्या जीवनदर्शनातून ठसे टिपून घेऊन अद्वितीय असा पुतळा तयार करावयाचा आहे.' त्यावर बाबा म्हणाले, 'अरे, पुतळा अन् माझा ? माझा पुतळा कोण तयार करणार... ? माझा समाज तर गरीब आहे.' त्याच समाजाने ५० वर्षांपूर्वी पै-पै गोळा करून लोकवर्गणीतून नवी दिल्लीच्या संसद भवन परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारकशिल्प उभारले.

बाबासाहेब हयात असताना त्यांचा भव्य पुतळा कोल्हापुरातील बिंदू चौकात सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते भाई माधवराव बागल यांच्या पुढाकाराने ९ डिसेंबर १९५० रोजी उभारण्यात आला.

१९५२ साली छत्रपती राजाराम महाविद्यालय वार्षिक स्नेहसंमेलनासाठी बाबासाहेब कोल्हापूरला आले होते. त्या वेळी बाबासाहेबांनी हा पुतळा 'याचि देही याचि डोळा' पाहिला. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर पुणे (२६ जानेवारी १९६०), मनमाड (२६ जानेवारी १९६०), मुंबई (२६ जानेवारी १९६२), दीक्षाभूमी नागपूर (०६ डिसेंबर, १९६३) येथील पुतळ्यांनी एक नवा इतिहास घडवला. त्याच उज्वल परंपरेत नवी दिल्लीतील बाबासाहेबांच्या पुतळ्याचे अनन्यसाधारण ऐतिहासिक महत्त्व आहे. बाबासाहेबांच्या या भव्य पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते २ एप्रिल १९६७ रोजी झाले 'ज्ञानार्जन चालू ठेवा, सत्याचा शोध घ्या व ते आचरणात आणण्याचा कसोशीने प्रयत्न करा असा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भारतीयांना संदेश आहे' असे भावपूर्ण उद्गार राष्ट्रपतींनी काढले.

### नितांत श्रद्धा

राष्ट्रपती आपल्या भाषणात पुढे म्हणाले, 'लोकशाही पद्धतीवर डॉ. आंबेडकरांची नितांत श्रद्धा होती. रक्तपात होऊ न देता समाजात क्रांतिकारक परिवर्तन घडवता येणे शक्य आहे असा त्यांचा विश्वास होता. त्यांचा हा विश्वास अनाठायी नव्हता हे भारतातील अनेक स्थित्यंतरावरून सिद्ध झाले आहे. राष्ट्रीय ऐक्यावर त्यांचा भर होता. भारतात जोपर्यंत हिंदू, मुस्लीम, सिंधी, तामिळी असे भेदभाव राहतील तोपर्यंत भारताची प्रगती होणार नाही असे त्यांचे विचार होते.' राष्ट्रपतींच्या ओजस्वी भाषणानंतर आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष व भारताचे गृहमंत्री यशवंतराव चव्हाण, लोकसभेचे सभापती नीलम संजीव रेड्डी यांनीही भाषण करून बाबासाहेबांचा कित्येक विशेषणांनी गौरव केला. अनावरण समारंभाला उपराष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन, उपपंतप्रधान मोरारजीभाई देसाई, रिपब्लिकन नेते दादासाहेब गायकवाड, बबसाहेबांचे चिरंजीव भय्यासाहेब आंबेडकर, हुमायून कबीर व इतर गणमान्य व्यक्ती उपस्थित होत्या.

अनावरणापूर्वी श्रीलंका व सांची येथील बौद्ध भिक्खूंनी यशवंतराव आंबेडकर, भाऊराव गायकवाड व इतर नवबौद्धांना पंचशील दीक्षा दिली. त्या दिवशी बाबासाहेबांच्या जयघोषाने सारे वातावरण आंबेडकरमय झाले होते. संसद भवन परिसरात बाबासाहेबांचा उभारला गेलेला हा दुसरा पुतळा आहे. तत्पूर्वी पंडित नेहरूंचे वडील मोतीलालजी नेहरू यांचा पुतळा या परिसरात उभारण्यात आला. बाबासाहेबांचा



लंडनच्या ३ डाऊनिंग स्ट्रिट येथील निवासस्थानी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याला अभिवादन करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले.



महापरिनिर्वाण दिन विशेष

पुतळा मुंबईचे सुप्रसिद्ध शिल्पकार ब्रह्मेश विनायकराव वाघ यांनी बनविला. बाबासाहेबांचा पुतळा बनविण्यासाठी वाघ यांना माईसाहेब आंबेडकरांनी सर्वतोपरी मदत केली. बाबासाहेबांचे पायापासून ते डोक्यापर्यंतचे सर्व साहित्य त्यांनी पुरविले. मकराणाच्या खाणीतील खडकापासून हा पुतळा दोन वर्षाच्या अथक परिश्रमानंतर तयार झाला.

### भव्य स्मारकशिल्प

ब्रह्मेश वाघ यांनी मुंबईत कूपरेज मार्गावर असलेला पुतळा सर्वप्रथम १९५९ साली तयार केला. या पुतळ्यावर छत्री उभारण्यात आली आहे. त्याच धर्तीवर नवी दिल्लीतील पुतळ्याचे नूतनीकरण, सौंदर्यीकरण व्हायला हवे. बाबासाहेबांचा हा पुतळा चौथऱ्यापासून साडे बारा फूट उंच असून, मनुष्याच्या चार पट लाइफ साईज आकाराचा आहे. पंचधातूने निर्मित या पुतळ्याचे वजन दीड टन आहे. हे मॅन्युमेंट मेमोरियल 'भव्य स्मारकशिल्प' नावाने ओळखले जाते. बाबासाहेबांच्या एका हातात संविधान असून, दुसऱ्या हाताचे एक बोट भारतीय संसदेकडे अंगुलिनिर्देश करताना दर्शवले आहे. या भावमुद्रेवरून बाबासाहेब भारतीय जनतेला 'नीतिधर्माप्रमाणे आचरण करा. घटनेचे पावित्र्य राखा आणि शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत घटनेत सांगितल्याप्रमाणे देशाचे संरक्षण करा'! या धीरगंभीर संदेशाचे स्मरण करून देत आहेत असेच वाटते. १४ एप्रिल डॉ. आंबेडकर जयंतीच्या पावनपर्वासोबतच या पुतळ्याचा सुवर्णमहोत्सव केंद्र सरकारने फार मोठ्या प्रमाणात साजरा करायला हवा.

(संपर्क: ८१७७८६६३९७)

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी-विचारवंत एवढेच नव्हे तर देशविदेशातील जनतेकरिता चैत्यभूमी स्मारक प्रेरणास्थळ आहे. गावांतून, खेड्यापाड्यांतून येणारे हे निष्ठावंत अनुयायी प्रवासात मोठ्या हालअपेष्टा सहन करीत, बाबासाहेबांना विनम्र आदरांजली अर्पण करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने चैत्यभूमीवर येत असतात. मोठ्या शिस्तीने त्यांना बुद्धवंदनेने अनुयायी अभिवादन करतात.**

# महापरिनिर्वाण दिन कसा पाळावा?

**नागसेन कांबळे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व आपणा सर्व भारतीयांना सदैव स्फूर्ती देणारे व दिशादर्शक तसेच प्रेरणादायी आहे. भारत देशाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकशाही प्रणीत भारतीय संविधान निर्माण करून, डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी भारतीय जनतेवर कधीही न फिटणारे उपकार केले आहेत. सामाजिक,शैक्षणिक, धार्मिक व इतर विविध क्षेत्रात अतुलनीय मौलिक कार्य करून त्यांनी आपले खरे राष्ट्रप्रेम दाखवून दिले. जगाला युद्धाची नव्हे तर बुद्धाची गरज आहे असे सांगणाऱ्या बाबासाहेबांना अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने, विद्यापीठ स्थापनेच्या तीनशे वर्षातील 'सर्वात हुशार विद्यार्थी' म्हणून घोषित केले. आणि त्यांचा विद्यापीठासमोर पुतळा उभारला. 'ज्ञानाचे प्रतीक' असा त्यांचा गौरव केला.

## आदर्श व प्रेरणादायी

भारत देशासह विदेशातही चारित्र्यसंपन्न आणि नि:स्वार्थी लोकसेवेमुळे, एक आदर्श व प्रेरणादायी व्यक्ती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नावलौकिक आहे. अस्पृश्य समाजातील एका सर्वसामान्य कुटुंबात १४ एप्रिल १८९१ रोजी त्यांचा जन्म झाला. अस्पृश्यतेचे चटके आणि अवहेलना यांना सामोरे जात पराकाष्ठेची जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, त्यांनी अखंड ज्ञानसाधना केली. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० च्या दशकामध्ये भारताच्या सामाजिक-राजकीय पटलावर पदार्पण केले. पुढील चार दशके, म्हणजेच त्यांचे महापरिनिर्वाण होईपर्यंत त्यांनी विविध क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले.

## चौफेर व्यक्तिमत्त्व

बाबासाहेब हे प्रकांडपंडित होते. अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, कायदेपंडित, पत्रकार, संसदपटू, समाजसुधारक, राजकीय मुत्सद्दी आणि बौद्ध धम्मचक्र अनुप्रवर्तक अशा भूमिकांमधून त्यांनी भारताच्या इतिहासावर वेगळा ठसा उमटवला.

दिनांक ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण



**चैत्यभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय भूपृष्ठ व जल वाहतूकमंत्री नितीन गडकरी, सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, खा. रावसाहेब दानवे आदी मान्यवर.**





झाले.  संपूर्ण समाज दु:खात होरपळून निघाला.

भारताची राजधानी दिल्ली येथे 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' ह्या ग्रंथाचा अखेरचा अध्याय संपवून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संघर्षमय जीवनाचा अध्याय समाप्त केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पार्थिव दिल्लीहून मुंबईला राजगृहावर (दादर) येथे आणण्यात आले. शिवाजी पार्क येथील समुद्रकिनारी असलेल्या हिंदू स्मशानभूमीत, दिनांक ७ डिसेंबर १९५६ ला लाखोंच्या जनसागराने; त्यांना अखेरची श्रद्धांजली अर्पण केली. त्या वेळी हिंदू स्मशानभूमी एवढीच त्या जागेची ओळख होती. काही वर्षातच तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र अस्थींवर चैत्य उभारण्यात आला.

## श्रद्धांजली

देशाचे उद्धारकर्ते, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आधुनिक भारतीय समाजाचे प्रगतिशील दिशादर्शक परमपूज्य बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मोठ्या जड अंत:करणाने श्रद्धांजली आणि विनम्र आदरांजली अर्पण करण्यासाठी; भारताच्या सर्व प्रांतामधून लाखोंच्या संख्येनी मोठा जनसमुदाय मुंबई येथील चैत्यभूमी (दादर) शिवाजी पार्क येथे दरवर्षी दिनांक १ डिसेंबरपासून येत असतो.

दिनांक ६ डिसेंबरला मुंबईत येणाऱ्या लाखोंच्या या अफाट जनसमुदायाची योग्य काळजी बृहन्मुंबई महानगरपालिका सेवावृत्तीने आणि परिश्रमपूर्वक घेत असते. मुंबईच्या शिस्तीची आणि सौजन्याची कीर्ती भारतातील सर्व प्रांतात पसरावी म्हणून मूलभूत सर्व सुविधा मुंबई महानगरपालिका प्रशासन लाखो अनुयायांना पुरवत असते.

दरवर्षी ६ डिसेंबरला येणाऱ्या श्रद्धावान अनुयायांची गर्दी प्रचंड प्रमाणात वाढतच असते. पंचवीस लाख अनुयायी बोधिसत्त्व बाबासाहेबांच्या पवित्र अस्थींच्या दर्शनासाठी, त्यांना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या महान कार्यापासून प्रेरणा घेण्यासाठी चैत्यभूमीवर येत असतात.

## प्रेरणास्थळ

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी-विचारवंत एवढेच नव्हे तर देश विदेशातील जनतेकरिता चैत्यभूमी स्मारक प्रेरणास्थळ आहे. गावांतून, खेड्यापाड्यांतून हा निष्ठावंत अनुयायी प्रवासात मोठ्या हालअपेष्टा सहन करीत केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रति असलेल्या अपार श्रद्धेने चैत्यभूमीवर येत असतो.

आज बहुजन समाजाला जे काही मिळाले आहे ते बाबासाहेबांमुळेच. सर्वांगीण प्रगतीचे दिवस येण्याकरिता, समाजात समता आणि स्वातंत्र्य निर्माण करण्याकरिता प्रत्येक माणसाला उन्नतीसाठी मूळ मानवी अधिकार मिळावे, प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार मिळावा, प्रत्येकाला नोकरीची संधी मिळावी, व्यापार, उद्योग




करण्यास संधी, भाषण स्वातंत्र्य मिळावे, धर्मस्वातंत्र्य मिळावे, प्रत्येकाला समान संधी, समान कायदा लागू व्हावा, प्रत्येकाला मानवी स्वातंत्र्य लाभावे, समाजातील विषमता, उच्च-नीचता नष्ट व्हावी यासाठी बाबासाहेबांनी अविरत प्रयत्न केले. देशाच्या विकासाकरिता समाजात समता प्रस्थापित होणे फार महत्त्वाचे आहे. विषमता नष्ट करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. ही बाब ओळखून बाबासाहेब समाज आणि देशहितासाठी संपूर्ण आयुष्यभर झिजत राहिले. महापरिनिर्वाण दिन हा दिवस भारतीय बहुजन समाज व भारतीय बौद्धांसाठी गांभीर्यपूर्वक पाळावयाचा दु:खाचा दिवस आहे.

नागपूर दीक्षा समारंभानंतर मुंबईतील रेसकोर्स मैदानावर दिनांक १६ डिसेंबर, १९५६ रोजी मोठा धम्मदीक्षा कार्यक्रम घेण्याचे योजिले होते. परंतु काही दिवसांपूर्वीच त्यांचे महापरिनिर्वाण व्हावे आणि समाज पोरका व्हावा हा विचारदेखील त्या काळात कोणाच्या मनाला शिवला नव्हता. परंतु परिस्थितीने आणि नियतीने घात केला. भारतीय समाजावर मोठी शोककळा पसरली.

## समन्वय

मागील पंधरा वर्षांपासून मी स्वत: आणि सर्व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांच्या अथक परिश्रमाने, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती' महानगरपालिका प्रशासनासोबत समन्वय साधून सर्व संस्थांना घेऊन, अतिशय परिश्रमाने अनुयायांना सेवासुविधा पुरवण्याचे कार्य करीत असते. बौद्ध समाज, मानव प्रेम, मैत्रिभाव आणि समाजहित व शांती भावनेचा पुरस्कर्ता आहे. बौद्ध अनुयायी मोठे शिस्तप्रिय, न्यायी, निष्ठावान आणि मानवी आदर्श, शिष्टाचार निर्माण करणारे आदर्शवादी म्हणून जगात प्रसिद्ध आहेत. म्हणूनच प्रत्येक वर्षी महापरिनिर्वाण दिन मोठ्या शिस्तीने पार पडला जातो. युगपुरुष, बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बुद्धवंदनेने अनुयायी अभिवादन करतात. या वेळी ६१ वा महापरिनिर्वाण दिन आहे. या वेळी मानाचा मुजरा करून ३० लाख अनुयायांच्या उपस्थितीत १५ मिनिटांकरिता सगळ्यांकडून मौन पाळले जाईल व बुद्धवंदना म्हटली जाईल. अशा प्रकारे मानव समाजाप्रति शिस्तबद्ध मंगलमैत्री करून हा आगळावेगळा महापरिनिर्वाण दिन या वर्षापासून आयोजित करण्याचे ठरवले आहे.



खाद्यपदार्थ शिजवू नयेत. ज्वलनशील वस्तू व पदार्थाचा वापर पूर्णपणे टाळावा. अग्निशमन यंत्रणेकरिता १०१ क्रमांकावर संपर्क साधावा, रात्रीच्या वेळी चूल, शेकोटी पेटवू नये. वाऱ्याच्या दिशेचा विचार करावा जेणेकरून वाऱ्याबरोबर ठिणग्या पसरणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

- मदतीकरिता पोलीस नियंत्रण कक्ष, महापालिका कक्ष, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया आणि महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे स्वयंसेवक, माहिती कक्षाशी संपर्क साधावा.
- घातपाती कृत्ये/दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक अनुयायाने जागृत पोलिसांसारखी दक्षता बाळगावी. संशयित व्यक्ती, वस्तूंवर नजर ठेऊन तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी. १०० क्रमांकाशी संपर्क साधावा. पोलिसांच्या आदेशाचे पालन करण्यासाठी त्यांना आपण सर्वांनी सहकार्य करावे.
- सामुदायिक वंदना म्हणण्याची प्रथा सुरू करावी. शिस्तपालन करावे, घोषणा देऊ नये आणि शांतता राखावी.
- चैत्यभूमी, शिवाजी पार्कसह अनुयायांचा वावर असलेला सर्व परिसर स्वच्छ राखावा, कचरा फेकू नये. जेणेकरून त्या जागेचे माहात्म्य आणि पावित्र्य राखले जाईल.
- स्वयंसेवक कार्यकर्ते तसेच महानगरपालिका आणि पोलीस दल त्यांच्या सूचनांचे पालन करावे.
- सर्व सोयीसुविधा आपल्याकरिताच आहेत. वरील सूचना पाळून त्यांचा लाभ घ्यावा ही विनंती.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे, त्यागाचे स्मरण करावे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

### काही सूचना

महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने येणाऱ्या सर्व जनतेला नम्र विनंती की, त्यांनी खालील सूचनांचे पालन करावे.

- महापरिनिर्वाण दिन हा दु:खद दिन असल्याने हा दिवस साऱ्यांनी गांभीर्यपूर्वक व अष्टशील पाळावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे चिंतन तसेच आत्मपरीक्षण करण्याचा हा दिवस आहे.
- या दिनी शुभ्रवस्त्र परिधान करून शांततेने आणि श्रद्धेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून सदाचारी जीवन जगण्याचा संकल्प करावा.
- अभिवादनासाठी येताना दंडावरील, मानेवरील, हातातील काळे धागेदोरे काढावेत आणि २२ प्रतिज्ञांचे स्मरण करावे.
- अंधश्रद्धा आणि अफवा पसरवणाऱ्यापासून सावध राहावे.
- चैत्यभूमी येथे दर्शनासाठी येताना कृपया रांगेतून, शिस्त पाळून यावे व शांतपणे दर्शन घ्यावे.
- बाहेरगावाहून अथवा दूरवरून आलेल्या व्यक्तींना रांगेत प्राधान्य द्या. सर्वांना सहकार्य करा.
- बालक, वृद्ध महिला गर्दीत हरवण्याची शक्यता असते हे लक्षात घेता संपर्काकरिता त्यांच्याजवळ पूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक द्यावा आणि धक्काबुक्की करू नये, छोट्याशा धक्काबुक्कीचे रूपांतर चेंगराचेंगरीत होऊ शकते.
- या दिवशी बुद्ध-आंबेडकर साहित्य, पुस्तके, सीडी, धम्मध्वज-बिल्ले तसेच विज्ञानवादी विचार आधारित धम्म दिनदर्शिका विकत घ्याव्यात.
- या दिनी पिपाण्या वाजवू नये. घोषणा देऊ नयेत, जुने कपडे विकत घेऊ नये.
- परिसरात मनोरंजनाच्या साधनांची विक्री करू नयेत.
- बेवारस वस्तूंना हात लावू नये.
- मद्यपान आणि धूम्रपान करू नये.
- रहदारीच्या मार्गामध्ये घोळक्याने उभे राहू नये अथवा अडथळा करू नये.
- स्टॉलमध्ये कुठल्याही प्रकारचे

(सरचिटणीस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती)
संपर्क: ९८१९४९०८६८



# ‘इंडियाज् हार्ट, नागपूर स्मार्ट’

**‘इंडियाज् हार्ट, नागपूर स्मार्ट’ असे ब्रीद घेऊन महाराष्ट्राच्या उपराजधानीची अर्थात नागपूर शहराची वाटचाल ‘स्मार्ट सिटी’च्या दिशेने सुरू आहे. महाराष्ट्रातील दहा शहरे जरी केंद्र शासनाच्या १०० स्मार्ट शहरांच्या यादीत असली तरी नागपूरकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघितले जाते. त्याला कारणही तसेच आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे शहर म्हणून नागपूरची ओळख आहे. त्यामुळे केवळ राज्याचे नव्हे तर देशाचे लक्ष भविष्यातील ‘स्मार्ट सिटी’ म्हणून नागपूरकडे लागले आहे.**

**अश्विन मुद्‌गल**

एव्हाना स्मार्ट सिटी म्हणजे काय, स्मार्ट सिटीमध्ये काय सुखसुविधा, मूलभूत सुविधा असायला हव्यात याची व्याख्या किंवा ही संकल्पना सर्वांनाच माहीत झाली आहे. स्मार्ट सिटी म्हणून विकसित होताना किती गतीने कोणत्या शहरातील कामे होत आहेत याकडे आता बघितले जाते. यात नागपूरचे नाव अग्रस्थानावर आहे.

गेल्या काही वर्षांत नागपूरचा ज्या वेगाने विकास होत आहे त्याची चर्चा अख्ख्या देशात आहे. ‘स्मार्ट सिटी’ प्रकल्पामुळे या शहराच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे, नवा आयाम मिळाला आहे. राजकीय इच्छाशक्तीसोबतच प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग ह्यामुळेच या शहराच्या विकासाचा वेग वाढला.

नागपूर शहर ‘स्मार्ट सिटी’ म्हणून विकसित करण्याचे घोषित झाल्यानंतर त्याअंतर्गत टप्प्याटप्प्याने विविध प्रकल्पांचे काम नागपूर शहरात सुरू झाले. ‘नागपूर सेफ ॲण्ड स्मार्ट सिटी’, ‘एरिया बेस्ड डेव्हलपमेंट’ या दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे काम सध्या नागपूर शहरात प्रगतिपथावर आहे. याव्यतिरिक्त ‘स्मार्ट सिटी’ अंतर्गत स्मार्ट वाहतूक व्यवस्था (Mobility), स्मार्ट पर्यावरण (Environment), स्मार्ट पायाभूत सुविधा (Infrastructure) आणि स्मार्ट प्रशासन (Governance) या चतु:सूत्रींवर शहराचा विकास होत आहे.

### नागरिक केंद्रबिंदू

नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पात सर्वात महत्त्वाचा दुवा लोकसहभागाचा आहे. स्मार्ट सिटी अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या प्रत्येक प्रकल्पात नागपूर महानगरपालिकेने लोकसहभागाला विशेष महत्त्व दिले आहे. स्मार्ट सिटीचा प्रकल्प शासनाकडे


आकाशवाणी चौक

पाठवण्यापूर्वी त्याबाबत लोकांची मते जाणून घेतली. 'स्मार्ट सिटी'बाबत लोकांच्या संकल्पना आणि सूचना जाणून घेतल्या. या सूचनांचा समावेश शासनाकडे पाठवण्यात आलेल्या प्रस्तावात करण्यात आला. यानंतर चौकाच्या सौंदर्यीकरणासाठी आयोजित केलेली ग्राफिटी स्पर्धा असो, कस्तुरचंद पार्कच्या सौंदर्यीकरणासाठी आयोजित केलेली डिझाईन स्पर्धा असो की, स्मार्ट सिटी आयडिया चॅलेंज स्पर्धा असो; यांना नागपूरकरांचा उदंड प्रतिसाद लाभला.

## एरिया बेस्ड डेव्हलपमेंट

शहरातील ज्या भागाचा नियोजनबद्ध विकास झाला नाही असा भाग निवडून त्या भागासाठी 'टाऊन प्लानिंग स्कीम' तयार करणे. त्या भागाचा क्षेत्राधिष्ठित विकास करून मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे, हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

या प्रकल्पांतर्गत पारडी-भरतवाडा-पुनापूर व भांडेवाडी या क्षेत्राची निवड करण्यात आली आहे. सुमारे १२४० एकर क्षेत्राचा क्षेत्राधिष्ठित विकास याअंतर्गत करण्यात येत आहे. एकूण जागेपैकी ६० टक्के क्षेत्रावर वस्ती असून ४० टक्के क्षेत्र मोकळे आहे. अहमदाबाद येथील एचसीपी डिझाईन, प्लानिंग ॲण्ड मॅनेजमेंट प्रा.लि. या संस्थेकडे नगररचना परियोजना (टीपीएस) तयार करण्याचे काम सोपवण्यात आले आहे. जून २०१७ मध्ये क्षेत्राधिष्ठित विकासांतर्गत पारडी-भरतवाडा-पुनापूर, भांडेवाडीसाठी टीपीएस तयार करण्याचा उद्देश असल्याची अधिसूचना जारी झाली. यानंतर या भागाच्या सर्वेक्षणाचे कार्य सुरू झाले असून, सर्वेक्षणानंतर टाऊन प्लानिंग स्कीमचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल. हा संपूर्ण प्रकल्प ८१६ कोटींचा आहे.

## 'सेफ ॲण्ड स्मार्ट सिटी'

नागपूर स्मार्ट सिटी अंतर्गत 'नागपूर सेफ ॲण्ड स्मार्ट सिटी' ह्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम सध्या प्रगतिपथावर आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत १ जानेवारी २०१७ रोजी या प्रकल्पाचा शुभारंभ झाला. नागपूर शहरातील सुमारे ७०० ठिकाणी ३८०० सीसीटीव्ही कॅमेरे लावून, त्या माध्यमातून वाहतूक नियंत्रित करणे आणि गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे हा या प्रकल्पामागचा उद्देश आहे. याअंतर्गत नागपूर शहरात कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटर तयार करण्यात येत आहे. पोलीस आयुक्तालय यांच्याकरिता तयार करण्यात येत असलेल्या या केंद्रामुळे गुन्ह्यांची तत्काळ उकल करणे व गुन्हेगारीवर नियंत्रण प्रस्थापित करणे शक्य होणार आहे. यावर नागपूर महानगरपालिकेचीही नजर राहणार असून, त्यासाठी 'सिटी ऑपरेशन सेंटर' सज्ज होत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे सुनियोजितपणे संचालन करणे आणि वाहतुकीच्या नियमांचा भंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणे या कंट्रोल सेंटरमुळे आणि सिटी ऑपरेशन सेंटरमुळे शक्य होणार आहे.

शहरातील ७० टक्के भागात कॅमेरा लावण्याचे कार्य पूर्ण झाले आहे तर कंट्रोल सेंटरचे कार्य प्रगतिपथावर आहे. हा संपूर्ण




संविधान चौक (हिरवाईने नटलेले रुंद रस्ते ही नागपूरची ओळख आहे.)

## स्मार्ट शहरातील स्मार्ट वाहतूक

दोन महत्त्वाच्या प्रकल्पांसोबतच शहरातील इतर सोयीसुविधा 'स्मार्ट' करण्याच्या दिशेने काम सुरू झाले आहे. नागपुरातील नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर करावा, या दृष्टीने शहर बस वाहतूक स्मार्ट करण्याच्या दिशेने पावले उचलली जात आहेत. ४३२ डिझेल बसेस सुरू करण्यात आल्या आहेत.

प्रकल्प ५२० कोटींचा असून एल.अ‍ॅण्ड टी. कंपनी प्रकल्पाचे कार्यान्वयन करीत आहे. ई.वाय. (Ernst Young) ही कंपनी सल्लागार आहे.

### 'स्मार्ट स्ट्रीप'

नागपूर शहरातील जपानी गार्डन ते ऑरेंज सिटी हॉस्पिटल हा ६.३ कि.मीचा मार्ग 'स्मार्ट सिटी' प्रकल्पांतर्गत 'स्मार्ट स्ट्रीप' म्हणून विकसित करण्यात आला आहे. हा रस्ता 'स्मार्ट सिटी'चे 'मॉडेल ठरत आहे. या मार्गावर वाहतूक आणि गुन्हेगारी नियंत्रणासाठी कॅमेरे कार्यान्वित झालेले आहेत. याच मार्गावर 'वाय-फाय' सुविधा कार्यान्वित झाली आहे.

### पर्यावरणपूरक 'नागपूर मेट्रो'

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या 'नागपूर मेट्रो'ने सध्या वेग घेतला आहे. लोकमान्य नगर ते प्रजापती नगर आणि ऑटोमोटिव्ह चौक ते खापरी अशा दोन मार्गांवर धावणाऱ्या प्रस्तावित मेट्रोमुळे, भविष्यातील नागपूरचा वाहतूक समस्येचा प्रश्न मार्गी लागणार आहे. 'ग्रीनेस्ट मेट्रो' अशी ओळख मिळवित असलेल्या मेट्रोमुळे, पर्यावरणाचा समतोल राखण्यास मोठी मदत मिळणार आहे. मेट्रोची सर्व स्थानके निरनिराळ्या 'थीम'वर आधारित असून, यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. 'हेरिटेज वॉक' पर्यटकांसाठी भविष्यात पर्वणी ठरणार आहे.

### सांडपाणी पुनर्वापर प्रकल्प

नागपूर महानगरपालिकेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहावा असा १३० एमएलडी क्षमता असलेला, देशातील पहिला भांडेवाडी येथील सांडपाणी पुनःचक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्प; नागपूरकरांसाठी वरदान ठरणार आहे. या प्रकल्पामुळे शुद्ध पाण्याची बचत झाली असून ९ लाख लोकांना पुरेल एवढे पाणी उपलब्ध झाले आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी याचा फायदा होणार आहे. नागनदीच्या पाण्याचे प्रदूषण कमी करून, शुद्ध पाण्याची बचत याद्वारे होणार आहे. आगामी काळात सर्व राज्यात वीज प्रकल्प व औद्योगिक क्षेत्रात या 'नागपूर पॅटर्न'चा सर्वत्र वापर होणार आहे. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण योजनेंतर्गत, महानगरपालिका व महानिर्मिती यांच्या संयुक्त सहभागातून; १९५ कोटींचा हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पातील पाणी कोराडी येथील महानिर्मितीच्या वीज प्रकल्पाकरिता वापरण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे वैनगंगा नदीचे प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पामुळे नागपूर महानगरपालिकेला सांडपाण्यापोटी महानिर्मितीकडून दरवर्षी १५ कोटी रुपये मिळत आहेत. 'स्मार्ट नागपूर'च्या दिशेने



महापालिकेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे.

## ‘नागपूर पॅटर्न’ जगासाठी ‘मॉडेल’

स्मार्ट सिटी प्रकल्पात नागपूर शहराची निवड झाल्यानंतर, ज्या वेगाने येथील कामे सुरू आहेत; ते बघून आता देशातील इतर शहरेच नव्हे तर जगातील काही शहरेसुद्धा आता नागपूरकडे आकर्षित होऊ लागली आहेत. या प्रकल्पांचा अभ्यास करण्यासाठी आणि येथे गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने फ्रान्स, मंगोलिया, जर्मनी, कोरिया आणि चीनच्या शिष्टमंडळाने नागपूरला भेट देऊन; येथे सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची पाहणी केली. एप्रिल महिन्यात नागपूरने पुढाकार घेऊन, ‘स्मार्ट सिटी समीट’चे आयोजन केले होते. यात स्मार्ट सिटीमध्ये निवड झालेल्या देशांतील विविध शहरांतील महापौर व आयुक्तांना आमंत्रित करण्यात आले होते. यात सहभागी झालेल्या महापौर आणि आयुक्तांनी नागपुरातील प्रकल्पांची पाहणी करून, समाधान व्यक्त केले. ‘नागपूर पॅटर्न’ने त्यांच्या शहरात कार्य करण्याची तयारी त्यांनी दर्शवली.


जनरल पोस्ट ऑफिस चौक

## स्मार्ट प्रशासन

नागपूर स्मार्ट करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावणारे नागपूर महानगरपालिका प्रशासनही, पूर्णपणे स्मार्ट झाले आहे. येथील प्रत्येक कार्याचे आता डिजीटायझेशन होत आहे. देशातील प्रगत तंत्रज्ञानाचा वापर ‘स्मार्ट प्रशासन’साठी करण्यात येत आहे. यासाठी महापालिका


फुटाळा तलाव

प्रशासनाने इस्रायलच्या तेल अव्हीव शहराची मदत घेतली. तेल अव्हीव या शहराच्या महापालिकेचे नॉलेज ऑफिसर झोअर शेरॉन यांनी या कार्यात सहकार्य केले.

### वन ग्लोब ॲवार्ड

देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्ती, संस्था, राज्य आणि प्रकल्पांना वन ग्लोब फोरमतर्फे 'वन ग्लोब ॲवार्ड' देऊन सन्मानित करण्यात येते. या वर्षी नागपूर महानगरपालिकेने हा पुरस्कार पटकाविला आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पातील यशस्वी पुढाकारासाठी नवी दिल्ली येथे नागपूर मनपाला सन्मानित करण्यात आले.

केंद्रीय माहिती व तंत्रज्ञान राज्यमंत्री पी.पी. चौधरी यांच्या हस्ते वितरित करण्यात आलेला पुरस्कार, नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे यांनी स्वीकारला. 'नागपूर स्मार्ट ॲण्ड सेफ सिटी' प्रकल्पांतर्गत नागपूर शहरात राबवण्यात येत असलेल्या उपक्रमांसाठी हा पुरस्कार देण्यात आला. नागपूर महानगरपालिकेसोबतच राज्याच्या माहिती व तंत्रज्ञान विभागालाही पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. 'स्मार्ट' राज्य म्हणून सक्षम करण्यात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल, हा पुरस्कार देण्यात आला. यासोबतच नागपूर शहराला अत्याधुनिक पायभूत सुविधा आणि तंत्रज्ञान विकासासाठी 'इकॉनॉमिक्स ॲवार्ड' देऊन सन्मानित करण्यात आले. या सन्मानामुळे स्मार्ट सिटीकडे वाटचाल करणाऱ्या नागपूर शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

(आयुक्त, महानगरपालिका नागपूर)



## 'वाय-फाय'युक्त नागपूर

बदलत्या हायटेक युगानुसार स्वत:मध्ये बदल घडवणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने नागपूरकरांना 'स्मार्ट सिटी'अंतर्गत 'हायटेक' करण्याचा प्रयत्न नागपूर महानगरपालिका करीत आहे. संपूर्ण शहर 'वाय-फाय'युक्त करण्याचे कार्य प्रगतिपथावर असून पहिल्या टप्प्यात शहरातील काही भागात ही सेवा सुरू झाली आहे.

## ग्रीन बस आणि इलेक्ट्रिक टॅक्सी

पर्यावरणाचा समतोल राखण्यात नागपूर अग्रस्थानी राहावे यासाठी पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेवर भर देण्यात येत आहे. ग्रीन बसेस शहर बस वाहतुकीत दाखल झाल्या आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकारातून, आता शहरात देशातील पहिल्या इलेक्ट्रिक टॅक्सी व्यवस्थेचा शुभारंभ झाला. 'ओला' आणि 'महिंद्रा' कंपनीच्या सहकार्याने सुमारे २०० वर इलेक्ट्रिक टॅक्सींची भर शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत पडली आहे. ई-रिक्षा मोठ्या प्रमाणात नागपूरच्या वाहतूक व्यवस्थेत पूर्वीपासून योगदान देत आहेत.





३० सप्टेंबर २०१७
हा दसऱ्याचा दिवस नागपूरच्या इतिहासाला वेगवान वर्तमानाची जोड देणारा ठरला. नागपूरच्या वेगाने त्या दिवशी खऱ्या अर्थाने सीमोल्लंघन केले. विदर्भाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने दसऱ्याच्या या दिवसाची नोंद झाली. स्वप्न आणि वास्तव यातील भेदाभेद मिटवून नागपूरची 'माझी मेट्रो' धावू लागली. शहराचे चित्र बदलणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, केवळ २७ महिन्यांत साडेपाच कि.मी.च्या ट्रायल रनला सुरुवात झाली आहे.

# प्रारंभ नव्या युगाचा...





**रघुनाथ पांडे**

नागपूरमध्ये जगाला बोध देणारी सामाजिक व राजकीय क्रांती झाली, नवप्रेरणांची बीजे पेरली गेली, त्याच भूमीत नवतंत्राच्या ताकदीवर वेगासोबत स्पर्धा सुरू झाली, माझी मेट्रो धावली! भारतीय स्टेट बँकेच्या निवृत्त अध्यक्ष अरुंधती भट्टाचार्य यांचे नागपूरच्या वेगाबद्दलचे निरीक्षण तंतोतंत खरे आहे. काळ बदलला, त्यासोबत नागपूरने वेग बदलला. त्या म्हणाल्या, '५०वर्षांपूर्वी नागपूरला स्कूटर चालविणारी महिला प्रथम बघितली होती. त्या वेळी नागपूर हे प्रगतीच्या पुढे होते आणि मेट्रोमुळे आजही प्रगतीच्या खूप पुढे असणारे शहर आहे.'

## अचंबित करणारी वैशिष्ट्ये

या मेट्रोची वैशिष्ट्ये अचंबित करणारी आहेत. मेट्रो रेल्वेच्या डब्यांना बाहेरून सजविताना त्यामधून संस्कृती, निसर्ग यांचे दर्शन होते. पहिल्या डब्यावर नर्तकीचे चित्र. महाराष्ट्राची परंपरा आणि संस्कृती यांचे जतन करण्याच्या उद्देशाने हे चित्र प्रदर्शित केले आहे. दुसरा डबा पर्यावरण रक्षणाचा तसेच निसर्ग संवर्धनाचा संदेश देणारा असून, त्यावर फळांनी लगडलेले संत्र्याचे झाड आहे. सोबतच वन्यपशू संरक्षण आणि जतनाचे महत्त्व दर्शवण्यासाठी वाघिणीसह बछडादेखील या डब्यावर चित्रित केला आहे. तिसऱ्या डब्यावर सौर ऊर्जा आणि हरित वातावरणाचे महत्त्व दर्शवण्यात आले असून, मेट्रोच्या वतीने सौर ऊर्जेला विशेष महत्त्व देण्यात येत आहे, ज्यातून पर्यावरण रक्षणासह ऊर्जा बचतीचा संदेश दिला आहे.

## मूलभूत सोयीसुविधा

नागपूर हे देशाचे मध्यवर्ती शहर असून, आजूबाजूच्या सहा राज्यांमधून येणारे नागरिक या शहरातच आता आश्रय शोधू लागले आहेत. रोजगाराच्या संधी या ठिकाणी निर्माण होण्याची शक्यता वाढल्याने साहजिकच यामुळे नागपूर गजबजू लागले आहे. केंद्रीय-राज्य स्तरावरील विविध नामांकित संस्था, देश व विदेशातील मोठ्या उद्योगांचे नियोजन व त्यासोबतच आंतरराष्ट्रीय पातळीवरील शैक्षणिक व वैद्यकीय संस्थांचे वाढणारे जाळे यांचे नागपूरच्या नकाशावरील अस्तित्व; या शहरावरचा सर्वच स्तरांतील ताण वाढवणारे आहे. त्यामुळे मूलभूत सोयी व त्यासुद्धा पुढील पन्नास वर्षांचे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवल्याखेरीज, नागपूर टिकाव धरू शकणार नाही; हेच सध्याचे वास्तव आहे. त्यामुळे वेगाची स्पर्धा आली व त्याच गतीने शहराला धावते ठेवण्यासाठी मेट्रो रेल्वे नितांत गरजेची बनली.

## गुणवत्तापूर्ण कामे

मेट्रो हे केवळ जलद वाहतुकीचे साधन नव्हे तर नव्या अत्याधुनिक परिवहन संस्कृतीचे प्रतीक आहे. देशातील विविध मेट्रो प्रकल्पांमध्ये नागपूर मेट्रो हा एकमेव असा प्रकल्प आहे, ज्यामध्ये प्रतिकूल परिस्थिती असतानादेखील, कमी कालावधीत गुणवत्तापूर्ण कामे करून; आरडीएसओची (रेल्वे संशोधन व मानके निर्देशांक संस्था) परवानगी प्राप्त झाली आहे. चेन्नई, बेंगलुरु, कोची, जयपूर या महानगरांच्या तुलनेत नागपूर मेट्रोला फक्त सहा ते आठ महिन्यांमध्ये, सात प्रकारच्या तांत्रिक पडताळणी केल्यानंतर ही परवानगी मिळाली. नागपूर मेट्रोच्या कामाचा प्रारंभ करताना, दोन वर्षांमध्ये नागपूर मेट्रो ट्रायल रन सुरू करण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला होता, तो विश्वास सार्थ करण्यासाठी महामेट्रो प्रशासनाने शर्थीचे प्रयत्न केले. मिहान डेपो ते विमानतळ दक्षिण स्थानकापर्यंतचा हा मार्ग प्रथमतः पूर्ण झाला.

राज्यातील मेट्रो पर्वामुळे पर्यावरणाचे संवर्धन होण्यास सुरुवात झाली. मेट्रोमुळे पर्यावरणातील कार्बन फूटप्रिंट कमी होण्यास मोलाची मदत होणार आहे. व्यावसायिक दृष्टीने हा प्रकल्प फायद्यात राहण्यासाठी



नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पामुळे जलद दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध होणार असून, या प्रकल्पामुळे २० हजार लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच मेट्रो रेल्वेस्टेशनच्या माध्यमातून अत्याधुनिक सेवा व सुविधा उपलब्ध होत असल्यामुळे, हा प्रकल्प आर्थिक विकासाचे ग्रोथ इंजिन आहे. सर्वांच्या स्वप्नातील माझी मेट्रो वेगाने आकार घेत आहे. या वेगाने देशातल्या कोणत्याही मेट्रोचे काम पुढे गेले नाही.

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**



विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. शहराचा संपूर्ण विकास झाला, अशी स्थिती कधीच येऊ शकत नाही. तरीही किमान सुविधा मिळाल्या पाहिजेत, अशी माझी धारणा आहे. भविष्यातील नागपूर शहराचा विकास गृहीत धरून, मेट्रोचे जाळे विस्तारले जाण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि कार्गो हबमुळे येत्या पाच वर्षात ५० हजार युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. मेट्रो रेल्वे ही रोजगार व मूलभूत सुविधा या मालिकेतील एक साखळी आहे.

**– नितीन गडकरी, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री**

जाहिराती, व्यावसायिक जागा, स्थानकांचे नामकरण यातूनही नागपूर मेट्रोचा महसूल मिळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## काळ व वेगाची धडाडी

३८ किलोमीटरच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पाला राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने ३० जानेवारी २०१४ रोजी मान्यता दिली. केंद्र शासनानेही त्यानंतर २१ ऑगस्ट २०१४ रोजी प्रकल्पाला हिरवी झेंडी दाखवल्याने नागपुरात मेट्रो धावण्याचे निश्चित झाले. डिसेंबर २०१८ मध्ये प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवण्यात आले.

प्रकल्प डिसेंबर २०१८ मध्ये पूर्ण करण्यासाठी ८ हजार ६८० कोटी रुपयांची गरज आहे. २० टक्के वाटा प्रत्येकी केंद्र सरकार आणि राज्य सरकारचा आहे. ५ टक्के वाटा प्रत्येकी नागपूर सुधार प्रन्यास आणि नागपूर महापालिकेचा आहे. उर्वरित ५० टक्के म्हणजे ४ हजार ५२१ कोटी रुपये कर्ज असणार आहे.

दहा टक्क्यांची बचत ऑटोमोटिव्ह चौक ते मिहान आणि प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर या ३८ किलोमीटरच्या मेट्रो रेल्वे मार्गाचे बजेट ८ हजार ६८० कोटी रुपये आहे. वेळेत काम करणे, योग्य नियोजन यामुळे प्रकल्पाच्या किमतीत साडेआठ टक्क्यांची बचत करणे शक्य झाल्याचा दावा मेट्रोने केला आहे. प्रकल्प पूर्ण होईपर्यंत १० टक्क्यांची बचत करण्याचे उद्दिष्ट आहे. मोटरमॅन गेट उघडण्यासाठी मेट्रो चालविण्यासाठी महामेट्रोला २५० कॅब ड्रायव्हरची (मोटरमॅन) गरज भासणार असून, पैकी २५ कॅब ड्रायव्हर अनुभवी असतील. नेमणूक झाल्यानंतर त्यांना २०० ते २५० तासांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मात्र मेट्रो रेल्वेच्या कॅब ड्रायव्हरकडे केवळ गेट उघडणे आणि बंद करण्याची जबाबदारी राहणार आहे. मेट्रो रेल्वे पूर्णत: स्वयंचलित राहणार असून, मुंजे चौकातून मेट्रो रेल्वेचे पूर्ण नियंत्रण करण्यात येणार आहे.

## एटीओ तंत्रज्ञानाने नियंत्रण

मेट्रो रेल्वेमध्ये ऑटोमेटिक ट्रेन ऑपरेशन (एटीओ) तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. मेट्रो रेल्वेच्या वेळापत्रकासह सर्व कार्यक्रम यात नोंद केले जाणार आहेत. मुंजे चौकातून मेट्रो रेल्वेचे नियंत्रण होणार असून, वेळेनुसार मेट्रो धावायला सुरुवात करेल आणि थांबेल. आपत्कालीन स्थितीत गाडी थांबवण्याची गरज पडल्यास केवळ मोटरमॅन गाडी थांबवेल. खापरी ते एअरपोर्ट हा साडेपाच किमीच्या मार्गावर मात्र मेट्रो स्वयंचलित नसेल.

## गर्दी वाढल्यास पुशर

मेट्रो रेल्वेचा प्रवासी वाढल्यास दरवाज्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असते. भारतीय रेल्वेमध्ये दरवाज्यात उभे राहून मृत्यू होण्याचाही धोका असतो. मेट्रो रेल्वेचे गेट स्वयंचलित बंद होणार असल्याने हा धोका राहणार नाही. स्टेशनवर गर्दी वाढल्यास मेट्रोमध्ये बसताना त्यांना ढकलण्यासाठी जापानच्या धर्तीवर पुशर ठेवण्यात येणार आहे.

## इंटर मॉडेल स्टेशन

वाहतुकीवरील ताण कमी व्हावा, प्रवाशांना एकाच ठिकाणी वेगवेगळ्या सार्वजनिक वाहतूक सुविधांचे लाभ घेता यावेत यासाठी; अजनी परिसरात म्हणजेच नागपूर मध्यवर्ती कारागृहाच्या जागेवर इंटर मॉडेल स्टेशन तयार करण्याची योजना आखण्यात येत आहे. बस, रेल्वे आणि मेट्रोचीही कनेक्टिव्हिटी या ठिकाणी असणार आहे. अजनी परिसरात रेल्वेची ४५० एकर, तसेच लगतची कारागृहाची सुमारे १५० एकर जागाही; या प्रकल्पासाठी वापरण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे इंटर मॉडेल स्टेशन तयार करण्याच्या या प्रकल्पासाठी ९७५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. इंटर मॉडेल स्टेशनमुळे लाखो प्रवाशांचा वावर कमी होणार आहे. खापरी, नागपूर, इतवारी, अजनी स्टेशन त्या दिशेने विकसित करण्यात येणार आहे.



स्मार्ट विदर्भ सुंदर विदर्भ

इंटर मॉडेल स्टेशनसाठी जागा उपलब्ध करून देण्यास राज्याने होकार दिला आहे.

### गरज १८ मेगावॅट

मेट्रो रेल्वेची सरासरी विजेची गरज १८ मेगावॅट आहे. अधिकाधिक मागणी म्हणून २५ मेगावॅट निर्धारित करण्यात आले आहे. कार्यालयाला जाण्याची सकाळची वेळ आणि सायंकाळी विजेची मागणी सर्वाधिक असेल. सल्लागाराने दिलेल्या अहवालानुसार सौरऊर्जेच्या माध्यमातून १४ मेगावॅट वीज प्राप्त होणार आहे. स्टेशनच्या छतावर, संरक्षक भिंतीवर आणि डेपोच्या खुल्या जागेवर सोलर पॅनल लावून, सौरऊर्जा निर्माण करण्यात येणार आहे. सकाळी ९ पूर्वी आणि सायंकाळी ५ नंतर लागणारी वीज ग्रीडवरून घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सौर ऊर्जेच्या माध्यमातून या प्रकल्पासाठी लागणाऱ्या विजेपैकी जवळपास ६५ टक्के वीज मिळवण्याचे प्रयत्न होत आहेत.

### नागरिकांच्या तक्रारींसाठी समिती

नागरिकांच्या सूचनेशिवाय व त्यांच्या सहभागाविना हा प्रकल्प पुढे जाणे शक्य नाही. त्यामुळे त्यांना विश्वासात घेऊन, मेट्रोच्या कामाबाबत तक्रारींचे निराकरण व्हावे म्हणून; महामेट्रोच्या वतीने ३ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीत मुख्य प्रकल्प व्यवस्थापक, महाप्रबंधकांचा (प्रशासन) समावेश आहे. पुढच्या काळात मेट्रो रेल्वेचा नियंत्रण कक्ष २४ तास सुरू राहील. त्यातून नागरिकांना तक्रारी दाखल करता येतील तसेच 'माय स्टेशन माय कॉलेज' या उपक्रमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांना या उपक्रमाशी जोडण्यात येईल.

### महाकार्ड

मेट्रोच्या 'महाकार्ड'च्या माध्यमातून प्रवाशांना तिकिटासह टॅक्सी भाडे, वाहनतळ शुल्कदेखील देता येणार आहे. मॉल, रेस्टॉरंटमध्ये व्यवहार या कारणांसाठीदेखील त्याचा वापर करता येईल. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सहकार्याने हे कार्ड तयार झाले आहे. या कार्डाद्वारे रेल्वेसह सर्व सुविधांसाठी कार्डाचा वापर होणार आहे. असेच महामोबिलिटी कार्ड राज्यातील सर्व मेट्रो, बस, टोल नाके, महानगरपालिका आदींसाठी एकत्रितपणे संपूर्ण राज्यात लागू करण्यात यईल.

### इको पार्क

स्मार्ट सिटी म्हणून विकसित होत असलेल्या नागपुरात पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी इको पार्क साकारला जात आहे. मिहान परिसरातील १३ एकर जागेवर तो आकारास येईल. मेट्रोच्या दुसऱ्या फेजमध्ये तो विकसित केला जाईल.

### देशातील पहिली बिम ॲकॅडमी

देशातील पहिली महामेट्रो बिम अकॅडमी सुरू करून महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. वेगवेगळ्या देशातील मेट्रो प्रकल्पात या तंत्रज्ञानाचा परिणामकारक वापर झाल्याने, या तंत्राचा उपयोग नव्या मेट्रोसाठी महत्त्वाचा ठरेल. महामेट्रो प्रकल्पासाठी ५ डी बिम तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे. प्रकल्पाचे डिझाईन तयार करणे, खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे, वेळेची बचत करणे आणि व्यवहारात पारदर्शकता निर्माण करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर होत आहे.

**(संपादक, दै. पुण्यनगरी, विदर्भ आवृत्ती)**



नागपूर मेट्रोसाठी तयार होत असलेल्या डबर डेकर पुलाचे संकल्प चित्र.


बुटीबोरी एमआयडीसी

**एकेकाळी संपूर्ण मध्य भारताची प्रमुख बाजारपेठ नागपूरच्या निमित्त विदर्भात होती. अनेक दशकांपासून विदर्भ आर्थिकदृष्ट्या माघारलेला होता. मात्र मागील तीन वर्षात नागपूरसह संपूर्ण विदर्भानेच आर्थिक क्षेत्रात कात टाकायला सुरुवात केली आहे. रिलायन्स, वेदांता, सीअॅट किंवा नांदगावपेठचा भव्य असा वस्त्रोद्योग पार्क, अशा सर्वांच्याच निमित्त विदर्भ आता आर्थिक स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे.**

# आर्थिक स्वयंपूर्णतेकडे

**चिन्मय काळे**

देशाच्या बरोबर केंद्रस्थानी असलेले शहर म्हणजे नागपूर. या शहरातील महत्त्वाकांक्षी मिहान प्रकल्पाच्या आर्थिक क्षेत्राला विकासाचे सर्वात मोठे इंजिन रिलायन्समुळे लागले. मिहानच्या रूपात हवाई क्षेत्राचा हब म्हणून ठसा उमटवत असतानाच, याच मिहानमधील विशेष आर्थिक क्षेत्रात अर्थात सेझमध्ये अनिल धिरुभाई अंबानी यांच्या रिलायन्स डिफेन्स या कंपनीला आणण्याचे मोठे यश सरकारने प्राप्त केले. अनिल अंबानी यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते व जल वाहतूकमंत्री नितीन गडकरी, राज्याचे उद्योग मंत्री सुभाष देसाई, नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह लोकप्रतिनिधींच्या साक्षीने हा प्रकल्प नागपुरात आला. त्यानंतर रिलायन्स डिफेन्सने त्यांच्या रिलायन्स एअरोस्ट्रक्चर या कंपनीमार्फत तब्बल साडे सहा हजार कोटी रुपये गुंतवून धिरुभाई अंबानी एअरोस्पेस पार्क उभारण्याची योजना तयार केली. त्यासाठी केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या मंजुरी मंडळानेदेखील (बोर्ड ऑफ अॅप्रूव्हल) अलीकडेच कंपनीच्या गुंतवणुकीला हिरवा कंदील दिला. त्यानंतर कंपनीने १०४ एकरांसाठी ६३ कोटी रुपये मिहानला विकसित करणाऱ्या महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे भरले. या १०४ एकरांवर आशियातील सर्वात अत्याधुनिक हवाई पार्क आता उभा राहणार आहे. विमान व हेलिकॉप्टर निर्मिती, हेलिकॉप्टरच्या पंखांची निर्मिती, सुटे भाग तयार करणे, विमानांचे परिचालन करणाऱ्या यंत्राची निर्मिती, विमान देखभाल व दुरुस्ती केंद्र अशी नानावीध युनिट्स व प्रकल्पांची उभारणी तेथे होईल. १० हजारांचा थेट रोजगार आणि पुढील ३० वर्षात २ लाख कोटी रुपयांची भव्य उलाढाल या एअरोस्पेस पार्कच्या माध्यमातून होणार आहे.

### विकासाची झेप

कुठल्याही प्रदेशाचा विकास हा विमानतळावर अवलंबून असतो. नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ हे आता विकासाची झेप घेत आहे. यानिमित्ताने संपूर्ण विदर्भाच्या

कार्गो हब आणि सर्वच प्रकारच्या भूविकासाला चालना मिळणार आहे. २००९ नंतर पाच वर्षात अपेक्षित असलेली नागपूरच्या या विमानतळ विकासाची निविदा अखेर २०१६ मध्ये सरकारने मार्गस्थ केली. हजारो कोटी रुपये गुंतवणुकीची ही निविदा मागील वर्षी निघाली. टाटा रिॲलिटी, जीएमआर, जीव्हीके, एस्सार इन्फ्रा व पीएनसी इन्फ्राटेकसारख्या पाच नामांकित कंपन्या या विमानतळ विकासासाठी अंतिम शर्यतीत आहेत. चार टप्प्यांत १९८२ कोटी रुपयांचा विमानतळ विकास साधला जाणार आहे. त्यात पहिला टप्पा १४२० कोटी रुपयांचा असेल. दोन समांतर धावपट्या, २ लाख चौरस मीटरवरील प्रवासी टर्मिनल इमारत, कार्गो इमारत, बहु विमाने उभे करण्याची सोय असे विमानतळाचे स्वरूप असेल.

नागरिकांची पर्यावरण जनसुनावणीदेखील सकारात्मक वातावरणात पार पडली. त्याद्वारे तब्बल साडे चौदा हजारांचा रोजगार मार्गस्थ होणार आहे. ५० एकरांवर स्वत:चा कॅप्टीव्ह ऊर्जा प्रकल्पदेखील वेदांता कंपनी उभा करणार आहे. वेदांता समूहांतर्गत ट्वीनस्टार टेक्नॉलॉजी डिस्प्ले कंपनी हा प्रकल्प उभा करणार आहे.

## नांदगावपेठ : महाराष्ट्राचे मॅन्चेस्टर

अमरावतीजवळील नांदगावपेठ हा वस्त्रोद्योगाचा हब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने आकारास येत आहे. वस्त्रोद्योगातील नामांकित कंपन्यांनी येथे १५०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. आठ कंपन्या आतापर्यंत येथे आल्या असून ५ हजारांचा रोजगार निर्मित झाला आहे. अशा प्रकारचे आठ वस्त्रोद्योग पार्क

पुण्याच्या रुद्र फार्म्स या कंपनीने गोंदियातील देवरी येथे १०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची योजना आखली आहे. त्याद्वारे १२० जणांना रोजगार मिळणार असून या कंपनीत तांदुळापासून स्वीटनर तयार होईल.

## उमरेडला संजीवनी

नागपूर जिल्ह्यातील उमरेड औद्योगिक वसाहत ही विदर्भातील महत्त्वाच्या वसाहतींपैकी एक. याच उमरेडला १७०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची संजीवनी



मिहान प्रकल्प

## 'वेदांता'ने केले नागपूरकडे कूच

बुटीबोरी औद्योगिक वसाहत हे आशियातील एकमेव पंचतारांकित उद्योग क्षेत्र. याच बुटीबोरीत ३०० एकरांवर तब्बल साडे सोळा हजार कोटी रुपयांचे तोरण 'वेदांता'च्या निमित्त लागत आहे. अत्याधुनिक एलईडी टीव्हीसाठीचे पॅनेल्स तयार करण्यासाठी वेदांता समूहाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी करार केला होता. यानंतर आता वेदांताने हा प्रकल्प बुटीबोरीत उभा करण्याच्या जलद हालचाली केल्या आहेत. परिसरातील

संपूर्ण राज्यात उभे होणार आहेत. त्यापैकी यवतमाळ आणि बुलडाणा येथेदेखील असेच वस्त्रोद्योग पार्क उभे राहणार आहेत. नांदगावपेठच्या निमित्त विदर्भ महाराष्ट्राचा मॅन्चेस्टर होऊ घातला आहे.

## गोंदियात राईस मिल

विदर्भाचा भंडारा-गोंदिया हा भाग तांदूळ अर्थात धानशेतीने समृद्ध असा प्रदेश. येथील धान उत्पादक शेतकऱ्याला संजीवनी देणारा राईस मिल हब सरकारच्या प्रयत्नातून तेथे उभा होत आहे. याद्वारे तांदुळावरील प्रक्रिया उद्योग तेथे उभे होणार आहेत.

मिळाली आहे. गुजरात फॉईल्स या कंपनीने येथे २६ एकरांवर ॲल्युमिनीअम फॉईल तयार करण्याची योजना आखली आहे. वर्षाला ६० हजार टन फॉईल्स तयार करण्याची या कारखान्याची क्षमता असेल. त्यासाठी कंपनीने नाल्को आणि हिंदाल्कोकडून कच्चे ॲल्युमिनियम खरेदी करण्याची योजना आखली आहे.

(उपमुख्य उपसंपादक, दै. लोकमत, मुंबई)

# समृद्ध शैक्षणिक केंद्र

**देशातील महत्त्वाचे 'एज्युकेशन हब' म्हणून नागपूर नावारूपास आले आहे. मिहानमध्ये मोठ्या गुंतवणुकी सुरू झाल्या आहेत. उत्तम रस्ते, मेट्रोसारखी दळणवळणाची सोय, राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्था यामुळे आता नागपुरातील विद्यार्थी कुठे बाहेर जाणार नाहीत. किंबहुना बाहेरील विद्यार्थी येथे येतील.**

**विकास वैद्य**

बंगलोर, हैदराबाद पाठोपाठ पुण्यात सॉफ्टवेअर कंपन्यांनी गुंतवणूक केली आणि नोकरीसाठी महाराष्ट्र राज्यातील इतर ठिकाणच्या तरुणतरुणींची पुण्याकडे एकच झुंबड उडाली. नागपुरातील तरुणतरुणीही उच्च शिक्षणासाठी पुण्याकडे जाऊ लागल्या. हे सर्व सुरू असतानाच नागपुरातील विविध क्षेत्रातून ओरड सुरू झाली की, येथील शिक्षणाचे काय? नागपुरातील शिक्षणाचा दर्जा कधी वाढणार? चांगल्या संस्था नसतील तर मुले शिकायला कशी येणार? मुले शिकायला येणार नाही तर उत्तम कंपन्या नागपुरात गुंतवणूक कोणाच्या भरवशावर करणार? कारण कंपन्यांना मनुष्यबळ हे लागणारच. हे सर्व सुरू असतानाच केंद्रात व राज्यात सत्ताबदल झाला. नागपुरातील दोन महत्त्वाचे नेते - देवेंद्र फडणवीस आणि नितीन गडकरी मोठ्या पदावर विराजमान झाले आणि नागपुरात प्रगतीचे पडघम वाजू लागले.

दरम्यानच्या काळात नागपुरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे दोन भाग झाले. एक भाग गडचिरोली मध्ये गोंडवाना विद्यापीठाच्या नावाने स्थापित झाला आणि एक भाग नागपुरात राहिला. महाविद्यालयांचेही विभाजन झाले. चंद्रपुरातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पूर्वी नागपूर विद्यापीठात होते. परंतु चंद्रपूर हे गोंडवानामध्ये सहभागी झाल्याने नागपुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची उणीव निर्माण झाली. नागपुरात पूर्वी विश्वेश्वरय्या प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालय (व्हीआरसीई) होते. परंतु त्याचे रूपांतर अभिमत विद्यापीठात आणि नंतर राष्ट्रीय तांत्रिक संस्थेत (एनआयटी) झाल्याने नागपुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणणे गरजेचे होते. त्याप्रमाणे नागपुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन झाले. त्याने आता दुसऱ्या वर्षात पदार्पण केले आहे. व्हीएनआयटी वेगवेगळ्या स्तरावर नागपूरचा गौरव वाढवत असते.

### आयआयएम

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयानंतर एखादी व्यवस्थापन अथवा अभियांत्रिकी स्तरावरील आयआयटी अथवा आयआयएमसारखी संस्था नागपुरात आणण्यावर विचारमंथन झाले. त्यातून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) या संस्थेची स्थापना नागपुरात करण्यात आली. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाला जशी वर्धा रोडवर जागा मिळाली तशीच २०० एकर जागा आयआयएमला मिहानमध्ये देण्यात आली आणि तेथे बांधकामही सुरू झाले. दरम्यान आयआयएमचे प्रवेश थांबू नयेत म्हणून त्या संस्थेचे वर्ग व्हीएनआयटी परीसरात एका इमारतीत सुरू करण्यात आले. आयआयएम- अहमदाबाद ही नागपूर आयआयएम ची पालकसंस्था म्हणून काम करू लागली. देशातील विविध भागातील विद्यार्थी गुणवत्तेच्या आधारावर येथे प्रवेश घेत आहेत. त्या संस्थेचे हे तिसरे वर्ष सुरू आहे. मिहानमधील या संस्थेचे बांधकाम पूर्ण होईल आणि तेथे ती संस्था आपल्या जागी लवकरच स्थानांतरित होईल.

### आयआयआयटी

आयआयएम प्रमाणे आयआयटी आणणे शक्य झाले नसले तरी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन ॲण्ड टेक्नॉलॉजी (आयआयआयटी) मात्र नागपुरात आली. या संस्थेचेही हे तिसरे वर्ष सुरू आहे. आयआयआयटी ला बॅ. वानखेडे सूतगिरणी मागे वर्धा रोडवर १०० एकर जागा मिळाली आहे. त्यांचे वर्ग तात्पुरते बीएसएनएल च्या सेमिनरी हिल ट्रेनिंग सेंटर परिसरात सुरू आहेत. व्हीएनआयटी ही त्यांची पालकसंस्था आहे. डॉ. अश्विन कोठारी आणि डॉ.आतिश दर्यापूरकर त्यांचे काम बघत आहेत.



नागपूर आयआयएम विद्यार्थी

२०११ साली तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी नागपुरात राष्ट्रीय विधी विद्यापीठ सुरू करण्यात येईल अशी घोषणा केली होती. परंतु ते होऊ शकले नाही. नागपुरात त्यासाठी आंदोलन झाले. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती विकास सिरपूरकर यांनी तो प्रश्न उचलला आणि त्यांना तत्कालीन नागपूर हायकोर्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष अनिल मार्डीकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुरेपूर साथ दिली.

शेवटी नागपुरात महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापन झाले. मुंबई पाठोपाठ नागपूरला हे विद्यापीठ मिळाले. या विद्यापीठाला ७० एकर जागा आयआयआयटी ज्या ठिकाणी उभारले जाणार आहे त्याच्या मागच्या भागात देण्यात आली आहे. ही जागा मिळण्यासाठी विभागीय आयुक्त अनूप कुमार यांनी पाठपुरावा केला. हे विद्यापीठ सध्या जोतीच्या (ज्युडिशियल ऑफिसर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट) प्रांगणात सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शरद बोबडे या विद्यापीठाचे कुलपती आहेत तर डॉ.विजेंद्रकुमार त्याचे कुलगुरू आहेत.



## भारतीय आयुर्विज्ञान संस्था

वैद्यकीय शिक्षण संदर्भातही नागपूर भाग्यवान आहे. नागपुरात दोन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आहेत. एकाच शहरात दोन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये नागपुरातच आढळतात. त्याला जोडून नागपुरात आता अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स) सुरू होत आहे. एम्ससाठी सरकारने दीडशे एकर जागा मिहानमध्ये निश्चित केली आहे. परंतु एम्सचे वर्ग तात्पुरते नागपुरातील जुन्या मेडिकल परिसरात घेण्यात येतील.

सुरुवातीला ५० जागांपासून सुरुवात होईल. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून एम्सचे वर्ग नागपुरात सुरू होतील. या सर्व संस्थांसोबतच नागपुरात आणखी एक राष्ट्रीयस्तराची संस्था येऊ घातलेली आहे. तिचे नाव आहे राष्ट्रीय औषधी निर्माण अभियांत्रिकी संशोधन संस्था (एनआयपीईआर) या संस्थेचे नागपुरात लवकरच आगमन होईल आणि नागपुरातील शैक्षणिक वातावरणांत आणखी एका संस्थेची भर पडेल.

आयआयएम, एम्स, आयआयआयटी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, व्हीएनआयटी, राष्ट्रीय विधी विद्यापीठ यामुळे नागपूरची आता 'एज्युकेशन हब' होण्याकडे वाटचाल सुरू झाली आहे. नागपुरातील शैक्षणिक वातावरणात एक नवचैतन्य संचारले आहे. विद्यार्थ्यांचा ओघ, कंपन्यांची गुंतवणूक म्हणजेच रोजगार निर्मिती यामुळे नागपूर आता जगाच्या नकाशावर दिमाखाने झळकू लागले आहे.

## वैद्यकीय शिक्षण

विदर्भ हा शैक्षणिकदृष्ट्या सदैव समृद्ध राहिला आहे. अकोला, यवतमाळ येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आहेतच. चंद्रपूर व गोंदिया येथेही दोन वर्षांपासून वैद्यकीय महाविद्यालये स्थापन झाली आहेत. याशिवाय नागपुरात एनकेपी साळवे इन्स्टिट्यूट, अमरावती येथे पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय , सेवाग्राम वैद्यकीय महाविद्यालय, वर्धा येथे जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय, सावंगी (मेघे) या संस्था ज्ञानादानाचे कार्य करीत आहेतच.

याशिवाय वर्धा येथे दत्ता मेघे वैद्यकीय विद्यापीठ, नागपुरातील महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ (माफसू) अकोला येथील पंजाबराव कृषी विद्यापीठ, वर्धा येथील आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, रामटेक येथील कालिदास संस्कृत विद्यापीठ यांचे योगदान विसरता येणार नाही.

नागपुरात शासकीय विज्ञान संस्था, मॉरिस कॉलेज, हिस्लॉप महाविद्यालय, शिवाजी विज्ञान संस्था, मोहता महाविद्यालय, कमला नेहरू महाविद्यालय, धनवटे नॅशनल कॉलेज, जी. एस. कॉलेज, एस. एम. एस., व्ही. एम. व्ही. ही जुनी महाविद्यालये यासोबत अभियांत्रिकीमध्ये शासकीय तंत्रनिकेतन, श्रीरामदेवबाबा अभियांत्रिकी महाविद्यालय, मेघे समूहाचे वायसीसीई, झुलेलाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, जेडी कॉलेज यासारखी महाविद्यालये नागपूरचा नावलौकिक वाढवत आहेत.

उत्तम प्रकारची व्यवस्थापन महाविद्यालये, स्थापत्यशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र यासारखे विविध अभ्यासक्रम शिकवणारी महाविद्यालये नागपुरात नावारूपाला आली आहेत. ज्येष्ठ उद्योगपती राहुल बजाज यांनी गुणवत्तापूर्ण अशी बजाज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (बीआयटी) नागपूरजवळ वर्धा येथे आणली आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण केले. महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व विद्यापीठांत नागपूरचा माणूस कुलगुरू झाला, ही पण नागपूरची मोठी उपलब्धी मानावी लागेल.

(वरिष्ठ पत्रकार, दै. हितवाद, नागपूर)




पर्सिस्टंट आयटी कंपनी

# आयटी @नागपूर

**संसाधन संपन्न असलेले नागपूर माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात स्वत:चे स्थान निर्माण करण्यासाठी पुढे सरसावले आहे. नागपूर आणि आसपासच्या भागात माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित अनेक कंपन्या स्थापन झाल्या आहेत. गेल्या काही काळात माहिती तंत्रज्ञानातील उद्योजकता वाढलेली आहे. विदेशी गुंतवणूकदारांसोबत काम करणाऱ्या अनेक सॉफ्टवेअर विकासक कंपन्या माहिती तंत्रज्ञान सेवा पुरवठादार मोबाइल फोनसाठी गेम्स विकासक यांची भरभराट होत आहे. भविष्यातील महत्त्वाचे माहिती तंत्रज्ञानाचे तळ (आयटी हब) म्हणून हे शहर विकसित होत आहे.**

**अबोली लोखंडे**

नागपूर शहरात दिसणाऱ्या प्रचंड संभाव्य आर्थिक आणि व्यावसायिक संधीकडे नवनवीन गुंतवणूकदार आकर्षित होत आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक नामांकित कंपन्या नागपूरनजीकच्या भागात कार्यरत आहेत.

एस (YES) बँकेने २०१६ मध्ये केलेल्या मूल्यांकनानुसार, नागपूर हे लॉजिस्टिक व्यवसायासाठी सुयोग्य शहर आहे. बऱ्याचशा लॉजिस्टिक कंपन्यांनी आपली पावले या शहरात रोवली आहेत. आणखी बऱ्याच नवीन कंपन्या येऊ घातल्या आहेत. माहिती तंत्रज्ञानासाठी लॉजिस्टिक हे क्षेत्र खूप मोठी संधी ठरणार आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काही ऐतिहासिक निर्णयापैकी सध्याच्या सरकारने घेतलेला वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीचा निर्णय हा नागपूरच्या विकासासाठी खूप महत्त्वाचा ठरणार आहे.

### महत्त्वाची संधी

नागपूर माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासासाठी नागपूरला आणखी एक महत्त्वाची संधी उपलब्ध होणार आहे. ती म्हणजे संरक्षण क्षेत्रात मुंबई, पुणे, नाशिक व औरंगाबादनंतर केंद्र शासन भारताच्या संरक्षण क्षेत्रासाठीच्या; निर्मिती तंत्रज्ञानासाठी नागपूरकडे वळले आहे. संरक्षण क्षेत्राच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी, संरक्षण उत्पादनाचे

महत्त्वाचे केंद्र म्हणून; नागपूर नावारूपास येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नावाजलेल्या कंपन्यांपैकी हिन्दुस्थान एरोनॅटीक्स लि., टाटा, एल.अ‍ॅण्ड टी., विप्रो, किर्लोस्कर, भारत फोर्ज, सेंटम इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी कंपन्या संरक्षण क्षेत्रात गुंतवणूक करण्यास इच्छुक आहेत. रिलायन्स ग्रुपने 'धिरुभाई अंबानी एरोस्पेस पार्क' या नावाने प्रकल्प स्थापित करण्याचा प्रस्तावदेखील सादर केला आहे.

लॉजिस्टिक, उत्पादन, प्रक्रिया, सेवा, आरोग्य सेवा, आदरातिथ्य, आयटी प्रकल्प, आणि पर्यटन क्षेत्रात नवीन संधी मिहान-सेझ (MIHAN-SEZ) प्रकल्पाने नागपूर शहराला उपलब्ध करून दिल्या आहेत. वाढते शहरीकरण व उत्तम हवाई संपर्क, स्मार्ट सिटी प्रकल्प यामुळे माहिती तंत्रज्ञान सेवेसाठी नवी दालने खुली झाली आहेत.

## आयटी कंपन्यांचे जाळे

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी)कडे असलेल्या माहितीनुसार ५१० हेक्टर जमिनीचा पट्टा हा विविध माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना उपलब्ध करुन



देण्यात आला आहे. यामध्ये इन्फोसिस, टाटा कन्सलटन्सी सर्विसेस (टीसीएस), टेक महिन्द्रा, कोलॅन्ड, हेक्शवेअर इ. कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांचे सेंटर्स नागपुरात सुरू होणार आहेत. एल.अ‍ॅण्ड टी.सारख्या मोठ्या कॉर्पोरेट कंपनीने तर माहिती तंत्रज्ञान पार्क स्थापित केला आहे. टीसीएसने एक दशलक्ष वर्गफुटावर आपले बांधकाम सर्व सुविधांसहित पूर्ण केले आहे. अशाच प्रकारे मिहानमध्ये अनेक कंपन्या स्वत:चे प्रकल्प सुरू करण्यासाठी संधीच्या शोधात आहेत.

## निर्यातीला प्राधान्य

एमएडीसीच्या संकेतस्थळावर असलेल्या माहितीनुसार बऱ्याच कंपन्या निर्यातीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. यामध्ये कॅलिबर पॉईन्ट (बीपीओ), एबीक्स, क्लाऊड डाटा, यालामनचीली सॉफ्टवेअर इन्फर्मेटिक्स सोल्यूशन्स, झीऑन सोल्यूशन, स्मार्ट डाटा, ग्लोबल लॉजिक यांचा समावेश आहे. याच क्षेत्रात टेक महिन्द्रा (सत्यम), मेटा टेक, कोलन्ड डेवलपर्स, पर्सेप्ट वेब सोल्यूशन्स या कंपन्यांनी बांधकामाला सुरुवात केली आहे.

यालामनचीलीसारखे संभाव्य गुंतवणूकदार माहिती तंत्रज्ञान उपाय व ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर उत्पादने उपलब्ध करून देतात. या कंपनीचे मुख्य कार्यालय चेन्नई येथे आहे. मिहान-सेजच्या परिसरातील एमएडीसीच्या इमारतीत यालामनीचीलीचे कार्यालय आहे. ही कंपनी व्यवहार प्रक्रिया उपाय (Transaction Processing Solutions) व मिडलवेअर तंत्रज्ञानावर केंद्रीत विकास कार्ड उपायसेवा (जसे प्रिपेड कार्ड, डेबीट कार्ड व कमर्शिअल कार्ड) व बँक संबंधित सेवांसाठी सल्लामसलत व अंमलबजावणी सेवा अशा प्रदान करते.

## जागतिक दर्जाच्या सुविधा

आयएसओ ९००१ : २००० असलेली एल.अ‍ॅण्ड टी. इन्फोसीटी प्रा. लि. कंपनी ही लार्सन अ‍ॅण्ड टुर्बो व आंध्र प्रदेश इंडस्ट्रीअल इन्फास्ट्रक्चर कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पातळीवरच्या सुविधा, माहिती तंत्रज्ञान सेवा पुरवठादार तसेच दूरसंचार अंभियांत्रिकी सल्ला इ. उपलब्ध करून देत आहे. ॲटलांटामधील एबीक्स इन्फॉर्पोरेशनने विमा कंपन्यांसाठी सॉफ्टवेअर्स व ई-कॉमर्स सेवाविषयीच्या प्रकल्पांचा प्रस्ताव मांडला आहे.

एनसीआयसी-क्रिसिल (NCIC - CRISIL) चे रेटिंग प्राप्त झाल्याशिवाय नॅसकॉम (NASSCOM) मध्ये नोंदणीकृत आयएसओ (ISO) ९००१ : २००८ प्रमाणित एडीसीसी (ADCC) इन्फोकॅड प्रा. लि. ही नागपूर स्थित कंपनी औद्योगिक माहिती पद्धती, व्यवस्थापन माहिती पद्धती, अभियांत्रिकी सेवा, सीएडी (CAD) रूपांतर, भू स्थानिक उपाय इ. सेवा पुरवते. स्मार्ट डाटा एन्टरप्राईजेस ही कंपनी ओपन सोर्स तंत्रज्ञानामध्ये जसे पीएचपी (PHP), द्रुपल (Drupal), ओएस कॉमर्स (OS Commerce), जावा (Java) व मायक्रोसॉफ्ट टेक्नॉलॉजीसमध्ये सेवा देण्यास तयार आहे.

## उदयोन्मुख केंद्राची मान्यता

टीसीएस या भारतीय कंपनीने जगातील पहिल्या दहा तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये आपली विशेष जागा बनवली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था आहे.

टीसीएससारख्या संस्थेमुळे नागपूरला माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उदयोन्मुख केंद्राची मान्यता मिळत आहे. टीसीएसशिवाय या शहराला माहिती तंत्रज्ञानाचे मोठे केंद्र बनवण्यात पर्सिस्टंट सिस्टिम, इन्फोसेप्टस, ग्लोबल लॉजिक यांसारख्या कंपन्यांनी केलेल्या गुंतवणुकीचा वाटा आहे. इतरही बऱ्याच कंपन्या विविध सेवा देण्यास तत्पर झाल्या आहेत.

## संगणक आणि मोबाइल

मंथन स्टुडिओ ही एक अशी कंपनी आहे जी आयओएस, ब्लॅकबेरी, ॲन्ड्रॉइड, जेझेडएमइ व विंडोज ७ आणि ८ साठी मोबाइल गेम्स विकसित करते. नागपूर शहराची भौगोलिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक सक्षमता बघता हे शहर माहिती तंत्रज्ञानात पुढे जाणे अटळ आहे.

**(माहिती : एमएडीसी वेबसाइट, सरकारी माहिती व मीडिया रिपोर्टस्‌वर आधारित आहे)**

**संपर्क : ९४२२८०५३९५**

# महामानवाचे महापरिनिर्वाण





बाबासाहेबांच्या अंत्यदर्शनासाठी जमलेला जनसागर (७ डिसेंबर १९५६)



सौजन्य : टाईम्स ऑफ इंडिया

# अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांची नगरी

**विदर्भाचेच नव्हे तर मध्य भारताचे 'मेडिकल हब' म्हणून नागपूरची नवी ओळख निर्माण झाली आहे. 'मेडिकल हब' म्हणजे असे वैद्यकीय केंद्र, की जिथे अत्यंत अद्ययावत सोयीसुविधांनी सुसज्ज अशी रुग्णालये असतात. हृदयावरील सर्वच शस्त्रक्रिया नागपूरमध्ये होतात. याशिवाय रोबोटिक शस्त्रक्रिया होत आहेत. मोठी रुग्णालये उभारल्याने स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.**



नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट, नागपूर



एचसीजीएनसीएचआरआय कॅन्सर सेंटर

**केवल जीवनतारे**

नागपुरात सरकारी रुग्णालयासह खासगी वैद्यकक्षेत्रात उत्कृष्ट दर्जाच्या सुविधा उपलब्ध होत आहेत. नागपुरातील रुग्णालयांचा स्तर पुण्या-मुंबईतील रुग्णालयांच्या तोडीचा आहे. नागपुरात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स (एम्स) उभारण्यात येणार आहे. वैद्यक क्षेत्रातील साठ वर्षातील ही मोठी उपलब्धी आहे. राज्यात दोन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे नागपूर एकमेव शहर आहे. मध्य भारतातील ४० टक्क्यांपेक्षा जास्त रुग्णांचे आरोग्य नागपूरच्या सरकारी व खासगी मेडिकल हब'वरच अवलंबून आहे. विदर्भातील अकोला, यवतमाळ, गोंदिया, चंद्रपूर या शहरातही शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आहेत. व्होकार्ट, ऍलेक्सीसपासून तर अवंतीपर्यंत तर मेयो मेडिकलपासून तर सुपर स्पेशालिटीपर्यंत असे मोठे जाळे नागपूरमध्ये विणले गेले आहे. मिहान परिसरात नॅशनल कॅन्सर संशोधन संस्था व रुग्णालयाची उभारणी ही वैद्यक क्षेत्रातील क्रांती ठरू शकते.

### हायटेक सरकारी रुग्णालय

सरकारी रुग्णालयेदेखील हायटेक' होत आहेत. ५० वर्षांत प्रथमच ट्रॉमा केअर युनिट' तयार झाले आहे. इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसेस सेंटर' सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल ऑण्ड रिसर्च सेंटरमध्ये हृदयरोग विभाग आणि गॅस्ट्रोएंट्रॉलॉजी विभागात उच्च अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. स्वाइन फ्लूपासून तर इबोलाचा संसर्गजन्य वॉर्ड तयार करण्याची घोषणा सरकारने केली. कॅन्सरसाठी सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. तर सुपर स्पेशालिटीत अद्ययावत डायलिसिस केंद्र' आणि किडनी प्रत्यारोपण युनिट' तयार झाले आहे. मेयो रुग्णालय विकासाच्या दिशेने झेप घेत आहे. सर्जिकल कॉम्प्लेक्स हे नवीन मॉडेल प्रत्यक्षात अमलात आले आहे.

विदर्भात आतापर्यंत १५ लाखांवर व्यक्तींनी महात्मा फुले जनआरोग्य या योजनेचा लाभ घेतला आहे. आरोग्य विभागाने माता व बालमृत्यू रोखण्यासाठी 'माहेरघर' तयार करून तीन वर्षात सहा हजार मातांना सुरक्षेचे कवच दिले.

व्हेंटिलेटर, सीटी स्कॅन, एमआरआय, हृदयरोगाच्या निदानासाठीची वैद्यकीय उपकरणे बायो-मेडिकल' या नव्या शाखेमुळे जन्माला आली. ही सोय नागपुरात आहे.

### पॅरामेडिकल केंद्र

विदर्भात सहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, दोन हजारांवर खासगी रुग्णालये तसेच सोनोग्राफी सेंटर व रक्त प्रयोगशाळेत पॅरामेडिकल स्टॉफची गरज आहे. पॅरामेडिकल मनुष्यबळ तयार

करण्यासाठी उपराजधानीत पॅरामेडिकल केंद्र तयार करण्याची घोषणा केंद्र शासनाने केली. मेडिकलच्या टीबी वॉर्ड परिसरात तयार होणाऱ्या पॅरामेडिकल केंद्रातून एक्स-रे टेक्नॉलॉजी, रेडिऑलॉजी, फिजिओथेरपी, ऑप्टोमेट्री, ऑडिऑलॉजी ॲण्ड स्पीच थेरपी, क्लिनिकल चाइल्ड डेव्हलपमेंट, नर्सिंग, डीएमएलटीस, ब्लड ट्रान्सफ्युजन, डेंटल असिस्टंट कोर्स सुरू होणार आहेत. यामुळे सध्या पॅरामेडिकलचा असलेला तुटवडा भविष्यात भरून निघेल. पॅरामेडिकल'चे डिप्लोमा इन मेडिकल लेबॉरेटरी टेक्नॉलॉजी (डीएमएलटी) वा ऑप्थॅल्मोलॉजिस्ट'सारखे चष्मा तयार करण्याच्या दुकानात तांत्रिक काम करणारे तंत्रज्ञ या अभ्यासक्रमाची सोय नागपुरात आहे.





नागपूर येथील
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

## वंध्यत्व निवारण

नागपूरात जागतिक स्तरावरील उपचारातून वंध्यत्व निवारणाच्या सर्व सोयी उपलब्ध आहेत. विदर्भात वंध्यत्व दूर करणारी किमान २५ आयव्हीएफ रुग्णालये आहेत. संततीसुखाला पारखे झालेल्या जोडप्यांसाठी टेस्ट ट्यूब बेबी वरदान ठरले आहे. हे तंत्रज्ञान विदर्भात १९९७ साली पोहचले. नागपुरात जन्माला आलेला पहिली टेस्ट ट्यूब बेबी ९ सप्टेंबर १९९७ रोजी जन्माला आली. तो बेबीबॉय आता २० वर्षाचा झाला असून अमरावती शहरात महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे. वैद्यकशास्त्रातील वंध्यत्व निवारणाच्या क्षेत्राशी संबधित नागपुरात सुमारे १२ टेस्टट्यूब बेबी सेंटर आहेत. विदर्भात २० सेंटर आहेत. या उपचारपद्धतीतून विदर्भातील २० टेस्ट ट्यूब बेबी सेंटरवर आतापर्यंत सुमारे २००० जोडप्यांना संततीसुखाचा आनंद अनुभवता आला आहे.

गर्भपेशी टिकवून ठेवण्याचे आणि जेव्हा गरज आहे, त्या वेळी गर्भाशयात या गर्भपेशी सोडून; गर्भधारणा करण्याचेही अत्याधुनिक तंत्र विदर्भातील वैद्यक क्षेत्रात पोहोचले आहे. टेस्ट ट्यूब बेबी हे मुख्य प्रवाहातील तंत्रज्ञान गावखेड्यात पोहोचले आहे.

विदर्भाची लोकसंख्या अडीच कोटीच्या घरात असून, येथे शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, शासकीय आयुर्वे द महाविद्यालय व रुग्णालय, कामगार रुग्णांवरील उपचारासाठी स्वतंत्र असे राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आहे. येथील खाटांची संख्या २२ हजारांच्या घरात आहेत. प्रस्तावित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्समुळे (एम्स) नागपूर येथे मोठ्या प्रमाणावर नवनवीन संशोधन होण्यास मदत मिळणार आहे. एम्समध्ये कॅन्सर, न्युरो, न्युक्लिअर मेडिसीन, रेटिनोपॅथी, न्यायवैद्यक संशोधनाला वाव मिळणार आहे. नागपुरात आयुर्वेद, होमियोपॅथी, युनानीच्या संस्था कार्यरत आहेत. आयुष'च्या माध्यमातून शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाचे बळकटीकरण करून, यांच्या सहकार्यातून 'आयुर्वेद उद्यान' तयार करण्यात येत आहे. गडचिरोली येथे हे वनौषधीचे भांडार आयुर्वेद उद्यानातून उभारले जाईल.


## संशोधनाची संधी

नागपुरात वैद्यकीय संशोधन वाढल्यास त्याच्याशी संबंधित विविध संस्था व उद्योग येथे वाढण्यास मदत होईल. स्थानिक रुग्णांना गंभीर आजारांवरील उपचारासाठी विदेशात जावे लागणार नाही. भारतात विदेशाच्या तुलनेत स्वस्त दरात खासगी उपचार उपलब्ध आहेत. तेव्हा बरेच रुग्ण विदेशातून नागपूरसह देशात उपचारासाठी येतात. नागपूरला वैद्यकीय संशोधन हब झाल्यास विदेशी रुग्णांची संख्या वाढून येथे रोजगारासह विदेशी चलनही येण्यास मदत होईल.

(ज्येष्ठ पत्रकार, दै. सकाळ, नागपूर)

तुम्ही पुण्यातून या किंवा पंजाबमधून. नागपुरात पाऊल ठेवताच आपण 'वाघपुरा'त आल्याचा समज करून घ्यायला हरकत नाही. खरेतर हा फक्त समज नाही. वास्तविकता आहे. नागपूरच्या अगदी शंभर किलोमीटरच्या परिघात शेकडो वाघ आहेत. या वाघस्थळांचे 'सरताज' आहे ते अर्थातच चंद्रपुरातील ताडोबा. नागपुरातील पेंचची कीर्तीही अलीकडे सर्वदूर पसरली आहे. उमरेड कऱ्हांडलामधील सायटिंग वाढल्याच्या वार्ता कर्णोपकर्णी पसरल्या की, पर्यटकांच्या झुंडी तिकडे धाव घेतात. भंडारा-गोंदियातील नवेगाव नागझिरा असो की, अमरावती जिल्ह्यातील मेळघाट, वाघांच्या भेटीला जाण्याचा 'फील' नेहमीच सुखावह असतो. साक्षात वाघोबा पुढ्यात उभा ठाकला की, हाच अनुभव थरारक बनतो. हा थरार विस्तारण्यासाठी वर्धेचे बोर, यवतमाळचे टिपेश्वरही सोबतीला आहेतच. विदर्भात आणखीही वाघस्थळे आहेत. ही झाली राखीव वनक्षेत्रे. याव्यतिरिक्त टायगर प्रोजेक्टच्या बाहेरील जंगलातही वाघ आहेत. नागपूरच्या अवतीभोवती अंदाजे दोनशे मोठे आणि साठसत्तर ज्युनिअर टायगर मुक्काम ठोकून आहेत.

# तृप्त करणारी भूमी



छायाचित्र: अनिल फुटाणे

**श्रीपाद अपराजित**

प्रत्येक प्रदेशाचा एक स्वभाव असतो. टायगर सफारीचा थ्रिल अनुभवण्यासाठी विदर्भात पाऊल ठेवताना जरा अदबीने यायला हवे. तुम्ही उगाच गुर्मी दाखविली तर इथले वाघ असोत की माणसे, गुरकावलीच म्हणून समजा.

विदर्भाचा डौल वाघासारखाच आहे. एकदम भारदस्त. विदर्भाचा पाहुणचार प्रसिद्ध आहे. तुम्ही मुक्कामाला आलात तर वैदर्भीय माणूस खाऊपिऊ घालून तृप्त केल्याखेरीज तुम्हाला सोडणार नाही. वाघांचेही तसेच. तो दिसलाच तर भररस्त्यात अर्धा तास बैठक मारून बसेल. तृप्त करून सोडणे ही कदाचित विदर्भाच्या भूमीची थोरवी असावी. या भागाला पर्यटनाचा भरभक्कम आणि घनदाट वारसा लाभला आहे. एका लेखातून संपूर्ण आढावा अशक्यच. शिवाय या लेखातील सूचनांवरूनच विदर्भ अनुभवायला हवा असेही नाही. कुठल्याही प्रवासाचा आनंद मनाच्या जिंदादिलीवर अवलंबून असतो. ‘धूप में निकलो, घटाओं में नहाकर देखो, जिंदगी क्या है किताबों को हटाकर देखो..’ असे निदा फाजली म्हणतात ते खोटे नाही. ११ जिल्ह्यांच्या पर्यटनाचा आढावा घेतो म्हटले तर दोन भागांत विभागणी करावी लागेल. काही स्थळांचा लौकिक निसर्गसौदर्यांमुळे वाढतो. काहींचे स्थानमाहात्म्य सामाजिक सेवेच्या वारशातून वृद्धिंगत होते.

विदर्भात वनप्रदेश मोठा असल्याने हिरवाईची नजाकतही मोठी आहे. आजवर



अंबाळा तलाव, रामटेक

फार लक्ष न दिल्याने अनेक पर्यटनस्थळे अविकसित राहिली. अलीकडे सजगता वाढली आणि पर्यटकदेखील. कोअर आणि बफर असे वनक्षेत्राचे दोन भाग असतात. कोअर म्हणजे अगदी घनदाट जंगल. कोअर एरियाचे आवरण म्हणजे बफर क्षेत्र. पर्यटकांना या गोष्टीची कल्पना असलेली बरी. दाट हिरवाईचा शेजार मनाला तजेला देतो. काही दुखणीही त्यातून अंगावर येतात. विदर्भातील जंगलांचा भाग म्हणजे नक्षल्यांचा वावर ही भीती अनेकांच्या मनात असते. विदर्भाची एकूण वस्तुस्थिती तशी नाही. इथे येताना निर्धोक मनाने यायचे. तृप्त होऊन जायचे. जनावरांचा अधिवास माणसांनी अतिक्रमित केल्याने काही भागात वन्यप्राण्यांचे हल्ले वाढले आहेत. मात्र जंगल प्राण्यांच्या काळजीचे भान विकसित होत असल्याने, भविष्यात ही चिंता बऱ्याच प्रमाणात कमी होईल.

## टायगर सफारी

पर्यटनावर सर्वाधिक प्रभाव असतो टायगर सफारीचा. कमालीचे लोकप्रिय असलेले ताडोबा-अंधारी अभयारण्य नागपूरहून अवघ्या १४० किलोमीटरवर आहे. उमरेड, भिसी किंवा चिमूरमार्गानेही तिथे जाता येते. रेल्वेच्या दिल्ली-चेन्नई मुख्य मार्गावर चंद्रपूर स्थानक आहे. वाघोबांच्या ऐटदार चालीचे साक्षीदार बनायचे असेल तर आपल्याला चंद्रपूरपासून फक्त ४५ किलोमीटर पुढे जावे लागेल. बिबटे, गवा, सांबर, चितळ रानडुक्कर अशा अन्य प्राण्यांचाही वावर या जंगलात आहे. थोडे पुढे गेल्यास मूलजवळील सोमनाथही बघता येईल. दाट जंगलामधील धबधबा हे तेथील मुख्य आकर्षण. भद्रावती येथे हिंदू, बौद्ध व जैन संस्कृतीच्या खाणाखुणा आहेत. नागभीड तालुक्यात नयनरम्य घोडाझरी तलाव आहे. इंग्रजांनी १९०५ मध्ये तो बांधला होता. ऐतिहासिक स्थानांमध्ये रस असलेल्यांना माणिकगड किल्ल्यालाही भेट देता येईल. माना जमातीचा नागवंशीय राजा गहिलू याने नव्व्या शतकात या किल्ल्याची निर्मिती केली होती. चिनीप्रवासी ह्युएन-त्संगने त्याच्या भारतयात्रा ग्रंथात 'मोलोमोलो किली' असा जो उल्लेख केला आहे तो किल्ला हाच. चंद्रपूर शहराला भव्य परकोट लाभला आहे. गोंड राजाचा किल्ला, वीरशहाची समाधी, अंचलेश्वर मंदिर ही चंद्रपुरातील आणखी काही महत्त्वाची स्थाने. तेथील महाकाली मंदिर विदर्भासह मराठवाडा, तेलंगणातही प्रसिद्ध आहे. केवळ धार्मिक आधारावर नव्हे तर पुरातत्त्वीय दृष्टीनेही या मंदिराकडे अधिक निधी वळविण्याची गरज आहे. पैनगंगा आणि वर्धा नदीच्या संगमावरील वढा हे आणखी एक छोटे पर्यटनस्थळ. चिमूरच्या व्यंकटेश्वर बालाजी मंदिराचाही भक्तसंप्रदाय मोठा आहे. चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन गडचिरोली







मार्कंडा शिवमंदिर आणि त्यावरील अप्रतिम शिल्पे.

जिल्हा तयार झाला. तेथील मार्कंडा मंदिर म्हणजे विदर्भाची काशी. गडचिरोलीपासून मार्कंडाचे अंतर आहे फक्त ४० किलोमीटर. हेमाडपंती मंदिराच्या बाजूनेच वैनगंगा उत्तरवाहिनी होऊन वाहते. खजुराहोसारखी कोरीव चित्रे मंदिरावर आहेत. अनेक मूर्ती भग्न झाल्या आहेत. मात्र त्या जपून ठेवल्या आहेत. केवळ भेट द्यायची असेल तर एक तास पुरेसा. अभ्यासकांना सूक्ष्म निरीक्षणासाठी दोन दिवस अपुरे पडतील. सिरोंचा तालुक्यातील वडदम येथे राज्यातील पहिले जिवाश्म पार्क वनविभागातर्फे उभारले जात आहे. अहेरी तालुक्यातील व्यंकटापूर येथे उष्ण पाण्याचे कुंड आहे. तुम्ही गडचिरोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर पावसाळ्यात जाणार असाल तर जीतम आणि बिनागुंडा येथील धबधबा अवश्य बघा. चामोर्शी तालुक्यातील चपराळा अभयारण्यात जा. टिपागड आणि वैरागडच्या जुन्या किल्ल्यांनाही भेट देता येईल. सिरोंचा तालुक्यात सोमनूरच्या त्रिवेणी संगमाचा आनंद लुटणे ही तर पर्वणीच असते.

### साद देतो सातपुडा

सातपुड्याच्या कुशीतील चिखलदरा म्हणजे विदर्भाचे महाबळेश्वर. इतिहासाची साक्ष देणारा गाविलगड किल्ला इथलाच. समुद्रसपाटीपासून ३ हजार ४०० फूट उंचीवर असलेल्या या स्थळाकडे जाणे हादेखील आनंदाचा भाग आहे. स्वतःची गाडी असल्यास नागमोडी वळणांची मजा काही औरच! धामणगाव गढीपासून ही मुशाफिरी सुरू होते. २० किलोमीटरच्या नागमोडी वाटा वाहकाच्या कौशल्याची परीक्षा घेतात. हैद्राबाद पलटणचे तत्कालीन अधिकारी रॉबीन यांनी १८२३ मध्ये गाविलगड किल्ल्याला भेट दिली होती. त्यांच्याच प्रयत्नातून पुढे चिखलदरा अस्तित्वात आले. पांडवांनी एक वर्षाच्या अज्ञातवासातील काही काळ या ठिकाणी घालविला तसेच भीमाने किचकाचा वध येथेच केला अशी आख्यायिका आहे. सोसाट्याच्या वाऱ्यात चिखलदऱ्यातील किचकदरीची खोली अनुभवणे हा एक भन्नाट अनुभव असतो. पावसाळ्यात खोलवर कोसळणारा धबधबा हा आणखी एक स्वर्गीयआनंद. मेळघाट भेटीतून अफलातून आनंद मिळतो. मेळघाटातील गुगामल पार्क चिखलदऱ्यापासून केवळ पाच किलोमीटरवर आहे. सिपना वन्यजीव, वान सॅन्क्चुरी, सेमाडोह, हरिसाल ही आणखी काही प्रेक्षणीय स्थळांची यादी. अमरावतीनंतर बुलडाणा व अकोला या जिल्ह्यांमध्ये मेळघाटचा विस्तार आहे. येथील आदिवासी मध्य प्रदेशातून येणाऱ्या तापी नदीचे पूजक आहेत. हिरव्याकंच डोंगराच्या कुशीत ५२ पांढरीशुभ्र संगमरवरी मंदिरे बघायची असतील तर मुक्तागिरीला जावे लागेल. दर्यापूरपासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावरील लासूर गावात, वास्तुकलेच्या मंदिराचे अवशेष आहेत.

अमरावती जिल्ह्यातील सिंभोरा धरणही बघण्यासारखे आहे. रुक्मिणीचे माहेर असणारे कौंडण्यपूर अमरावती जिल्ह्यातलेच. तिवसा तालुक्यापासून ते जवळ आहे. वेळ असला तर चांदूररेल्वेपासून अवघ्या सात किलोमीटरवरील मालखेड तलाव बघता येईल. अमरावती शहरातील अंबामंदिर, गणोजादेवी, नेरपिंगळाईची पिंगळादेवी, महानुभावांची काशी म्हणवले जाणारे रिद्धपूर, बहिरम, नांदगाव खंडेश्वर, सालबर्डी ही स्थळेसुद्धा भेट द्यावी अशी आहेत. मेळघाटातील कलालकुंड किंवा धारखोरा येथील धबधबे, सेमाडोह, उर्ध्व वर्धा प्रकल्प, मुक्तागिरी आदी ठिकाणे आणखी विकसित झाली तर विदर्भाच्या पर्यटनाला बहार येईल. पांढरकवडा-आदिलाबाद मार्गावरील टिपेश्वर अभयारण्यदेखील पर्यटकांचे आकर्षण आहे. १४८ चौरस किलोमीटरात ते पसरले आहे. विदर्भ-मराठवाडा सीमेवर वाहणाऱ्या पैनगंगा नदीलगतचे आणखी एक पर्यटकप्रिय स्थळ म्हणजे पैनगंगा अभयारण्य. या ठिकाणी फारशा सोयी नसल्याने सजग भ्रमणकार तिकडे जाण्यास थोडे उदासीन असतात. पैनगंगा नदीवर बिटरगावनजीकचा नैसर्गिक धबधबा बघण्यासारखा आहे. संत मुंगसाजी महाराजांच्या वास्तवाने परिचित झालेले दारव्हा तालुक्यातील धामणगाव देव हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. दारव्हाजवळील वळसा येथे महालक्ष्मीच्या प्राचीन मंदिराला भेट देण्याकडे भाविकांचा ओढा असतो.




याखेरीज साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पूर्ण पीठ म्हणजे माहूरगड. तिथे दत्तशिखरही आहे. तांत्रिकदृष्ट्या ते तसे मराठवाड्यात येते. यवतमाळवरून फक्त ८० किलोमीटरवर अंतरावरील हे भक्तिस्थळ विदर्भाच्या सीमेलगत असल्याने अनेकांची पावले तिकडे आपसूकच वळतात. मराठवाड्यातील किनवट तालुक्यातील आणखी एक स्थळ विदर्भाला लागून आहे. ते म्हणजे उनकेश्वर. गरम पाण्याविषयीच्या पर्यटकांमधील उत्सुकतेने अनेकांचा कल उनकेश्वरकडे असतो. यवतमाळ-नागपूर मार्गावर पुरातन चिंतामणी गणेशाचे मंदिर आहे. दर्शनासाठी ३५ फूट खोल उतरावे लागते. गणेशाची मूर्ती दक्षिणमुखी आहे. कळंबजवळील निरंजन माहूर हेदेखील एक तीर्थक्षेत्र आहे. यवतमाळ शेजारची डुमनापूर, मनदेव आणि चौसाळा ही झाली पर्यटनाची आणखी काही छोटी स्थळे.

### लोणारची कीर्ती जगभरात

निसर्गाने मुक्तहस्ते उधळण केलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील संचित म्हणजे लोणार सरोवर. हे केवळ पर्यटनस्थळ आहे असे नाही. या सरोवराच्या निर्मितीला वैज्ञानिक आधार आहे. अंदाजे साडेपाच लाख वर्षांपूर्वी दीडशे मीटर व्यासाचा अश्नी दख्खनच्या पठारावर धडकला. त्याच्या आघाताने हे विवर तयार झाले. तेव्हा हजारो अणुबॉम्बने होतील इतक्या कानठळ्या एकाच वेळी अनुभवलेल्या या भागाला सध्या अनास्थेचा आघात सोसावा लागतो आहे. कालमानानुसार या सरोवराला मंदिरांचा शेजार लाभला. बुलडाणा जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ५५ किलोमीटर अंतरावरील हे सरोवर खाऱ्या पाण्यासाठी प्रसिद्ध आहे. लोणार परिसरात ३२ मंदिरे, १७ स्मारके, १३ कुंड व ५ शिलालेख आहेत. पर्यटन सुविधेसाठी एमटीडीसीच्या




निवासाचीही व्यवस्था आहे. लोणार सरोवर परिसराला अभयारण्याचा दर्जाही मिळाला आहे. विश्वातील एवढे मोठे संचित आपल्याजवळ आहे याविषयीची जाण निर्माण करण्याचे काम मात्र पर्यटन विभागाला करावे लागेल.

बुलडाण्यापासून अवघ्या ८० किलोमीटर अंतरावर आहे छत्रपतींचे आजोळ. राजमाता जिजाऊंचे जन्मस्थळ सिंदखेडराजा. येथील जिजाऊ सृष्टीवर दरवर्षी लाखो लोकांच्या उपस्थितीत जिजाऊ जन्मोत्सव साजरा होतो. जिजाऊ जन्मस्थळाच्या महालाचे आता सौंदर्यीकरण झाले आहे. राजे लखुजी जाधवांनी उभारलेली स्मारके, तलाव आणि तटबंदी इतिहासकालीन वैभवाची साक्ष देतात. तिथे गेल्यास मोती तलाव, चांदणी तलाव, पुतळा बारव, नीलकंठेश्वर मंदिर, नृत्य महाल अवश्य बघावे. महाल ते आडगावराजा या भुयारी मार्गानेही अनेकांची उत्सुकता वाढवली आहे. संतनगरी आणि स्वच्छस्थळ म्हणून विकसित झालेले गजानन महाराज मंदिर हे शेगावचे वैशिष्ट्य. विदर्भाची पंढरी म्हणून शेगावची ओळख आहे. मंदिराचा कायापालट करणाऱ्या शिवशंकर पाटील या कर्मयोग्याने शेगावात आनंदसागर साकारले आहे. ते अतिशय प्रेक्षणीय आहे. शेगावला जाऊन आनंदसागर बघितले नाही तर आनंदाचा ठेवा तुम्ही गमावला, असे समजण्यास समजण्यास हरकत नाही. एरवी आपल्या अनेक धार्मिक स्थळांवर अस्वच्छता आणि घाणीचा संगम ठरलेला असतो. शेगावचे मंदिर आणि तेथील धर्मशाळा हा अपवाद आहे.

### चोखामेळा जन्मोत्सव

बुलडाणा जिल्ह्यात नळकुंड, सैलानी दर्गा, हिवरा आश्रम अशी अन्य स्थळेही भेट देण्यासारखी आहेत. देऊळगावराजा येथून अवघ्या १२ किमी. अंतरावर असलेले मेहुणाराजा हे ठिकाण संत चोखामेळा यांचे जन्मस्थान आहे. घडीव स्वरूपातील दोन वेशी, दोन बुरूज, एक चौकी आणि नदी तीरावर औदुंबराचा एक वृक्ष आहे. दरवर्षी १४ जानेवारीला तेथे चोखामेळा जन्मोत्सव साजरा होतो. कुराणातील आयतांची कलाकुसर असलेली मशीद मोताळा तालुक्यातील रोहिणखेड येथे आहे. मुस्लीम राजवटीत दोन मोठ्या लढाया रोहिणखेड येथे झाल्या होत्या. खामगाव-चिखली मार्गावर ज्ञानगंगा अभयारण्य आहे. जळगाव जामोद तालुक्यातील अंबाबरवा






## पक्षिदर्शनाचा आनंद

नागझिरा म्हणजे विदर्भाचे कान्हाकिसली. नागपूरवरून साधारणतः दीडशे किलोमीटरवर अंतर कापले तर नागझिरा लागेल. त्यात न्यू नागझिरा-नवेगाव व कोका अभयारण्याचाही समावेश आहे. समृद्ध वनसृष्टीचे दर्शन या अभयारण्यात घडते. हे अभयारण्य उष्ण पानगळीच्या प्रदेशात आहे. येथील घनदाट वृक्षराजीमध्ये कमालीची विविधता आहे. दोनशेवर वेगवेगळे पक्षी या अभयारण्यात दिसतात अशी अधिकृत नोंद आहे. काकर, रानमांजर, उदमांजर, ताडमांजर, उडणखार, सर्पगरुड, मत्स्यगरुड, टकाचोर, खाटीक, राखी धनेश, नवरंग कोतवाल अशा अनेक प्राणी आणि पक्ष्यांचा निवास येथे आहे. गोरेगाव तालुक्यातील बोळुंदा या गावाला लागून असलेले पोंगेझरा हे धार्मिक पर्यटनस्थळ आहे. नागझिरा व्याघ्र प्रकल्पालगत नयनरम्य बोदलकसा जलाशय आहे.


नरनाळा किल्ला

## नरनाळ्याचे आकर्षण

सोळाव्या शतकापूर्वीचा निसर्गसंपन्न नरनाळा किल्ला फक्त पर्यटकांना नव्हे तर इतिहासतज्ज्ञांना नेहमीच खुणावतो. किल्ला बघायचा असेल तर सातपुड्याच्या उंच डोंगरावर चढावे लागेल. तिथे गाडीने जायची सोय असल्याने चिंतेचे कारण नाही. गडाच्या पायथ्यापासून मेळघाट व्याघ्रप्रकल्प सुरू होतो. हा गड आहे जमिनीपासून ३,१६१ फूट उंचावर. ३८२ एकरांत पसरलेल्या या गडकोटाच्या तटबंदीची लांबी तब्बल २४ मैल आहे. गडाच्या मध्यावर विस्तीर्ण शक्कर तलाव आहे.

अभयारण्यालाही भेट देता येईल. वऱ्हाडच्या या भागात शिरताना वेळ गाठीशी ठेवायला हवा. वाशीम जिल्ह्यात बंजारा समाजाची काशी समजली जाणारी पोहरादेवी आहे. तिथे संत सेवालाल महाराजांची समाधी आहे.

मंगरुळपीर तालुक्यात तऱ्हाळा येथे पठाणांचा प्रसिद्ध दर्गा आहे. दरवर्षी मे महिन्यात तिथे मोठा उरूस भरतो. दत्त भक्तांमध्ये कारंजा लाडमधील नृसिंह सरस्वती मंदिराचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. जैन समाजाची काशी शिरपूर हे आणखी एक महत्त्वाचे स्थळ. येथील अंतरीक्ष पार्श्वनाथ मंदिरातील मूर्ती जमिनीला टेकलेली नाही. भोसल्यांचे सरदार भवानीपंत काळू यांनी बांधलेले वाशीममधील बालाजी मंदिर प्रसिद्ध आहे. वर्धा-नागपूर जिल्ह्याच्या सीमेवरील बोर अभयारण्यात जंगल सफारीची सोय आहे. येथील रेस्टहाऊस 'इको फ्रेंडली' आहे. बोर धरणाच्या डोंगराळ भागात तायवान आणि इंग्लंडच्या आर्थिक सहकार्याने साकारलेले ह्यू एन सँग धम्म केंद्र आहे. तथागताच्या विविध भावमुद्रा हे या स्थळाचे वैशिष्ट्य. वैदर्भीय अष्टविनायकांपैकी एक केळझरचा सिद्धिविनायक नागपूर-वर्धा






तिथून पुढे गेले की, लागते पोंगेझरा मंदिर. जगन्नाथपुरीहून रामटेकला जाताना प्रभू श्रीरामचंद्रांनी पोंगेझरा येथे विश्रांती घेतले अशी लोकश्रद्धा आहे. हे मंदिर गोंड राजा करण शहा यांचे कुलदैवत होते.

नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानात वावरण्याची संधी हौशी पर्यटकांनी मुळीच सोडू नये. ज्येष्ठ पक्षितज्ज्ञ मारुती चित्तमपल्ली, अरण्यपुत्र माधवराव डोंगरराव पाटील यांच्या वास्तव्याने नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यानाकडे अनेकांचे लक्ष वेधले गेले.

अरेबिया, युरोप व अमेरिकी देशातून आलेले पक्षी इथे नोव्हेंबर डिसेंबरमध्ये झळकतात. अडई, वंडकी, चिकल्या, धनकर, स्वर्गया आदी पक्ष्यांचे समूह तर हमखास आढळतात. नवेगाव बांधपासून जवळच गाढवी नदीवर इटियाडोह सिंचन प्रकल्पही बघता येतो. 'लाइफ बर्ड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सारस पक्ष्यांचा वावर नवेगाव बांधमध्ये आहे.

मार्गावर आहे. महाभारत काळात भीमाने बकासुराचा वध केल्यानंतर सर्व पांडवांनी मिळून या सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले, अशी लोकचर्चा आहे.

अकोला शहरात श्री राजराजेश्वराचे ऐतिहासिक मंदिर आहे. असदगड किल्ला बघण्यासारखा आहे. जवळच्या बाळापुरातील किल्ला आणि छत्री प्रसिद्ध आहे. अकोट तालुक्यातील नरसिंग महाराजांच्या मंदिराला भेट देता येईल. मुंडगावात गजानन महाराजांच्या पादुका आहेत. अकोल्यापासून अवघ्या ३५ किलोमीटर अंतरावरील काटेपूर्णा अभयारण्य छोट्या सहलींसाठी उत्कृष्ट आहे. १२ हेक्टरचे जलाशय तिथे आहे.वैनगंगा व वाघ नदीच्या किनाऱ्यालगत परसवाडा, घाटटेमणी, झिलमिलीच्या तलावातही सारस दृष्टीस पडतात. सारस दर्शनासाठी आलेल्या पक्षीप्रेमींना या भागाने नाराज केले असे सहसा झालेले नाही. गोठणगावच्या कुशीत वसलेल्या तिबेटियन वसाहतीची रचना बघण्यासारखीच आहे. इटियाडोह धरणाच्या पायथ्याशी तुम्ही गेलात, तर केवळ एक गाव बघितले असे होत नाही. ती असते एका संस्कृतीला दिलेली भेट. नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या हिरवाईत दडलेल्या डाकराम सुकळीच्या भूमीला, अकराव्या शतकाच्या सुमारास महानुभाव संप्रदायाचे संस्थापक चक्रधर प्रभू यांनी भेट दिल्याची नोंद 'लीळाचरित्रा'त आहे. गोंविद प्रभूंची भेट झाल्यानंतर चक्रधरस्वामी सालेबर्डी, काटोल, मनसर, रामटेक, भंडारामार्गे डाकराम सुकळी येथे आल्याचे अभ्यासक सांगतात. तेथील भानतआई, राजमठ, घनेश्वर, सिंहनाद व निद्रास्थान आदी ठिकाणांकडे अभ्यासू वर्गाचा ओढा असतो. भंडारा जिल्हातील पवनी हे ऐतिहासिक शहर आहे. येथील वैनगंगेच्या तीरावर संघरत्न माणके यांनी जपान सरकारच्या मदतीने महासमाधी भूमी स्तूप साकारला आहे.

### कामठ्याचे महत्त्व

गोंदियापासून ईशान्येला वाघ नदीच्या पश्चिमेस वसले आहे कामठा हे गाव. इतिहासातील नोंदीवरून ही भूमी दोनशे वर्षांपूर्वीपासूनच शिवपूजक असल्याचे सिद्ध झाले आहे. श्रीलहरीबाबा यांचा कामठा येथे आश्रम आहे. तेथे विशाल जलकुंडात ७८ फूट उंच शिवलिंग आहे. वरच्या भागाला २१६ घंट्या लागल्या आहेत. समोर १२ फूट उंच आणि १८ फूट लांब विशाल नंदी आहे. बिरसी विमानतळामुळे या भागाकडे अनेकांचे लक्ष वेधले गेले. लक्षात ठेवावे असे आणखी एक स्थळ म्हणजे कचारगड. आशिया खंडातील मोठी नैसर्गिक गुफा म्हणून कचारगडला मान्यता मिळाली आहे. ही गुफा आदिवासी समाजाचे उगमस्थान आहे. गुहेत एकाच वेळी पाच हजार व्यक्ती बसू शकतात. लहानशा छिद्रातून आलेल्या सूर्यप्रकाशाने गुहा उजळून निघते. सालेकसापासून उत्तरेकडे १५ किलोमीटर अंतरावर पिपरिया गावाच्या सीमेलगत डोंगरदऱ्यांनी वेढलेला डोह आहे. त्याचे नाव राणीडोह. गोंदियाच्या उत्तरेकडे पाच किमी. दूर अंतरावर प्राचीन नागरा हे गाव आहे. या गावात एका टेकडीचे उत्खनन केल्यानंतर प्राचीन हेमाडपंती शिवमंदिर आढळले. हे मंदिर पंधराव्या शतकातील आहे. गोंदिया जिल्ह्यात २,१३० तलाव आहेत. त्यातील १,८८६ तलाव माजी मालगुजारी तलाव आहेत. साधे तलाव काय बघायचे असा प्रश्न अनेकांच्या मनात येईल. मात्र परसवाडा, झिलमिली, गंगेझरी, गोठणगाव यासारखे अनेक माजी मालगुजारी तलाव आज पक्षी अभ्यासकांचे केंद्र बनले आहेत.

### नागपूरचा रम्य शेजार

पेंच अभयारण्य हे भारतातील मध्य प्रदेश व महाराष्ट्र राज्यांच्या सीमाभागात वसलेले राष्ट्रीय उद्यान आहे. नागपूर शहरापासून सुमारे ८६ किलोमीटर अंतरावरील या अभयारण्याचे एकूण क्षेत्रफळ २७५ वर्ग किलोमीटर. त्या उद्यानाचा ९० टक्के विस्तार मध्य प्रदेशात असून उर्वरित १० टक्के विस्तार महाराष्ट्राच्या हद्दीत आहे. पेंच हे पक्षी अभयारण्य आहे. हा महाराष्ट्र व मध्य प्रदेश सरकारचा संयुक्त उपक्रम आहे. रामटेक तालुक्यातील खिंडसी तलावाच्या सभोवताल घनदाट जंगल आहे. रामटेकजवळील पेंच नदीवर तोतलाडोह धरण आहे. नागपूरच्या वायव्येकडील गोरेवाडा तलाव २,३५० फूट खोल आहे. १९११ मध्ये या तलावाची निर्मिती झाली. नागपूरपासून ६५ किलोमीटर अंतरावर खेकरानाला हे धरणाचे ठिकाण आहे. पर्वतरोहकांसाठी हे स्थळ आदर्श म्हणायला हवे. शहरांची गर्दी टाळून एकांत अनुभवायचा असेल तर हा तलावालगतचा परिसर जवळ करायला हवा. नागपूरच्या

## सामाजिक प्रेरणास्थळे

कर्तृत्वासाठी गांधींचे आणि दातृत्वासाठी विनोबांचे आवाहन ज्या परिसराने अखिल भारतात संक्रमित केले, असा पावन परिसर वर्धा जिल्ह्याला लाभला आहे. सेवाग्रामला शांतिस्तूपही आहे. विदर्भातील पहिला बुद्धविहार पुलगावात आहे. १९५४ साली त्याचे उद्घाटन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते. चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरानजीकचे आनंदवन हा वंचितांना उमेद देणारा प्रकल्प आहे. बाबा आमटे यांनी तुटक्या, खुरटलेल्या बोटांमध्ये अपार बळ पेरण्याचे काम येथे केले. डॉ.विकास आमटे मधील जलतज्ज्ञ इथे गेल्यावर लक्षात येतो. गडचिरोली जिल्ह्याच्या टोकावर हेमलकसा येथे डॉ.प्रकाश आमटेंनी सुरू केलेला लोकबिरादरी प्रकल्प दुर्दम्य इच्छाशक्तीचे उदाहरण आहे. माणसाळलेले वन्यप्राणी हे येथील आणखी एक वैशिष्ट्य. गडचिरोली शहराशेजारच्या शोधग्राम येथील सर्च संस्थेचे कार्य जागतिक पातळीवर गौरवले गेले आहे. तेथे जाऊन डॉ.अभय व राणी बंग यांच्या कुपोषणमुक्तीचा ध्यास जाणून घेता येईल. लेखामेंढात जाऊन ग्रामविकासाचे किमयागार देवाजी तोफांना भेटता येईल. ब्रह्मपुरी शेजारची आत्मानुसंधान अड्याळ टेकडीदेखील एक प्रेरणास्थळच. तुकडोजी महाराजांच्या मार्गदर्शनात तुकाराम दादांनी या भागात स्वयंपूर्ण ग्रामाची निर्मिती करून दाखवली. अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरीला दिलेल्या भेटीत तुकडोजी महाराजांनी उभारलेला आश्रम आणि त्यांचे समाधिस्थान बघता येईल. त्यातून प्रेरणा मिळविता येईल. अमरावती जिल्ह्याच्या वझ्झरमध्ये शंकरबाबा पापळकर नावाच्या अनाथांच्या नाथाने तरुणांना लाजवेल असे सेवाकार्य विकलांगांसाठी उभे केले आहे.




पूर्वेकडे ७४ किलोमीटर अंतरावर वैनगंगेच्या काठावर वसले आहे अंभोरा. तिथे चैत्यनेश्वराचे मंदिर आहे. याच ठिकाणी संत हरहरस्वामी यांची समाधी आहे. गोसेखुर्द धरणाचा परिसर या जागेला लागूनच आहे. बॅकवॉटर अंभोऱ्यापर्यंत आल्याने नौकायनासाठी हे आकर्षणाचे केंद्र झाले आहे.

नागपूरपासून सव्वा तासाच्या अंतरावर असलेले उमरेड कऱ्हाडला अभयारण्य खऱ्या अर्थाने चर्चेत आले ते जय वाघामुळे. आशिया खंडातील सर्वात मोठा वाघ म्हणून गणला गेलेला जय येथूनच बेपत्ता झाला. उमरेड-कऱ्हांडला हे ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाशी जोडले आहे. सततच्या व्यस्ततेने त्रस्त झालेल्या जीवांनी कामठीचे ड्रॅगन पॅलेस गाठायला हवे. अवघ्या २० किलोमीट अंतरावरील ड्रॅगन पॅलेसमध्ये जाऊन केलेली ध्यानधारणा नक्कीच मनःशांती प्रदान करेल. बांधकामासाठी जागतिक पुरस्कार पटकाविणारा हा विहार सुमारे दहा एकरांत पसरला आहे. येथील बुद्धमूर्ती सलग चंदनातून साकारली आहे. कामठीला जाताना त्रैलोक्य बौद्ध महासंघाचा नागलोक विहार आहे. त्याच्या बाजूलाच बुद्धभूमी आहे. काटोल मार्गावरील चिचोली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी वामनराव गोडबोले यांनी उभारलेले शांतिवन आहे. तिथे त्यांनी बाबासाहेबांच्या वैयक्तिक वस्तू जतन केल्या आहेत.


ड्रॅगन पॅलेस आणि बुद्धमूर्ती

खिंडसी तलावाला भेट द्यायची असेल तर नागपूरहून ५२ किलोमीटरचे अंतर कापावे लागेल. रामटेकचे माहात्म्य तर पूर्वापार चर्चिले गेले आहे. पूर्व दिशेचे उंच डोंगर हे या परिसराचे वैशिष्ट्य. गडावर प्रभू रामचंद्राचे मंदिर आहे. बाजूला महाकवी कालिदासाचे स्मारक आहे. अंबाळा तलाव आहे. रामटेकला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या गर्दीत अलीकडे बरीच वाढ झाली आहे. रामटेकच्या गडाच्या खाली कपूरबावडी हे अतिशय प्राचीन मंदिर आहे. पुरातत्त्व साहित्यात रुची असेल्यांनी ही बावडी बघायलाच हवी. रामटेकला प्रभू श्रीरामांच्या मंदिराखेरीज केवल नृसिंहाचे प्राचीन मंदिरही आहे. येथील वराहमूर्ती तर तिसऱ्या शतकातील वाकाटककालीन आहे. ऐतिहासिक पर्यटनासाठी ही फारच महत्त्वाची मूर्ती आहे. वाकाटकांच्या दोन राजधानी होत्या. पहिली नंदीवर्धन म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील नगरधन. दुसरी राजधानी वत्स्यगुल्म म्हणजे वाशीम. वाकाटक आणि गुप्तकालीन अवशेषांचे उत्खनन मनसर येथे सुरू आहे. प्राचीन भारतातील विविध सभ्यतांचे दर्शन येथे घडते. हिंदू, बौद्ध संस्कृतीचे अवशेष बघायचे असतील तर हे स्थळ टाळू नये. रामटेक लगतच्या रामधामनेही अलीकडे पर्यटकांचे लक्ष वेधून घेतले आहे. नागपुरात दीक्षाभूमी, रेशीमबाग स्मृतिमंदिर, सेमिनरी हिल्सवरील व्यंकटेश मंदिर, स्वामिनारायण मंदिर आदी स्थळे पर्यटकांना आकर्षित करतात. फुटाळा तलाव आकर्षक पद्धतीने विकसित केल्याने अलीकडे युवावर्गाच्या उत्सुकतेचे केंद्र बनला आहे. सक्करदरा तलाव, गांधीसागर तलाव, बोटॅनिकल गार्डन, सेमिनरी हिल्स, तेलंगखेडी मंदिर, अजब बंगला, सीताबर्डीचा किल्ला, कल्याणेश्वर मंदिर तसेच अंबाझरी तलाव ही प्रेक्षणीय स्थळे आहेत.

(संपादक, महाराष्ट्र टाइम्स (नागपूर आवृत्ती))



**गेल्या तीन वर्षांच्या काळात ऊर्जा विभागात अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. यामुळे राज्य भारनियमनमुक्त झाले. दुष्काळी भागात वीजसुविधा पुरवण्यासाठी एक हजार कोटींपेक्षा जास्त निधी उपलब्ध करून दिला. महापारेषणांतर्गत वीजपुरवठ्याचे जाळे मजबूत करण्यास प्रारंभ झाला. मोठ्या प्रमाणात कृषी पंपांना वीज जोडणी देण्यात आली. त्यासाठी विशेष पॅकेज देण्यात आले.**

# भारनियमनमुक्तीचे यश

**विवेक जोशी**

कोळशाच्या नैसर्गिक टंचाईमुळे दिवाळीपूर्वीचे आठ दिवस वगळले तर राज्यात तीन वर्षांपासून भारनियमन नाही. ज्या भागात वीज खंडित असेल तेथे अन्य कारणांमुळे वीजपुरवठा खंडित झाला असेल पण भारनियमनामुळे वीजपुरवठा खंडित झाला नाही.

पारंपरिक म्हणजेच कोळशाच्या विजेवरून या राज्याला सौर ऊर्जेकडे वळवण्यात ऊर्जा विभाग यशस्वी झाला आहे. मागील तीन वर्षांच्या काळात सौर ऊर्जेबाबत जनजागृती करण्यास ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात ऊर्जा विभाग यशस्वी झाला आहे. महाऊर्जेच्या विविध योजनांमुळे शेतकरी आणि सामान्य माणसाला दिलासा मिळणार आहे.

### एक ग्रामपंचायत एक वीजसेवक

विदर्भात महावितरणची अनेक कामे सुरू आहेत. जुने साहित्य बदलवणे, नवीन उपकेंद्र स्थापन करणे, ऑनलाइन वीज बिल भरणे, मोबाइल ॲप अशा योजना महावितरणाने सुरू केल्या आहेत.

ग्रामीण भागासाठी ‘एक ग्रामपंचायत एक वीजसेवक’, ही योजनाही सुरू झाली. दुष्काळी भागात वीजसुविधा पुरवण्यासाठी एक हजार कोटींपेक्षा जास्त निधी शासनाने उपलब्ध करून दिला आहे. विदर्भ मराठवाड्यातील उद्योगांना वीज दरात सवलत दिली आहे. नागपूरच्या मिहानला ४ रुपयांत वीज दिली आहे.

महापारेषणांतर्गत वीजपुरवठ्याचे जाळे मजबूत करण्यात येत आहे. ३० मार्च रोजी २३ हजार मेगावॅट या सर्वोच्च मागणीचे पारेषण कोणत्याही अडथळ्याविना यशस्वीपणे करण्यात आले. पुढील पाच वर्षाचा आराखडाही महापारेषणाने तयार केला आहे. त्यात ८६ नवे उपकेंद्र उभारली जातील. महानिर्मितीची वीजनिर्मिती क्षमता गेल्या तीन वर्षात वाढली आहे. कोराडी येथे १९८० मेगावॅटचे ३ नवीन संच उभारून, त्यातून वीजनिर्मिती सुरू झाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या संचांचे लोकार्पणही नुकतेच झाले.

### कृषी पंपांना वीज जोडण्या

महावितरणाने पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यात मागील तीन वर्षात ५५ हजार



९३८ कृषी पंपांना वीज जोडण्या दिल्या आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रलंबित कृषी पंप जोडणीकरिता आणि चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांचा अनुशेष पूर्ण करण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या विशेष पॅकेजमधून या वीज जोडण्या करण्यात आल्या.

महावितरणाने नागपूर जिल्ह्यात आतापर्यंत १० हजार ८९४; वर्धा जिल्ह्यात १० हजार ४०९; चंद्रपूर जिल्ह्यात ९ हजार ८३३; गडचिरोली जिह्यात ८ हजार ६३१; गोंदिया जिल्ह्यात ८ हजार ८४७; भंडारा जिल्ह्यात ७ हजार ३२४ कृषी पंपांना वीज जोडण्या दिल्या आहेत.

### शेतकऱ्यांना दिलासा

कृषी पंपासाठीच्या वीज जोडणीचे पैसे भरुनही अद्याप वीज जोडणी मिळाली नसलेल्या शेतकऱ्यांना चालू आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत वीज जोडणी देण्याचा महावितरणचा मानस आहे. पूर्व विदर्भातील सहाही जिल्ह्यातील एकूण १८ हजार २४८ ग्राहकांची वीज जोडणी प्रलंबित आहे. यात नागपूर जिल्ह्यातील ३४२१, वर्धा जिल्ह्यातील ३७४३, चंद्रपूर जिल्ह्यातील २८३२, गडचिरोली जिल्ह्यातील २७६५, गोंदिया जिल्ह्यातील २५५२ तर भंडारा जिल्ह्यातील २९३५ शेतकऱ्यांचा समावेश आहे. डिसेंबर २०१४ पर्यंत विदर्भातील प्रलंबित असलेल्या कृषी पंपाच्या जोडणीसाठी ३५९ कोटींचे विशेष पॅकेज – (एक) देण्यात आले. त्यानंतर विदर्भासाठीच्या ६८६ कोटींचा विशेष पॅकेज (दोन) अंतर्गत नागपूर जिल्ह्यासाठी ३८ कोटी, वर्धा जिल्ह्यासाठी ७५.६८ कोटी, चंद्रपूर १८ कोटी, गडचिरोली ६ कोटी, गोंदिया ४१ कोटी आणि भंडारा जिल्ह्यासाठी १५ कोटीची कामे करण्यात आली.

विशेष पॅकेजशिवाय महावितरणचा पायाभूत विकास आराखडा आणि सोबतच जिल्हा नियोजन समिती, रोजगार हमी योजना आणि धडक सिंचन योजनेंतर्गतही महावितरण कृषी पंप ऊर्जीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात करीत आहे.

**(ऊर्जामंत्र्यांचे माध्यम प्रमुख)**

स्मार्ट विदर्भ सुंदर विदर्भ

# जन–वन विकास

**नवेगाव**–नागझिरा व्याघ्र प्रकल्प हे गोंदिया जिल्ह्याचे वैभव आहे. गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील ६५६.३६ चौ.कि.मी. क्षेत्रात विस्तारलेल्या पाच संरक्षित क्षेत्राचा समावेश करून, याला नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले. यामध्ये नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नवेगाव वन्यजीव अभयारण्य, नागझिरा वन्यजीव अभयारण्य, नविन नागझिरा वन्यजीव अभयारण्य आणि कोका वन्यजीव अभयारण्य या संरक्षित क्षेत्राचा समावेश आहे. या व्याघ्र प्रकल्पाला लागून १२४१.२७ चौ.कि.मी. बफर झोन क्षेत्र आहे.

व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावांचा सर्वांगीण विकास करून मानव व वन्यजीवांचे सहजीवन प्रस्थापित करण्यासाठी वन्यजीव विभागाच्यावतीने 'डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन–वन विकास' योजना राबवण्यात येत आहे.



मागील दोन वर्षात एकूण ८४ ग्राम परिस्थिती विकास समित्यांची स्थापना या वनपरिक्षेत्रांतर्गत करण्यात आली आहे. या वर्षात आणखी १३ गावात ह्या समित्या स्थापन करण्यात येत आहेत. या समित्यांमार्फत ६८६४ कुटुंबांना गॅस कनेक्शन वाटप करण्यात आले तर ४७५६ कुटुंबांना सिलेंडरचा पुरवठा केला आहे.

वनावरील रोजगारानिमित्त असलेले अवलंबित्व कमी करण्यासाठी २४६ कुटुंबांना दुधाळ जनावरांचे वाटप करण्यात आले. वन्यप्राणी शेतातील विहिरीत पडून त्यांचा मृत्यू होऊ नये यासाठी ३६९ विहिरींना संरक्षित कठडे बसवण्यात आले आहे. २२८ कुटुंबांना सौर कंदिलांचा पुरवठा, वन्यप्राण्यांपासून शेतातील पिकांचे संरक्षण व्हावे यासाठी ३५९ शेतकऱ्यांच्या शेताला सौर कुंपण, ११५२ कुटुंबाकडे शौचालये, २८ तलाव खोलीकरणाची कामे, गॅस कनेक्शन दिलेल्या कुटुंबापैकी २८३७ कुटुंबांना स्वयंपाकाचे ओटे व ३१८९ घरी स्वयंपाकासाठी निर्धूर चुली दिल्या आहेत. ग्राम परिस्थिती विकास समित्यामधील ७९ युवकांना मध्यप्रदेशातील छिंदवाडा येथील अशोक लेलॅन्ड कंपनीत वाहन चालक प्रशिक्षण, कोल्हापूर येथे वेल्डिंग इलेक्ट्रिक प्रशिक्षण आणि ४ मुलींना अमरावती येथे हेल्थ केअरचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

बफर क्षेत्रातील गावातील ४५४ युवकांना निसर्ग संवेदना व स्वयंरोजगार शिबिरामधून प्रशिक्षित करण्यात आले आहे. ९० महिलांना लाखेपासून बांगड्या तयार करण्याचे प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षित करण्यात आले आहे. परसोडी येथे शिक्षित युवकांना नोकरीच्या दृष्टीने स्पर्धा परीक्षेची तयारी करता यावी यासाठी ग्रंथालय सुरू केले आहे. ग्राम परिस्थिती विकास समिती आतेगाव मार्फत ६५०० क्विंटल सेंद्रिय तांदुळाचे उत्पादन करून विक्री करण्यात आली आहे. या समित्यांमार्फत १२ अभ्यास दौरे काढण्यात आले. २ कोटी आणि ४ कोटी वृक्ष लागवडीतदेखील या समित्यांनी सहभाग घेऊन, वृक्षांची लागवड केली. २०१७–१८ या वर्षात वनालगतच्या ९३ गावातील १०० टक्के कुटुंबांना गॅस कनेक्शन देण्यासाठी वनसंरक्षक तथा संचालक, नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र कार्यालयाला १ कोटी ९३ लक्ष ६८ हजार रुपये निधी प्राप्त झाला आहे.

**– विवेक खडसे**

(जिल्हा माहिती अधिकारी, गोंदिया)

# गोसीखुर्द झाले गतिमान

रवी गिते

**भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात वैनगंगा नदीवर बांधण्यात येत असलेला गोसीखुर्द हा राज्यातील एकमेव राष्ट्रीय प्रकल्प आहे. गेल्या तीन वर्षात प्रकल्पाच्या कामाला वेग आला आहे. केंद्र व राज्य शासनाने हा प्रकल्प २०१९ मध्ये पूर्ण करण्याचा निर्धार केला आहे. गोसीखुर्दमध्ये झालेल्या कामांमुळे जून २०१७ अखेर ६२ हजार २६३ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. डिसेंबर २०१९ अखेर १ लाख ८८ हजार ५३७ हेक्टर सिंचन क्षमता निर्मितीचे नियोजन आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: गोसीखुर्द प्रकल्पावर नजर ठेवून आहेत. मुख्यमंत्री यांच्या वॉररूममध्ये गोसीखुर्दचा समावेश आहे. या प्रकल्पांतर्गत १ लाख ९० हजार हेक्टर सिंचन क्षेत्र प्रस्तावित असून त्यापैकी १३ हजार ८९३ हेक्टरच्या लाभक्षेत्र विकासाची कामे पूर्ण झाली आहेत. हा प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेत अंतर्भूत करण्यात आला असून केंद्रीय जल आयोगाने नाबार्डमार्फत ७५० कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. यामुळे नागपूर, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यातील शेकडो गावांना सिंचनाचा लाभ मिळाला आहे.

## सिंचनाचा लाभ

केंद्र शासनाकडून ९० टक्के अर्थसाहाय्य प्राप्त होत आहे. पूर्व विदर्भातील या सर्वात मोठ्या बहुउद्देशीय प्रकल्पाद्वारे सिंचन सुविधेबरोबरच पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, औद्योगिक पाणीपुरवठा, मत्स्यव्यवसाय व जलविद्युत निर्मिती होणार आहे. या प्रकल्पामुळे नागपूर, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यातील एकूण १ लाख ९० हजार हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळेल. त्यापासून २ लाख ५० हजार ८०० हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण होईल. गोसीखुर्द राष्ट्रीय जल प्रकल्पाच्या १८,४९४.५७ कोटी रुपयांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता राज्य शासनाने दिली आहे.


गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प हा नागपूर, भंडारा, चंद्रपूर या जिल्ह्यांच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरणार असल्यामुळे; राज्य व केंद्र शासनाने अपूर्ण असलेली कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे.

या प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे काम पूर्ण झाले असून, प्रकल्पामध्ये ६२० दशलक्ष घनमीटर जलसाठा उपलब्ध झाला आहे. या प्रकल्पातून ६२ हजार २६३ हेक्टर क्षेत्राला सिंचनाची सुविधा झाली आहे. या प्रकल्पाच्या पाणी वितरिकेचे काम पूर्ण झाल्यानंतर सुमारे २ लाख ५० हजार ८०० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळेल.

## कामांना गती

गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प नऊ घटक मिळून तयार झाला आहे. यामध्ये मुख्य धरण चार उपसासिंचन योजना, उजवा कालवा, डावा कालवा, असोला-मेंढा प्रकल्प व इतर छोट्या पाच उपसासिंचन योजनांचा समावेश आहे. या प्रकल्पाच्या कामांना गती मिळाल्याने शेतापर्यंत सिंचनासाठी पाणी मिळत आहे. त्यामुळे भातपिकासह इतर पिकांच्या उत्पादनामध्ये वाढ झाली आहे.

या प्रकल्पाचे काम नियोजित आराखड्यानुसार पूर्ण करायला शासनाने प्राथमिकता दिली आहे.



## पाण्याची उपलब्धता

या प्रकल्पाचा उजवा कालवा ९९ किलोमीटरचा असून त्यामुळे भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यातील सुमारे ७१ हजार ८१० हेक्टर सिंचन निर्माण होईल. त्यापैकी १३ हजार ९२६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. डावा कालवा हा २३ किलोमीटरचा असून, यामधून ३१ हजार ५७७ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल. त्यापैकी १० हजार ६८३ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळत आहे. उजवा कालव्याच्या पुढे आसोलामेंढा प्रकल्प मुख्य कालव्यापर्यंत राहणार आहे. त्याची लांबी ४३ किलोमीटरची आहे. यामधून १२ हजार ३५६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचे पाणी उपलब्ध झाले आहे.


## विदर्भास वरदान

बांधकामाची सद्य:स्थिती, किमतवाढीची कारणमीमांसा, प्रकल्पातील कामाच्या अनुषंगाने झालेल्या अनियमिततेबाबत शासनाने नियुक्त केलली मेंढीगिरी समिती, वडनेरे समिती, सिंचनविषयक विशेष चौकशी समितीने नोंदवलेले आक्षेप, त्याअनुषंगाने शासनाने केलेली कार्यवाही यांचा परामर्श घेऊन, पूर्व विदर्भास वरदान ठरणाऱ्या या प्रकल्पाला मंत्रिपरिषदेने तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली.

या मान्यतेच्या आधारे केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. केंद्रीय जल आयोगाकडून प्रस्तावाची तांत्रिक व आर्थिक तरतुदीची छाननी झाल्यानंतर, केंद्रीय जल आयोगाने निश्चित केलेल्या किमतीनुसार केंद्र शासनाबरोबर अर्थसाहाय्य मिळण्याबाबत सुधारित सामंजस्य करार करण्यात येणार आहे. जून २०१९ पर्यंत गोसीखुर्द प्रकल्पाची कामे पूर्ण करण्यात येतील.


**(जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा)**





**'तलाव तेथे मासोळी' या अभियानाच्या माध्यमातून पूर्व विदर्भातील शाश्वत सिंचनासोबत उपलब्ध असलेल्या जलक्षेत्राच्या अतिरिक्त वापराला प्रोत्साहन मिळणार आहे. गोड्या पाण्यातील भूजलक्षेत्रात मत्स्य व्यवसायासाठी मोठा वाव असल्यामुळे, शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्नाचे हमखास स्रोत उपलब्ध होत आहेत. प्रत्येक तलावावर १० ते १५ व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, प्रतिहेक्टरी ४ हजार किलो मत्स्यउत्पादन शक्य होणार आहे. महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठाचे तांत्रिक मार्गदर्शन मिळत असल्यामुळे विदर्भात नीलक्रांतीची सुरुवात झाली आहे.**

# मासे पिकवा, समृद्ध व्हा...



**अनिल गडेकर**

पूर्व विदर्भातील गोड्या पाण्यातील भूजल क्षेत्रात मत्स्यव्यवसायासाठी चांगला वाव आहे. नागपूर, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यात माजी मालगुजारी तलावांचे मोठ्या प्रमाणात जाळे असल्यामुळे उन्हाळा वगळता, आठ महिने मुबलक पाणी उपलब्ध असल्यामुळे शेतीला पूरक व्यवसाय म्हणून मत्स्यशेतीला वाव आहे.

सद्य:स्थितीत मत्स्यपालन अल्पप्रमाणात असून उपलब्ध क्षमतेच्या तुलनेत मत्स्योत्पादन होत नसल्यामुळे, देशाच्या विविध भागातून मोठ्या प्रमाणात मासोळी आयात करण्यात येते.

गोड्या पाण्यातील मासोळीला मुंबईसह कोलकाता तसेच देशाच्या विविध भागातून चांगली मागणी आहे. 'तलाव तेथे मासोळी' या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमुळे शेतकऱ्यांचे व ग्रामीण भागातील कुटुंबांचे उत्पन्न दुप्पट होणार आहे. केंद्र शासनानेही 'नीलक्रांती' धोरणांतर्गत भूजलाशयातील मत्स्य व्यवसायिकांचे उत्पन्न वाढवण्याच्या संकल्प केला आहे.



## नीलक्रांती

नीलक्रांतीची सुरुवात नागपूर विभागापासून सुरू झाली आहे. विदर्भात या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला शेतकऱ्यांचा मोठा सहभाग मिळत आहे.

नागपूर विभागात १४ मोठे प्रकल्प, ४९ मध्यम प्रकल्प आणि राज्य व स्थानिक क्षेत्र मिळून ६१८ लघुसिंचन प्रकल्प आहेत. याशिवाय ६ हजार ७३४ माजी मालगुजारी तलाव मत्स्यसंवर्धनासाठी उपयुक्त आहेत. नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांत सरासरी एक ते दीड हजारापेक्षा जास्त पर्जन्यमानाची



नोंद होत असल्यामुळे, मत्स्यशेतीसाठी हमखास पाणी उपलब्ध असलेला हा प्रदेश असूनही; मत्स्यपालनासाठी कायम दुर्लक्षित राहिलेला आहे.

जलयुक्त शिवार अभियानामुळे गाव तलावातील गाळ काढण्यापासून, खोलीकरणापर्यंत विविध कामे झाल्यामुळे जलसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. या गावतलावासह सर्वच प्रकल्पांमध्ये शास्त्रोक्त पद्धतीने मत्स्यपालन केल्यास त्यापासून आठ ते बारा महिन्याच्या कालावधीत उच्च उत्पन्न देणारे मत्स्य उत्पादन करून, पूरक उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध होत आहेत.

मासोळी हे मानवीय आहारातील प्रथिन घटकचा उत्कृष्ट स्रोत आहे. बहुतांश लोकांच्या आहारात मासोळीचे सेवन होत असल्याने मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून उत्तम दर्जाचे अन्न सहज उपलब्ध होऊ शकते.

ग्रामीण भागातील कुपोषण निर्मूलनाला साहाय्यभूत असल्यामुळे विभागीय आयुक्त अनूप कुमार यांनी पूर्व विदर्भातील शेतीपूरक कार्यक्रमही गोड्या पाण्यातील मत्स्यपालनासाठी तलाव तेथे मासोळी या उपक्रमाची सुरुवात केली आहे. पहिल्याच वर्षी या उपक्रमाला शेतकऱ्यांचा चांगला सहभाग मिळाला.

## तलाव तेथे मासोळी

'तलाव तेथे मासोळी' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय स्तरावर कालबद्ध कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष गट तयार करण्यात आला आहे. जिल्ह्यामध्ये असलेल्या जलाशयाच्या निवडीपासून तर पावसाळ्यानंतर या जलाशयामध्ये मत्स्यजीरे व बोटुकलीचा पुरवठा करण्यापासून त्याच्या संगोपनापर्यंतचा कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती गठित करण्यात आली असून, यामध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सहअध्यक्ष असून, साहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय सदस्य



सचिव करण्यात आले आहेत.


## मत्स्यबीज संवर्धन

गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन हे इतर जलक्षेत्राच्या तुलनेत अत्यंत उपयुक्त असून, गतीने वाढणाऱ्या मासोळीच्या बीजाचे संचयन केल्यास निर्धारित कालावधीत त्याची वाढ अपेक्षित असते. त्यामुळे जास्त प्रमाणात मत्स्योत्पादन मिळू शकते.

भारतीय कृषी अनुसंधान परिषद यांनी गोड्या पाण्यातील आढळणाऱ्या व तलावात राहणीमान असे भारतीय प्रमुख कार्प जातीच्या मासोळीसाठी हे तलाव उपयुक्त असल्याचे सिद्ध केले आहे. यामध्ये कटला, रोहू, मृगळ, चंदेरी, गवत्या आदी मत्स्यबीज संचयन करता येते. या बीजाचे आकारमान ५० मीमी ते ८० मीमी दरम्यान राहिल्यास त्याला बोटुकली असे म्हणतात. या मासोळीचे प्रजनन जून ते ऑगस्ट या कालावधीत असते.

मत्स्यबीज संवर्धन कार्यक्रमांतर्गत ८ हजार ते १ लाख २० हजार प्रतिहेक्टर संचयन करणे अपेक्षित आहे. संचयनानंतर एक हेक्टर तलावासाठी दोनशे किलो शेण आणि १५ किलोग्राम सिंगल सुपर फास्फेटच्या स्वरूपात प्रत्येक आठवड्यात वापर करण्यासोबतच मत्स्यबीजाच्या योग्य वाढीसाठी पूरक खाद्याचीसुद्धा आवश्यकता आहे.

पूर्व विदर्भातील गोड्या पाण्यातील नीलक्रांतीला चालना देण्यासाठी मत्स्यजिरे ते बोटुकली आणि बोटुकलीपासून माशांचे उत्पादन हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. यामध्ये नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमध्ये ५८८ शेततळी, ८४० जिल्हा परिषद मालकिचे मालगुजारी तलावांच्या २ हजार ९८३ हेक्टर जलक्षेत्रात १८२ लक्ष मस्त्य बोटुकली संचयन करण्यात येणार



## तलावांची निवड

तलाव तेथे मासोळी हा उपक्रम केवळ प्रशासकीय योजनेच्या स्वरूपात न राबवता एक अभियान म्हणून राबवण्यासाठी लोक सहभागाला प्राधान्य देण्यात आले आहे. या अभियानामध्ये महत्त्वाच्या अधिकाऱ्यांसह या क्षेत्रात कार्य करणाऱ्या मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था 'उमेद'चे प्रतिनिधी तालुकापेसा समन्वय समिती व प्रमुख कास्तकारांचा सहभाग घेण्यात आला आहे. यासाठी विशेष प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. विभागातील सर्वच जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

तलाव तेथे मासोळी या उपक्रमांतर्गत मत्स्य



संवर्धनासाठी तळी अथवा तलावांची निवड करताना निकष ठरवण्यात आले आहेत. यामध्ये तलावाचा तळभाग (माती) पाणी रोखणारा असावा, तलावात किमान आठ ते कमाल बारा महिने पाणीसाठा असावा, संपूर्ण हंगामात पाण्याची पातळी १.५ ते २.० मीटर असावी आणि ज्या तलावातून शेतीसाठी पाण्याचा कमी वापर होतो अशा तलावांची निवड करण्यासोबतच, तलावाचा सांडवा उथळ नसावा किंवा पावसाळ्यात ओवरफ्लोमुळे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात आली असून; गावाजळील तलावांना प्राधान्य देण्यात आले आहे.



बोटुकली ते मत्स्यसंवर्धन याची साखळी निर्माण करताना ६४ तालुक्यांतील २७४ महसूल मंडळमध्ये प्रत्येकी १० तलावांना आवश्यक असणाऱ्या मत्स्यबीजाची निर्मिती आणि त्याची उपलब्धता यावर विशेष भर देण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत १ हजार ३०५ तलावांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये ४ हजार ६९३.७३ हेक्टर जलक्षेत्र उपलब्ध झाले आहे. या जलक्षेत्रामध्ये १९६.७८ लाख बोटुकली संचयन करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. या उपक्रमांतर्गत १८ हजार ७७५ मेट्रिक टन मत्स्यउत्पादन अपेक्षित असल्याचे निश्चित करण्यात आले आहे. यासाठी महामंडळाच्या अखत्यारीत असलेल्या जलक्षेत्राचाही समावेश आहे.

आहे. त्यापासून ११ हजार ९८८ मेट्रिक टन मत्स्योत्पादन अपेक्षित आहे. सध्या भंडारा, चंद्रपूर, वर्धा जिल्ह्यातील तलावांमध्ये मत्स्य बोटुकली संचयनाला सुरुवात करण्यात आली आहे. ऑक्टोबरपर्यंत ३२ लक्ष मत्स्य बोटुकली संचयन पूर्ण झाले आहे.

## प्रभावी अंमलबजावणी

या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी मत्स्य विकास विभागाच्या नियमित योजनेसोबतच केंद्र शासनाच्या नीलक्रांती धोरणांतर्गत, जिल्हा वार्षिक योजनेच्या नावीन्यपूर्ण योजनेमधून, या योजनेला प्राधान्य देण्यात आले आहे. आदिवासी विभागाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आला आहे. मानव विकास कार्यक्रम तसेच सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर), महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना आदी योजनांचे अभिसरण करून; जिल्हास्तरावर या योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था, खाजगी मत्स्य संवर्धक, शेततळीधारक सामान्य शेतकरी, स्वयंसाहाय्यता बचतगट यांना या योजनेत सहभागी करण्यात आल्यामुळे, जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक वाढण्यास मदत होणार असून; स्थानिक बेरोजगार युवकांना मत्स्यव्यवसायाचा रोजगार उपलब्ध होणार आहे.

**(जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर)**

**पावसाची अनियमितता आणि पडलेल्या पाण्याच्या योग्य नियोजनाअभावी बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. यावर रचनात्मक उपाययोजना म्हणून जलयुक्त शिवार अभियान प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. प्रामुख्याने लोकसहभागावर आधारित या योजनेचे दृश्य परिणाम सर्वत्र दृष्टिक्षेपात आले आहेत.**

# आता मिटेल पाणीटंचाई



मार्डी गावातील नालाखोलीकरण (ता.तिवसा, जि. अमरावती)

जलयुक्त शिवार योजनेमुळे पाणी पातळीत वाढ झाली. जागोजागी झालेल्या पाणी अडवण्याच्या कामांमुळे अल्पशा पावसातही शिवार भरले आहेत. अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करतानाच संरक्षित सिंचनाचीही व्यवस्था उभी राहिली आहे. यामुळे शाश्वत शेतीची संकल्पना पश्चिम विदर्भात उदयास आली आहे.

## आधार मिळाला

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१९पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र टंचाईमुक्त करण्याचा क्रांतिकारी निर्धार केला. त्यांच्या निर्धाराला अमरावती विभागातील जलयुक्तच्या कामांनी खऱ्या अर्थाने आधार दिला आहे.

२०१५-१६ मध्ये राज्यातील सहा हजार २०२ गावांपैकी १ हजार ३९६, तर दुसऱ्या वर्षी २०१६-१७ मध्ये या पाच हजार २९१ गावांपैकी ९९७ गावांनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदविला. या सहभागाचे प्रतिबिंब निर्माण झालेल्या पाणीसाठा क्षमतेतून उमटले आहे. २०१५-१६ मध्ये राज्यात एकूण १० लाख ८२ हजार २३५ टीसीएम पाणीसाठा क्षमता निर्माण झाली, यातील एकट्या अमरावती विभागात १७.३४ टक्के म्हणजेच १ लाख ८७ हजार ७११ टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला आहे. दुसऱ्या वर्षी २०१६-१७ मध्ये ४ लाख ९२ हजार २८९ या पाणीसाठ्याच्या तुलनेत ११.३४ टक्के म्हणजेच ५५ हजार ८५९ टीसीएम पाणीसाठा क्षमता विभागातील पाच जिल्ह्यात निर्माण झाली आहे.

## जलसंचय

जलसंधारणाचे ज्ञान, जलसंपदाचे तंत्रज्ञान, कृषीची निकड, भूजल सर्व्हेक्षण यंत्रणेचे मापदंड, पाणी पुरवठ्याची यंत्रणा, वन विभागाची उपचाराची कामे, सामाजिक वनीकरणाचे सहकार्य या सर्वसमावेशक उपाययोजनांमधून; एकात्मिक पद्धतीने अवर्षण स्थितीवर मात करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यातून प्राधान्याने पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध करून दिले गेले. अमरावती विभागात गुणवत्तापूर्ण आणि पारदर्शी पद्धतीने या शिवार योजनेंतर्गत एकात्मिक पद्धतीने कामे करण्यावर भर दिला जात आहे. २०१५-१६ या वर्षात पाच जिल्ह्यातील एक हजार ३९६ तर २०१६-१७ मध्ये ९९७ गावांमध्ये हे अभियान राबवण्यात येत आहे. या दोन वर्षांतील ७१ हजार ८५८ कामांची फलनिष्पत्ती ही निर्माण झालेल्या दोन लाख ४३ हजार ५७० टीसीएम पाणीसाठा क्षमतेवरून दिसून येते आणि यासाठी प्रती टीसीएम खर्च केवळ ४६ हजार ५४९ रूपये इतकाच आला आहे.

## चळवळ रुजली...

जनसहभागाची ही चळवळ खेड्यापाड्यांत रुजत आहे. प्रामुख्याने ज्या गावाला सातत्याने पाणीटंचाईची झळ पोहोचत आहे, अशा गावांमधील नागरिक हे अभियान आपले अभियान म्हणून राबवण्यात पुढाकार घेत आहेत. भूजल पातळीत वाढ होण्यासोबतच शिवाराशिवारांत पाणीसाठे निर्माण झाल्यामुळे जेमतेम खरीप पीक घेणारा शेतकरी रब्बी पिकांकडे वळला आहे. शेतकऱ्यांच्या बदलेल्या मानसिकतेमुळे अमरावती जिल्ह्यात रब्बीमध्ये सुमारे २१ हजार हेक्टर क्षेत्रात वाढ नोंदवली गेली. यवतमाळ जिल्ह्यात ६७ हेक्टर क्षेत्रात अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण झाली. अकोला जिल्ह्यात २७ हेक्टर क्षेत्रात दोन वेळच्या पाण्याचे संरक्षित सिंचन निर्माण

झाले. बुलढाणा जिल्ह्यात १ हजार २९२ टीसीएम पाणीसाठा झाला आहेत. खामगाव तालुक्यातील तोरणा नदीवर सात बांध बांधण्यात आले. यामुळे अटाळी, शिर्ला नेमाने, विहीगाव, आंबेटाकळी या अवर्षण गावांमधील पाणीटंचाई तर दूर झालीच, शिवाय येथील शेतकरी आता रब्बी पिकेही घेत आहेत.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. परंतु गेल्या दोन वर्षात खरिपासह रब्बी पिकांनाही जलयुक्तमुळे पुरेसे पाणी उपलब्ध होत असल्यामुळे, पिकांच्या उत्पादन क्षमतेमध्ये चांगले परिणाम दिसून येत आहेत. पाण्याची उपलब्धता शिवारातच होत असल्यामुळे रब्बी पीक घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येतो.


खांदेश्वर, (ता. नांदगाव, जि. अमरावती) शेततळे

यवतमाळ जिल्ह्यातील ५८ गावे ही बारमाही टँकरने पाणी पुरवठा करावी लागणारी होती. या गावांमध्ये जलयुक्त शिवार कटाक्षाने राबवण्याच्या निर्णयानंतर गेल्या दोन वर्षांमध्ये येथील चित्र कमालीचे पालटले आहे. यातील ४६ गावे टँकरमुक्त झाली आहेत.

वाशिम जिल्ह्यातील तामसी गावात जलयुक्त शिवार अभियानातून पाच कोटी लीटर क्षमतेचे तळे निर्माण झाले. हे अभियान केवळ तात्पुरत्या स्वरूपात राबवण्यात येत नाही. तर भविष्यात या गावांमध्ये कधीही पाणीटंचाईची झळ पोहोचू नये, यावर भर देण्यात येत आहे.

### शेतकऱ्यांना फायदा

अनियमित पावसामुळे कृषी क्षेत्रावर विपरीत परिणाम होतो. पुरेशा पाण्याअभावी पिकांच्या उत्पादनावर आणि पर्यायाने

जलयुक्त शिवार योजनेत पाणीसाठा निर्माण करण्यासोबतच अस्तित्वात असलेल्या प्रकल्पांची क्षमता वाढवण्यावरही भर देण्यात आला आहे. लोकसहभागातून तलावाचा गाळ काढण्यामुळे पाणी साठवण्याच्या क्षमतेत वाढ तर होतेच आहे, त्यासोबतच हा गाळ शेतीमध्ये प्रामुख्याने फळबागांमध्ये उपयोगात आणल्या जात असल्याने जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होत आहे. नाल्यातून गाळ काढणे, खोलीकरण आणि रुंदीकरण यासह समतल चर, बंधारे बांधणे, विहिरींचे पुनर्भरण, शेततळे आदी उपचारांची कामेही करण्यात येत आहेत. यामुळे भूजल पातळीत वाढ होत आहे.

**– गजानन कोटुरवार**
सहायक संचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती.

स्मार्ट विदर्भ सुंदर विदर्भ

## लोकसहभागातून पुढे जाणारे अभियान

जलयुक्त शिवार अभियानातील कामांमुळे मोठ्या प्रमाणात कृषिक्षेत्र सिंचनाखाली आले आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीबाबत राज्यातील सर्वच विभागातील परिस्थितीचा मुख्यमंत्री सातत्याने आढावा घेत असतात. जलयुक्त शिवारासाठी आलेला निधी वेळेवर खर्च झाला किंवा नाही, या निधीतून चांगल्या प्रकारची कामे झाली किंवा नाहीत याबाबत सविस्तर आढावा घेतला जातो.

जलयुक्त शिवार योजनेंतर्गत २०१५-१६ या वर्षापासून पुढील पाच वर्षे दरवर्षी ५ हजार गावांची निवड टंचाईमुक्त करण्यासाठीचे धोरण शासनाने निश्चित केले आहे. अशा प्रकारे पाच वर्षांत २५ हजार गावांमधील टंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येत आहे. २०१५-१६ यावर्षी ६ हजार २०२ गावांची निवड करण्यात आली. २०१६-१७ या वर्षासाठी ५ हजार २८१ गावांची निवड करण्यात आली आहे.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवड करण्यात आलेल्या गांवामधील पाण्याचा ताळेबंद तयार करून, गावात पाण्याची उपलब्धता व आवश्यकता किती आहे व त्याकरिता कोणकोणते तंत्रज्ञान अवलंबविण्याची आवश्यकता आहे; हे शिवार फेरी करून ठरवण्यात येते. त्यानुसार गावाचा आराखडा तयार करण्यात येतो. आराखड्यास जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांची मान्यता घेण्यात आल्यानंतर गावातील कामांना सुरुवात होते. गाव शिवारातील वाहून जाणारे पाणी विविध पद्धतीने शिवारातच अडवले जाऊन गावामध्ये विकेंद्रित स्वरूपाचे पाणीसाठे निर्माण केले जातात.

## पाणीसाठा वाढला

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत २०१५-१६ मध्ये नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमध्ये एकूण १ हजार ७७ गावांची निवड करण्यात आली. निवड करण्यात आलेल्या गावांमध्ये एकूण २३ हजार ७५९





गोंडी दिग्रस (ता. काटोल, नागपूर) येथील लांडगी नदीवर असलेल्या पुलाखाली चार फुटापर्यंत स्टॉप वॉटर बंधारा बांधल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा सिंचनासाठी मोठा फायदा झाला आहे.

कामे सुरू करण्यात आली. ही सर्व कामे पूर्ण झाली असून यातून १ लाख ७८ हजार ८०० टीसीएम पाणीसाठा क्षमता निर्माण झाली आहे. त्यामुळे ८३ हजार ७२४ हे. क्षेत्र हंगामी सिंचनाखाली आले आहे. निवड झालेली सर्व १०७७ गावे जल परिपूर्ण (water neutral) झाली आहे. या योजनेंतर्गत २०१६-१७ मध्ये नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमध्ये एकूण ९१५ गावांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी ६५९ गावे जल परिपूर्ण (water neutral) झालेली आहेत. निवड करण्यात आलेल्या गावांमध्ये एकूण २० हजार ५५७ कामे सुरू करण्यात आली. त्यापैकी सप्टेंबर २०१७ अखेर १९ हजार ९९७ कामे पूर्ण झाली असून ८६० कामे प्रगतिपथावर आहेत. या अभियानातील गाळ काढण्याच्या कामात शासनाबरोबरच लोकसहभागही फार मोठ्या प्रमाणावर लाभत आहे.

## मुबलक निधी

२०१६-१७ या वर्षात शासनाकडून २७१.३२ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. विशेष निधी व अभिसरणाद्वारे उपलब्ध झालेल्या निधीमधून ३०८.९७ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. नागपूर विभागात २०१६-१७ मध्ये ५१ हजार ८३९ टीसीएम पाणी साठा क्षमता निर्माण झाली. २६ हजार ३८८ हेक्टर संरक्षित सिंचन क्षमता निर्माण झाली.

नागपूर विभागात या वर्षी सर्व जिल्ह्यांत सरासरीपेक्षा बराच कमी पाऊस झाला. गोंदिया, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोलीच्या भात क्षेत्रास मोठा फटका बसला. बऱ्याच ठिकाणी भाताच्या रोवण्या होऊ शकल्या नाही मात्र या अभियानात नाला खोलीकरण, शेततळे विहिरी पुनर्भरण इत्यादी कामे झालेल्या क्षेत्रात साचलेल्या पाण्याद्वारे बऱ्याच कास्तकारांनी आपले पीक वाचवण्यात यश प्राप्त केले. हे या योजनेचे यश आहे.

जलयुक्त शिवार अभियान २०१७-१८ मध्ये नागपूर विभागात ७५० गावांची निवड करण्यात आली असून, या सर्व गावांचे ए-१ आकारमानाचे रंगीन (पाणलोट क्षेत्र) Water shed नकाशे एम आर सॅक या संस्थेने तयार केलेले आहेत. ते नकाशे सर्व तालुकास्तरीय यंत्रणांना देण्यात आले आहेत. या नकाशात दर्शविल्यानुसार माथा ते पायथा या तत्त्वावर जलयुक्त शिवार अभियानाचा गाव आराखडा तयार करणे सुरू असून, हे काम अंतिम टप्प्यात आहे. या पद्धतीनुसार पाणलोट क्षेत्रामध्ये वरच्या भागात जोपर्यंत क्षेत्र विकासाची (Area Treatment) ची ७० टक्के कामे पूर्ण होत नाही तेव्हापर्यंत खालच्या भागात सिमेंट बंधारे घेण्यात येणार नाही. जेणेकरून बंधाऱ्यात गाळ जमा होणार नाही. वरच्या भागातील Area Treatment ची कामे घेतल्याने जमिनीची धूप थांबून जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण वाढेल.

जनमाणसांचा, शेतकऱ्यांचा विकास साधावा, निसर्गाच्या लहरीपणाचा फटका येथील अन्नदात्याला सोसावा लागू नये यासाठी ही कमी खर्चाची संकल्पना महाराष्ट्रात राबवली जात आहे. या योजनेत लोकसहभाग असावा यासाठी विविध माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. मुख्यमंत्र्यांनी बहुतेक सर्व जिल्ह्यातील विविध कामांना भेटी देऊन लोकसहभागाचे कौतुक केले. लोकसहभागातील सातत्य टिकविणे आणि या अभियानाला आलेले लोकचळवळीचे रूप टिकवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

**- जगन्नाथ पाटील**
सहायक संचालक, विभागीय माहिती कार्यालय, नागपूर

**उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत पूर्व विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा आणि नागपूर जिल्ह्यातील सरासरी पर्जन्यमान दरवर्षी समाधानकारक राहते. परंतु अनियमित व खंडित पावसामुळे आणि सिंचनाच्या योग्य सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याने पिकांवर विपरीत परिणाम होऊन शेतमालाच्या उत्पानादनात लक्षणीय घट होते. अशा परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहे. यावर उपाय म्हणून राज्य शासनाच्या वतीने ११ हजार सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम ११ सप्टेंबर २०१६ पासून राबवण्यात येत आहे.**

स्मार्ट विदर्भ सुंदर विदर्भ

# शेतकऱ्यांना वरदान



**अपर्णा डांगोरे-यावलकर**

सिंचन विहिरीच्या योजनेमध्ये ऑनलाइन अर्ज प्राप्त केले जातात. तसेच 'फर्स्ट कम, फर्स्ट सर्व्ह' (प्रथम येणाऱ्यास प्राधान्य) या तत्त्वावर मंजुरी देण्यात येते. हे या योजनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे विहीर मंजुरीला २ किंवा ३ वर्षे लागण्याची प्रक्रिया संपुष्टात आली आहे. ही बाब या योजनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

धडक सिंचन योजना दीड एकरपेक्षा अधिक शेतजमीन असणाऱ्या सर्व प्रवर्गाच्या शेतकऱ्यांसाठी खुली आहे. यामुळेच ११ हजार विहिरींच्या लक्षांकाच्या तुलनेत दुपटीपेक्षा अधिक अर्ज प्राप्त होऊन या योजनेस उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. या योजनेनुसार, ठरावीक कालावधीत विहीर मंजुरीची प्रक्रिया दोन महिन्यात पार पाडण्यात आली आणि डिसेंबर २०१६ अखेर बहुतांश विहिरींची कामे सुरू करण्यात आली. याचीच फलश्रुती म्हणून जून २०१७ अखेर अवघ्या ६ महिन्यांत यापैकी ५ हजार ७९० विहिरींना पुरेसे पाणी लागून या विहिरी पूर्णत्वास आल्या आहेत.

सिंचन विहिरींच्या धडक कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या योजनेत लाभार्थ्यांला स्वत:च्या इच्छेनुसार, कंत्राटदाराकडून किंवा स्वत: विहिरीचे काम करायचे आहे. यामुळे अनुदानाकरिता लाभार्थ्यांला पंचायत समितीच्या फेऱ्या मारण्याची गरज राहिली नाही. संबंधित जिल्हा परिषदेच्या कनिष्ठ अभियंताद्वारे मोजमाप झाले की, देयक पंचायत समितीस पाठविण्यात येते. पंचायत समितीद्वारे लाभार्थी शेतकऱ्याच्या बँक खात्यामध्ये झालेल्या कामाच्या मूल्यांकनाची थेट रक्कम जमा होते.

## लाभार्थ्यांचे निकष

आजपर्यंत सिंचन विहिरीचा कधीच लाभ न घेतलेले शेतकरी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. एका विहिरीकरिता जास्तीत - जास्त अडीच लाखांपर्यंतचे अनुदान शेतकऱ्यास प्राप्त होऊ शकते. या योजनेच्या लाभार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी सिंचन विहीर पूर्ण झाल्यावर विद्युत कनेक्शनकरिता वीज वितरण कंपनीद्वारे प्राधान्याने वीज जोडणी देण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना पूर्वी पंचायत समित्यांमार्फत जवाहर व नरेगा योजनेच्या माध्यमातून सिंचन विहिरी उपलब्ध होत होत्या. परंतु त्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या दारिद्र्यरेषेखालच्या प्रवर्गात लाभार्थ्यांना त्या विहिरींचा लाभ मिळत होता. राज्य शासनाने निर्णयात दुरुस्ती करून समाजातील सर्व प्रवर्गासाठी ही योजना खुली केली. ज्या शेतकऱ्यांकडे दीड एकर शेती आहे व ज्या शेतकऱ्याने यापूर्वी कोणत्याही योजनेतून सिंचन विहिरीचा लाभ घेतला नाही अशा सर्व शेतकऱ्यांना धडक सिंचन विहिरी उपलब्ध करून देण्याचे धोरण स्वीकारले आहे. एका वर्षात ११ हजार ६१४ धडक सिंचन विहिरींचे कार्यारंभ आदेश होऊन त्यातील अर्ध्यापेक्षा अधिक विहिरींचे काम पूर्ण झाले आहेत. या योजनेसाठी अंदाजे ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

## लाभार्थ्यांची प्रतिक्रिया

गडचिरोली जिल्ह्यातील चार्मोशी-मुलचेरा तालुक्याच्या जयरामपूर गावातील अंबादास माधव बल्की म्हणाले, 'यादोपल्ली येथे मला मे २००७ मध्ये सिंचन विहीर बांधून मिळाली. यामुळे आता पाण्याचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. पूर्वी शेतजमिनीला पाणी पुरवण्यासाठी ड्रमच्या साहाय्याने दुरून पाणी आणावे लागत होते. परंतु आता सिंचन विहिरीमुळे शेतातच पाणी उपलब्ध झाल्यामुळे हव्या त्या वेळेला फवारणी करणे शक्य होत आहे.'

गडचिरोली जिल्ह्यातील विवेकानंदपूर गावातील संजय शीवपथ कर्मकार आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाले की, 'विवेकानंदपूर तलावाशेजारी मला एप्रिल २०१७ मध्ये विहीर शेतामध्ये बांधून मिळाली. यामुळे माझ्या शेतातील धानपिकाला मी पाणी वेळेवर देऊ शकत आहे.'

(माहिती सहायक, नागपूर)

**विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये प्रशासनामार्फत नावीन्यपूर्ण प्रयोग राबवण्यात येत आहेत. यामुळे प्रशासनात गतिमानता आणि पारदर्शकता आली आहे. याचा नागरिकांनाही मोठा फायदा होत आहे. त्यातील काही प्रयोग राज्यस्तरावर नावाजले गेले. या प्रयोगांचा पॅटर्न राज्यभर लागू करण्यात आला आहे. हे प्रयोग प्रेरणादायी व नवा उत्साह निर्माण करणारे आहेत.**

# प्रेरणादायी प्रयोग



## आदर्श शाळा

भंडारा जिल्ह्याच्या लाखनी तालुक्यातील खराशी हे १३४८ लोकसंख्येचे गाव. हे गांव जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमुळे सतत चर्चेत असते. अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून शाळेने आपला नावलौकीक वाढवला आहे. भंडारा जिल्ह्यातच नव्हे तर नागपूर विभागात ही शाळा आदर्श शाळा म्हणून नामांकित आहे.

मुख्याध्यापक मुबारक अली सय्यद यांनी ४ वर्षापूर्वी पदभार स्वीकारल्यानंतर अनेक वेगवेगळे प्रकल्प राबवले. त्यातून ही शाळा सर्वोत्तम बनली आहे.

शिक्षकांची गुणवत्ता वाढल्यानंतर आणि विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल दिसू लागल्यानंतर त्यांनी सरपंच आणि गावकऱ्यांमध्ये जाणीव जागृती केली. आपला विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे राहू नये म्हणून अभिनव उपक्रम राबविण्यासाठी त्यांनी गावकऱ्यांची मदत घेतली.

मागील तीन वर्षांपासून या शाळेत सेमी इंग्रजी माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकवण्यात येत आहे. पहिलीपासून सेमी इंग्रजी माध्यम घेणारी ही जिल्ह्यातील एकमेव शाळा आहे. यासाठी शिक्षकांना वेळोवळी प्रशिक्षण देण्यात आले.

सेमी इंग्रजी माध्यमामुळे विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची भीती नाहिशी झाली असून या शाळेतील इयत्ता तिसरीतील विद्यार्थी सुद्धा इंग्रजीतून संवाद साधू शकतो. उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये तिसरीतील मुलांसाठी विशेष वर्ग भरविण्यात येतात. शाळेत लोकवर्गणीतूनच संगणक घेण्यात आले. त्यासाठी स्वतंत्र संगणक कक्षही तयार करण्यात आला आहे. संगणक उपलब्ध झाल्यामुळे इयत्ता पहिलीतील मुले संगणक हाताळायला लागली आहेत.

'थेंबे थेंबे तळे साचे' या म्हणीप्रमाणे शाळेत विद्यार्थ्यांची बँक आहे. यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांचे खाते असून विद्यार्थी जमेल तेवढे पैसे त्यामध्ये जमा करतात. या बचतीचा उपयोग शाळेतील विद्यार्थ्यांकरीता नवीन उपक्रम राबवण्यासाठी व सहली आयोजनासाठी करण्यात येतो.

शाळेतील मुलांना स्वस्त दरात व दर्जेदार शालेय साहित्य मिळावे म्हणून मुख्याध्यापकांनी शाळेत कँटीन सुरू केले. यासाठी नवनीत प्रकाशनासोबत करार करण्यात आला आहे. यामध्ये वह्या, पेन, पेन्सील,दफ्तर, शूज, टाय इत्यादी शालेय साहित्य पुरविण्यात येते. यासाठी विद्यार्थी बँकेचा उपयोग करण्यात येतो. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्य कमी किमतीत शाळेतच उपलब्ध होते शाळेने इंटरॅक्टीव्ह क्लासरूमचा प्रयोग राबवण्याचे ठरवले आहे. त्यासाठी लोकवर्गणीतूनच निधी उभारण्यात येत आहे. सुरुवातीला तीन महिने प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. त्यापासून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल आढळून आल्यास ही संकल्पना नेहमीसाठी राबवण्याची तयारी आहे अशी माहिती मुख्याध्यापकांनी दिली.

शाळेतील निसर्गरम्य वातावरण आणि मुलांचे शिकताना मन रमावे म्हणून वर्गखोल्यांची सुंदर सजावट केली आहे. साने गुरुजी स्वच्छ शाळेचा ५० हजार रुपयांचा जिल्हास्तरीय पहिला पुरस्कारही या शाळेला मिळाला आहे.

## फार्म टू फॅशन: वस्त्रोद्योग पार्क

विदर्भातील औद्योगिकीकरणाला गती देणारा प्रकल्प म्हणून अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथील टेक्सटाइल पार्क नावारूपाला येत आहे. पांढरे सोने विपूल प्रमाणात असलेल्या भागातच कापसावर प्रक्रिया करून वस्त्र निर्मितीसाठी रेमंड्स, सियाराम सिल्क मिल्स, श्याम इंडोफॅब यासारख्या नामांकित कंपन्या येत आहेत. सद्य:परिस्थितीत रेमंड कंपनीच्या वस्त्रनिर्मितीचा ३० एकरमध्ये पहिला टप्पा

विकसित केला असून लिननच्या वस्त्रनिर्मितीस प्राधान्य दिले आहे. त्याकरिता या प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक व अद्ययावत यंत्राच्या कार्यक्षमतेच्या चाचणीचे प्रात्याक्षिक सुरू आहे. दरदिवशी १३ हजार मिटर वस्त्रनिर्मिती तर लिननच्या ३.५ टन धाग्याची निर्मिती करण्यात येत आहे. यात वस्त्राचा दर्जा, यंत्रांचा अभ्यास व गुणवत्ता पडताळली जात आहे.

ताणा-बाणा बनवणे, खळ देणे, ब्लिचिंग, डाय करणे या सर्व प्रक्रियेसाठी व अत्याधुनिक यंत्रे व स्वतंत्र विभाग असून वस्त्रनिर्मितीसाठी ७० तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ५०० ते ७०० युवक प्रशिक्षण तत्त्वावर कार्यरत आहेत. स्थानिक तरुणांना या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे. लिननच्या वस्त्रनिर्मितीसाठी बेल्जियम व फ्रान्समधून कच्चामाल आयात केला जातो, तर सुती वस्त्रांकरिता जिल्ह्यातील कापसाचा उपयोग



केल्या जातो. कापूस पिकवणाऱ्या भागातच त्यावर प्रक्रिया उद्योग सुरू करण्याच्या धोरणामुळे, येथीलच शेती व्यवसायाला ऊर्जितावस्था प्राप्त होईल. अल्पावधीतच फॅशनचा दुनियेत सुटिंग, शर्टिंगची वस्त्रनिर्मिती करून अनेक कंपन्यांच्या समूहामुळे 'फार्म टू फॅशन' ची संकल्पना प्रत्यक्षात आणणारे नांदगाव पेठ म्हणजे टेक्सटाइल पार्क, अशी ओळख निर्माण झाली आहे. या माध्यमातून विदर्भातून निघणारा सोन्याचा धूर ही कल्पना पुन्हा एकदा प्रत्यक्षात उतरेल.

**– पल्लवी धारव**
माहिती साहाय्यक, अमरावती

## विकासाचा रेल्वेमार्ग

भारतात पहिली रेल्वे १६ एप्रिल १८५३ रोजी मुंबई ते ठाणे दरम्यान धावली. आज जवळपास ७० हजार किलोमीटरचा रेल्वे मार्ग भारतात आहे. महाराष्ट्रात रेल्वेचे जाळे एकूण रेल्वेमार्गाच्या १० ते १२ टक्के असून देशाच्या चारही दिशेला जाण्याची सोय नागपूर या मध्यवर्ती रेल्वे स्थानकावरून आहे. वाहतूक आणि दळणवळणाच्या



दिशेने रेल्वे हे सर्वाधिक सोयीचे असल्यामुळे दिवसेंदिवस त्याचा विस्तार वाढत आहे. विदर्भ आणि मराठवाड्याला विकासाच्या मार्गावर जोडण्यासाठी वर्धा-यवतमाळ-नांदेड या रेल्वेमार्गाचे काम गतीने होत आहे. यवतमाळ जिल्ह्यासाठी हा विकासाचा रेल्वेमार्ग ठरत आहे.

२००८ मध्ये वर्धा-यवतमाळ-नांदेड या रेल्वेमार्गाला मंजुरी देण्यात आली. एकूण २८४ किलोमीटरचा हा रेल्वेमार्ग तीन जिल्ह्यांतून जात आहे. यापैकी १८३.७९२ किमी.चा रेल्वेमार्ग एकट्या यवतमाळ जिल्ह्यात आहे. वर्धा ते नांदेड या रेल्वेमार्गावर एकूण २७ रेल्वे स्थानके असून, यापैकी १७ स्थानके यवतमाळ जिल्ह्यातील आहेत. कळंब, यवतमाळ, दारव्हा, दिग्रज, पुसद आणि उमरखेड या सहा तालुक्यांतून हा रेल्वेमार्ग जात असून; यवतमाळ जिल्ह्यात कळंब, तळेगाव, यवतमाळ, बोडबोधन, लाडखेड, तपोना, दारव्हा, अंतरगाव, हर्सुल, वायगाव, दिग्रस, बेलगाव, पुसद, हर्षी, पळसी आणि उमरखेड येथेही रेल्वे स्थानक राहणार आहेत. या रेल्वेमार्गावर एकूण ३२१ छोटे-मोठे पूल उभारले जातील. याशिवाय रस्त्याच्या खालून असलेल्या पुलांची संख्या १२० तर रस्त्याच्या वरून असलेल्या पुलांची संख्या ५१ आहे.

यवतमाळ जिल्ह्यात या प्रकल्पाकरीता ६ तालुक्यातील ९५ गावांमध्ये ११४४.८५ हेक्टर आर. जमीन संपादित करावयाची कारवाई सुरू आहे. सद्य:स्थितीत यापैकी ५५७.४३ हेक्टर आर. जमीन संपादित करण्यात आली आहे. यात ७५३ भूधारकांना ९२.६८ कोटी रुपये जमिनीचा मोबदला देण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनाकडून गावागावांत जाऊन मोबदला वाटण्याचे काम सुरू आहे. उर्वरित जमीन डिसेंबर २०१७ अखेरपर्यंत संपादित करण्यासाठी प्रशासन सर्वसहमतीने प्रयत्न करीत आहेत.

**– राजेश येसनकर**
प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ

## शेततळ्यांचे गाव – घुसर



अकोला जिल्ह्यातील घुसर गावात पाण्याची चळवळ उभी राहिली. या गावात शासनाच्या प्रोत्साहनाने १४२ शेततळी झाली. शेततळ्यांसाठी प्रत्येकी ८२ हजारांचे अनुदान दिले गेले. शेततळ्यांतील पाण्यातून हरभरा, गहू, मोहरी, कांदा, मिरची ही नगदी पिके घेतली जात आहेत. शेततळ्यांच्या पाण्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन तब्बल तीन पट वाढले आहे.

या शेततळ्यांमुळे येथील शेतकऱ्यांचे उत्पादन ३ कोटी रुपयांपेक्षा अधिक वाढले आहे. ४४ हेक्टर क्षेत्रावरील ग्राम बीजोत्पादन प्रकल्पातून ८१४ क्विंटल

प्रमाणित हरभरा बियाण्यांची निर्मिती झाली, त्यासोबतच मत्स्यशेतीचीही जोड दिली गेली आहे. शेततळ्यावर वीज जोडणी करून उपलब्ध जलसाठ्याचा उपयोग सिंचनासाठी होत आहे. सिंचनासोबतच शेतकऱ्यांनी मत्स्यपालन, सिमला मिरची, फळबागा यांचाही प्रयोग केला आहे.

**– प्रमोद धोंगडे**
प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी, अकोला

## सौर कृषी पंपांची संजीवनी



चोवीस तास हमखास वीज मिळण्यासाठी सौरपंपाचा उपयोग करण्याकडे शेतकऱ्यांचा कल मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. बुलडाणा जिल्ह्यात एक हजार ८२ सौरपंपांना मंजुरी देण्यात आली आहे. आतापर्यंत ५८० सौरपंपाचे वितरण झाले आहे.

शेतकऱ्यांना आता भारनियमनाची चिंता नाही. सौरपंपासाठी केंद्राचे ३० टक्के, राज्याचे पाच टक्के अनुदान आणि महावितरण ६० टक्के कर्जस्वरूपात उपलब्ध करून देते. लाभार्थ्याला पाच टक्के हिस्सा द्यावा लागतो. लाभार्थ्यांना ३ एचपी, ५ एचपी आणि ७.५ एचपी क्षमतेचे सौरऊर्जेवरील पंप देण्यात येत आहेत.

**– निलेश तायडे**
माहिती साहाय्यक, बुलडाणा

## बांबू प्रशिक्षण व संशोधन केंद्र

चीनमध्ये व भारताच्या ईशान्यपूर्व राज्यांमध्ये बांबूवर आधारित समांतर अर्थव्यवस्था तयार झाली आहे. महाराष्ट्रामध्ये चंद्रपूर व परिसरात बांबूचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या भागातसुद्धा सक्षम अशी पर्यायी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी बांबू संशोधनास प्रोत्साहन देणे व बांबू उद्योगास नवीन तंत्रज्ञानाची जोड देणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन, चंद्रपूर जिल्ह्यातील चिचपल्ली परिसरात बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राची सुरुवात झाली. चिचपल्ली येथे उभारण्यात येणाऱ्या जागतिक दर्जाच्या इमारतीच्या वास्तू उभारणीचा खर्च टाटा ट्रस्टतर्फे करण्यात येणार आहे. ही इमारत जपान आणि दुबई या ठिकाणी उभारण्यात आलेल्या बांबूपासून बनलेल्या इमारतीसारखी असेल. इमारतीचे आयुष्य अन्य सिमेंटपासून बनणाऱ्या इमारतीसारखेच राहणार आहे. या ठिकाणी बांबूच्या विविध जातींवर संशोधन होणार आहे. विशिष्ट पद्धतीच्या बांबूच्या जातीची लागवड केली जाणार आहे. या संशोधन केंद्रामध्ये २ वर्षाच्या अभ्यासक्रमाला नुकतीची मान्यता



मिळाली असून प्रवेशालादेखील सुरुवात झाली आहे. या अभ्यासक्रमाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना शोधून त्यांना प्रशिक्षित करण्यात येत आहे.

नुकताच बांबू प्रशिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रम सुरू झाल्याबद्दल, एका मोठ्या कार्यक्रमाचे चंद्रपूरमध्ये आयोजन करण्यात आले. या आयोजनामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील महिला बचत गटांना बांबूपासून विविध वस्तू बनवण्याच्या साहित्याचे वाटप करण्यात आले. या केंद्राने बांबूपासून पर्यावरणस्नेही सायकल बनवली. बांबूपासून बनवलेल्या विविध वस्तूंचा प्रचार, प्रसार मोठ्या प्रमाणात केला जातो. या ठिकाणी तयार करण्यात आलेला तिरंगा व अन्य भेटवस्तू मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रामध्ये लोकप्रिय झाल्या असून, बांबूपासूनच्या फर्निचरला अधिक मागणी आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी येथे तयार झालेल्या तिरंग्याचे कौतुक केले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात स्थापन होत असलेल्या या प्रशिक्षण व संशोधन केंद्रामुळे हा परिसर भारताच्या ईशान्यपूर्वेकडील राज्याला जोडला जाणार आहे. सामान्य माणसाच्या आयुष्यात सुबत्ता आणणारा प्रकल्प म्हणून याकडे बघितले जाते. वर्षभरात हा प्रकल्प पूर्ण होणार असून, या माध्यमातून या भागाच्या आर्थिक प्रगतीला हातभार लागणार आहे.

**– प्रवीण टाके**
जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर

## बॅरेजेसचे शेतीला वरदान!

वाशिम हा पश्चिम विदर्भातील तापी आणि गोदावरी खोऱ्याच्या दुभाजकावर असलेला जिल्हा. त्यामुळे नदीवर मोठा सिंचन प्रकल्प उभारणे अशक्य. यावर उपाय म्हणून जून २०१६ मध्ये पैनगंगा नदीवर ११ बॅरेजेसची उभारणी करण्यात आली.

बॅरेजमुळे सिंचन अनुशेष दूर करण्यास मदत होणार आहे. अडवल्या जाणाऱ्या पाण्याचा लाभ लगतच्या हिंगोली जिल्ह्यालाही होणार आहे. त्यामुळे राज्य शासनाने ११ बॅरेजेसला वाढीव निधी दिला. जून २०१६ अखेर सर्व बॅरेजचे काम पूर्ण



झाले. पैनगंगा नदीपात्रात ३३ हजार २६२ सहस्त्र घनमीटर पाणी अडवले गेले. प्रकल्पामुळे वाशिम जिल्ह्यातील ५ हजार ५५४ हेक्टर आणि हिंगोली जिल्ह्यातील २



## अभ्यासिकांचे जाळे

चंद्रपूर शहरातच नव्हे तर तालुका व इतर भागात आता गरीब, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी सार्वजनिकरीत्या अभ्यासाची सोय केली जात आहे. यासाठी शहरातील खुल्या जागा व महापुरुषांच्या नावाने असलेल्या स्मारकांचा वापर करण्यात येत आहे. या स्मारकांच्या ठिकाणांवरून जिल्ह्यातील महापुरुषांची ओळख व्हावी व स्पर्धा व अन्य परीक्षांमध्ये चंद्रपूरचा टक्का वाढावा, असे नियोजन करण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सध्या ४ अभ्यासिका सुरू आहेत. ९ फेब्रुवारी २०१७ रोजी चंद्रपुरातील मोक्याच्या ठिकाणी स्व. बाबा आमटे अभ्यासिकेची सुरुवात झाली. या ठिकाणी विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी स्पर्धा परीक्षांची पुस्तके महानगरपालिकेने उपलब्ध करून दिली. त्यांची उत्तम बैठक व्यवस्था करण्यात आली. संगणकाची उपलब्धता करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रतिसादामुळे ही भव्य वास्तू छोटी भासायला लागली आहे. या ठिकाणच्या विद्यार्थ्यांच्या प्रतिसादानंतर मूल येथे मा.सा. कन्नमवार सभागृहाच्या बाजूला असणाऱ्या जागेवर पुन्हा एक अभ्यासिका निर्माण करण्यात आली असून, मूल व परिसरातील हुशार होतकरु विद्यार्थी या ठिकाणी अभ्यासाला येतात. या ठिकाणीदेखील स्पर्धा परीक्षेचे आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले गेले आहे. यासोबतच बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या नावाने बाबूपेठ येथे उभारण्यात आलेल्या स्मारकातील एका भागात अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे.

**(जिल्हा माहिती कार्यालय, चंद्रपूर)**

हजार १३६ हेक्टर असे एकूण ७ हजार ६९० हेक्टर क्षेत्राला सिंचनाची सुविधा निर्माण झाली आहे.

**– तानाजी घोलप**
माहिती सहाय्यक, वाशिम

## नव्या वळणावर जलयुक्त शिवार

गडचिरोली जिल्ह्यातील वन विभागाने वनतळ्यांची निर्मिती केली आहे. यामुळे जंगली जनावरांना भेडसावणारे पाण्याचे दुर्भिक्ष कमी झाले. परिणामी लोकवस्तीत येणाऱ्या श्वापदांचे प्रमाण कमी झाले. असे ९ वनतलाव आणि ३ वनतळी बांधण्यात आली आहेत.

२०१५-१६ मध्ये जलयुक्त शिवारांतर्गत झालेल्या कामांमुळे १५२ गावांमध्ये सूक्ष्म सिंचनाची व्यवस्था निर्माण झालीच पण त्याबरोबरीने भूजल पातळी वाढली आहे. याला लाभलेला प्रतिसाद बघून २०१६-१७ मध्ये १६९ गावांची निवड करण्यात आली. यात ४५९२ कामे प्रस्तावित करण्यात आली. त्यातील २०१० कामे पूर्णत्वास



गेली आहेत. याच वर्षासाठी जिल्हा परिषदेमार्फत मनरेगांतर्गत ५३६ कामे प्रस्तावित करण्यात आली. यापैकी ४६३ कामे पूर्ण झाली. वन विभागाची ७१४ कामे प्रस्तावित असून यातील ६८५ कामे पूर्ण झाली आहेत. या कालावधीत एकूण ४५९२ कामे प्रस्तावित करण्यात आली. त्यापैकी ३७०८ कामे सुरू झाली. पूर्ण झालेल्या कामांची संख्या ३११४ आहे.

पाणलोट विकासामध्ये 'माथा ते पायथा' सर्वच ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीचे बांध-बंदिस्ती करावी लागते. यातून पाणी कसे व किती अडवणे शक्य आहे, याचा गावकऱ्यांनी अभ्यास करणे गरजेचे असते. गावाच्या पाण्याचे अंदाजपत्रक तयार करावे लागते. ज्यात पेयजल, जनावरांना लागणारे पाणी तसेच सिंचनासाठी असणारी पाण्याची गरज या सर्वांचा समावेश असतो. अशा पद्धतीचे प्रशिक्षण १११ गावांमध्ये देण्यात आले. त्यानंतर शिवारफेरीच्या माध्यमातून साधने आणि साध्य यांची सांगड घालत आता जलयुक्त शिवार नव्या वळणावर पोहोचले आहे.

**– प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती कार्यालय, गडचिरोली

## सौर चरख्यातून सूतनिर्मिती

गेल्या दोन वर्षांपासून जिल्ह्यात १३ गावातील बचतगटांच्या १३० महिलांद्वारे सोलर चरख्याद्वारे सूत आणि कापड निर्मिती होत आहे. जिल्ह्यात सौर चरख्यापासून तयार होणारी चादर, टॉवेल, शर्ट, पँट, जॉकेट आदी उत्पादने पुणे येथील यशदा, तसेच अनेक पंचतारांकित हॉटेल्समध्ये वापरली जात आहेत.

महिलांना या व्यवसायातून स्वावलंबी होता यावे, या हेतूने ग्रामोद्योग विभागाने बचतगटांना प्रोत्साहन दिले. आता या

बचतगटांना कापूस ते कापड निर्मितीसाठी आवश्यक यंत्रणाही पुरवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, अधिक उत्पादनासाठी तयार धागे पुरवण्याचीही योजना आखण्यात येत आहे. कृत्रिम धाग्यापासून बनवलेले कापड वापरण्यापेक्षा खादी कपडे वापरण्यावर भर द्यावा, यासाठी शासनाने शासकीय कार्यालयात खादी वापराविषयी परिपत्रक काढले आहे. सोलर चरख्याप्रमाणेच शासनाकडून सोलर लूम वाटप करण्याबाबतही विचार होत आहे.



**– हर्षवर्धन पवार**
जिल्हा माहिती अधिकारी, अमरावती

## रुरल मॉल

वर्धा येथे रुरल मॉल सुरू करण्यात आला आहे. महिला बचत गट, शेतकरी बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यामार्फत तयार करण्यात आलेली उत्पादने आणि प्रक्रिया केलेल्या कृषी उत्पादनांना यामुळे बाजारपेठ मिळाली आहे. शुद्ध आणि दर्जेदार उत्पादनांची इथे रेलचेल आहे. आदिवासींनी बांबूपासून तयार केलेली अप्रतिम सुंदर 'शो पीस' इथे, ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

वर्धा शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या मुख्य रेल्वे स्थानकापुढील पुरवठा विभागाच्या ६ हजार चौरस फुटाच्या बंद जागेवर हा 'रुरल मॉल' तयार झालाय.

या मॉलमुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत आहे. शेतकरी ते ग्राहक अशा थेट विक्रीतून दरांमधील तफावत कमी झाल्याने ग्राहकांना फायदा होत आहे.

**– मनीषा सावळे**
जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा

**महाराष्ट्र नररत्नांची खाण आहे. तशी ती उत्तम खनिज संपत्तीची भूमी आहे. प्रादेशिकदृष्ट्या राज्यातील विदर्भ भागात वनांचे क्षेत्र अधिक आहे. या जंगलाच्या पट्ट्यात जमिनीखाली दडली आहे ती बहुमोल खनिज संपत्ती. या भूमीच्या कुशीत. उत्तम दर्जाचा कोळसा, चुनखडी आणि मँगनीजचे मुबलक साठे तर आहेतच मात्र उद्योगजगताच्या मागणीनुरूप लागणारी इतर अनेक खनिजे मोठ्या प्रमाणात आढळतात.**

# खनिज संपत्तीची श्रीमंती...

**आशिष अंबाडे**

विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, गोंदिया, भंडारा, नागपूर आणि अमरावती या जिल्ह्यात प्रमुख खनिजांचे भांडार आहे. राज्याच्या एकूण खनिज उत्खननाचा सर्वाधिक म्हणजे २९ टक्के वाटा हा एकट्या चंद्रपूर जिल्ह्याचा आहे हे विशेष. प्रमुख खनिज समजल्या जाणाऱ्या कोळशाच्या, विदर्भात सुमारे ५० खाणी आहेत. यातील सर्वाधिक खाणी चंद्रपूर जिल्ह्यात आहेत. त्याखालोखाल यवतमाळ, नागपूर जिल्ह्यात कोळशाचे उत्खनन केले जाते. यासाठी केंद्र सरकारच्या कोल इंडिया लिमिटेड या सरकारी उपक्रमाला बहुतांश परवानग्या देण्यात आल्या आहेत. काही कोळसा खाणी या खासगी कंपन्यांनादेखील वितरित केल्या गेल्या आहेत. देशाची ऊर्जेची गरज, सहज उपलब्ध होणारा हा कोळसा वापरून; औष्णिक वीज निर्मिती केंद्रात केली जात असल्याने कोळसा उत्खनन उद्योगाने मोठी रोजगार निर्मिती केली आहे. कोळसा हा प्रमुख घटक वापरून, विदर्भात राज्य सरकार आणि खासगी असे मिळून किमान १० ऊर्जा निर्मिती प्रकल्प देशाच्या ऊर्जानिर्मितीत भर घालत आहेत. इथला कोळसा शास्त्रीय मानांकात क्र. तीन व चार दर्जाचा समजला जातो.

### औद्योगिक जगतात भरारी

चुनखडी या महत्त्वाच्या खनिजाने विदर्भाला औद्योगिक जगतात भरारी घेण्यासाठी हातभार लावला आहे. चुनखडीचेदेखील सर्वाधिक साठे चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती आणि माणिकगड टेकड्यांवर असून सिमेंट निर्मितीचा प्रमुख घटक असलेल्या चुनखडीने विदर्भात सिमेंट निर्मिती उद्योगासाठी भरभरून मदत केली आहे. नागपूर जिल्ह्यात व लगतच्या भंडारा जिल्ह्यातही मँगनीज खाणीतून त्याचे उत्खनन केले जाते. देशातील कित्येक महत्त्वाच्या उद्योगात पातळ टिनाचे कॅन्स बनवण्याच्या प्रक्रियेत मँगनीज एक मुख्य घटक आहे. त्यायोगे आधुनिक जीवनशैलीचा भाग असलेल्या बहुतांश फ्रोजन फूड अथवा खाद्यान्न डबाबंद करण्यासाठी हे खनिज मोलाचे योगदान देत आहे.

### वेगळी वाट

विदर्भातील खनिज संपत्तीच्या संपन्नतेत वेगळी वाट चोखाळली गेली ती नागपूर आणि अमरावती या जिल्ह्यात असणाऱ्या क्ले अर्थात सिलिका खनिजाच्या उत्खननाने. सिमेंट निर्मिती उद्योगात वापरला जाणारा हा घटक आर्थिक उलाढालीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला आहे. चंद्रपूर, गडचिरोली आणि भंडारा या ३ जिल्ह्यात भूगर्भात दडलेले लोहखनिजाचे भांडार म्हणजे, देशाच्या सर्वांगीण प्रगतीची गुरुकिल्ली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम एटापल्ली तालुक्यातील सुरजागड टेकड्या उच्चतम गुणवत्तेच्या लोहखनिजासाठी ओळखल्या जातात. गडचिरोली जिल्ह्यातील हा साठा १७८ मिलियन टन एवढा अवाढव्य असल्याचे आकडे सांगतात. सध्या या भागात अनंत अडचणी दूर सारून लोहखनिज

उत्खननास प्रारंभ झाला आहे.

## अमाप संधी

कच्चे लोखंड आणि त्यावर केली जाणारी प्रक्रिया आणि अंतिम लोखंड अथवा पोलाद-स्टील निर्मितीसाठी विदर्भातील खनिज वापरले जात आहे. यासाठी विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यात स्पाँज आयर्न प्रकल्पांची उभारणी केली गेली आहे. विमान निर्मिती क्षेत्रात मुबलकतेने वापरला जाणारा टंगस्टन घटक नागपूर जिल्ह्याच्या जमिनीत आढळला आहे. योग्य नियोजन केल्यास देशाला सध्या आयात करावे लागणारे हे खनिज परकीय गंगाजळी खर्च न करता देशाच्या उद्योगासाठी उपयुक्त ठरू शकते. गोंदिया जिल्ह्यात आढळलेले व्हॅनेडिअम हे खनिजही याच प्रकारात मोडते. कुठल्याही स्टील निर्मिती उद्योगासाठी आवश्यक असणारे हे खनिज क्षेत्राचे भाग्य बदलवू शकते. याशिवाय भंडारा जिल्ह्यात भूगर्भात असणारे कायनाईट अथवा सिलिमनाईट काच निर्मितीच्या कामी येते. भंडारा आणि चंद्रपूर या जिल्ह्यात असलेले पायरोफायलाईट हे खनिज प्लास्टिक उत्पादन, फेस पावडर आदी उत्पादनात महत्त्वाचा घटक आहे.

## बहुमूल्य योगदान

चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात बराईट नामक खजिनांचे साठे देखील आढळले आहेत. कागद, रबर आणि क्ष-किरण फिल्म्स निर्मितीसाठी या घटकाचे बहुमूल्य योगदान आहे.

वीजतारा कॉपरपासून निर्मिलेल्या असतात. चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्यात भूगर्भात असलेले कॉपरचे साठे भविष्यातील औद्योगिक संपन्नतेचे प्रतीक असणार आहे. नागपूर, भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्याच्या भूगर्भात असणारे क्रोमाईट बड्या उद्योगांच्या उष्णतारोधी उपकरणात आवश्यक घटक आहे. तर रसायन उद्योगाचा कणा असलेले डोलोमाईट नागपूर, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्ह्यात मुबलकतेने आढळते.

भंडारा जिल्ह्यात आढळून येणारे क्वार्टझ हे खनिज स्टील निर्मिती उद्योगासाठी पायाभूत घटक आहे. याच खनिजाचे साठे गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्यातही आढळतात. नागपूर जिल्ह्यातील भूगर्भात असणारे रंगीत ग्रॅनाईट असाच एक अमूल्य ठेवा आहे. ग्रॅनाईट हा शास्त्रीय परिभाषेत दगड असला तरी हा वैशिष्ट्यपूर्ण दगड असल्याने त्याचा समावेश खनिज प्रकारात होतो. यात रंगीत आणि काळा ग्रॅनाईट असे २ भेद केले जातात. यातील रंगीत ग्रॅनाईटला बांधकाम व्यवसायात मोठी मागणी आहे. विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यात काळा ग्रॅनाईट तर नागपूर, गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्यात रंगीत ग्रॅनाईटचे साठे आहेत. याचे उत्खनन विदर्भाचे नवे आकर्षण ठरू शकते. भूगर्भ सर्वेक्षण यंत्रणांनी केलेल्या सर्वेक्षणात नागपूर जिल्ह्यातील कुही -भिवापूर भागात सोन्याचे साठे असल्याचे ज्ञात आहे. याचा उत्खनन खर्च आणि प्रत्यक्ष साठे याचे गणित कितपत फायदेशीर ठरते यावर बरेच काही अवलंबून आहे.

## स्वयंपूर्णता

केंद्र सरकारने देशातील खनिज संपत्तीची इत्थंभूत माहिती घेण्यासाठी काही महिन्यांपूर्वी एका व्यापक सर्वेक्षण अभियानाची सुरुवात केली आहे. त्याचा पथदर्शी प्रकल्प नागपुरातून सुरू झाला आहे. तांत्रिकदृष्ट्या प्रगत मापदंडाचा वापर करत खास विमानाद्वारे मध्य भारतातील खनिजसाठ्यांचा बारकाईने मागोवा घेतला जात आहे. याचे निष्कर्ष पुढे आल्यावर साठ्यांच्या एकूण अचूकतेबाबत हेलिकॉप्टर तंत्रज्ञानाचा वापर करत, उत्खननाचे गणित स्पष्ट होणार आहे. विदर्भातील जमीन सुपीक आहेच मात्र इथल्या भूगर्भात असलेल्या खनिज संपत्तीमुळे विदर्भभूमी संपन्न ठरली आहे. देशाच्या ऊर्जा आणि उद्योग क्षेत्राची स्वयंपूर्णता विदर्भातील खनिज संपत्तीमुळे आकाराला येत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या ग्रामगीतेत श्रमसंपत्ती या अध्यायात स्वयंपूर्णतेचे मोठे मनोहारी वर्णन करतात.

***उद्योगे यंत्रेही निर्मावी***
***परदेशा भीक न मागावी***
***आपणचि करोनी भोगावी***
***वैभवे सारी.....***

ही ओवी खनिज संपत्तीच्या स्वयंपूर्णतेबाबत निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणारी आहे.

**प्रतिनिधी, झी मीडिया, चंद्रपूर-गडचिरोली**






**नागपूरचे हिवाळी अधिवेशन वैशिष्ट्यपूर्ण असते. अधिवेशनाच्या कामकाजाशिवाय नागपूर हे अनेक घटना, घडामोडींचे केंद्र ठरत आले आहे. हुर्डा पार्टी, हे या काळातील खास वैशिष्ट्य. येथे राजकीय उलथापालथही बरेचदा घडत असतात. या अधिवेशनाचे पूर्वीचे स्वरूप कौटुंबिक असे असायचे. हे अधिवेशन मोर्च्यांशिवाय अपूर्ण समजले पाहिजे. प्रत्येक अधिवेशनात एक तरी मोठा मोर्चा निघालेलाच असतो.**

**सुधीर पाठक**



# रम्य आठवणी

महाराष्ट्र विधिमंडळाचे नागपूरला होणारे अधिवेशन याला प्रारंभापासूनच हुरडा पार्टीचे अधिवेशन संबोधिले जात असते. जेव्हा संकरित बियाणे आले नव्हते, तेव्हा नागपूर परिसरात ज्वारीचे उत्पादन घेतले जात होते. या ज्वारी उत्पादनातच वाणीचा हुरडा लावला जायचा. नोव्हेंबर-डिसेंबरात हा हुरडा तयार झालेला असायचा. ज्वारीची कोवळी कणसे शेकोटीवर भाजून व नंतर दगडाने त्यातील दाणे काढले जात व फक्के मारत हा गुळचट हुरडा खाल्ला जायचा. सोबत वांग्याचे भरित व कवडेदार दहीही दिले जायचे. हे दही देखील कणसाच्या कुच्यांनी खाल्ले जायचे. हुरडा पार्टी असली की सबकुछ हुरडाच राहत असे. हुरड्याचे वडे, गोड शिरा वगैरे प्रकारही तयार होत असत. या हुरड्याचे वैशिष्ट्य असे की, तो कधी प्लेटमधून वगैरे दिला जात नसे.

वर्तमानपत्रावर तो टाकला जाई व फक्के मारत तो खावा लागे. त्यात हात व तोंडही काळं होत असे. पण त्याची गंमत काही औरच राहत असे. संध्याकाळी अधिवेशन संपल्यावर आणि शनिवार, रविवारी विधिमंडळाला सुटी असताना, या पार्ट्या रंगत असत. या भागातील सधन शेतकरीच वाणीचा हुरडा घेत असत. बॅ. शेषराव वानखेडे यांच्या कोहळी, मेटपांजरा, सुसुंद्री या गावातील शेतांवर या पार्ट्या रंगत असत. याचा आस्वाद फक्त सत्ताधारीच घेत असत असे नाही, तर विरोधकांनाही त्याचे आमंत्रण राहत असे. सभागृहात परस्परांवर तुटून पडणारे आमदार पक्षभेद विसरून यात रंगून जात. हास्यविनोदात या पार्ट्या रंगत आणि त्याच्या साक्षीला पत्रकारही असत. आता त्या पार्ट्या हा फक्त इतिहास राहिला आहे. वाणीच्या हुरड्याची जागा आता हायब्रीड ज्वारीने घेतली आहे. त्यामुळे वाणीचा हुरडा हा लोप पावत चाललेला खाद्यप्रकार झाला आहे.

## वैदर्भीय दिलदारी

वैदर्भीय मातीत एक आगळीवेगळी दिलदारी आहे. कापूस एकाधिकाराच्या प्रश्नावरच, एका मंत्र्याला त्याच्या विधानभवनातील दालनात सर्व विरोधकांनी अधिवेशनानंतर घेराव घातला होता. संध्याकाळी ६ वाजता सुरू झालेला हा घेराव रात्री १ वाजेपावेतो सुरू होता. त्या मंत्र्यांना मधुमेह आहे. त्यांना काही वेळाने, विशेषत: रात्री जेवणे जरुरी आहे, हे लक्षात घेऊन घेराव घालणाऱ्या विरोधकांनीच मंत्र्यांना त्यांच्या दालनात भोजनाची व्यवस्था केली होती. त्या घेरावाची परिणती रात्री १ वाजता सहभोजनाने, त्याच दालनात झालेली या विधिमंडळाने अनुभवली आहे.

नागपूरच्या विधानभवनाचे पूर्वीचे रूप हे कौटुंबिक, एक पारिवारिक असे होते. विधानपरिषदेचे दालन एवढे लहान होते की, माध्यम प्रतिनिधीही त्याच सभागृहात बसत असत. त्यामुळे सत्ताधारी व विरोधकांमध्ये काही कागदपत्रांची देवाणघेवाण पत्रकारांमार्फत चालत असे. विशेषत: रा. सू. गवई सभापती असताना, परिषदेत त्यांच्या पानाचा डबा-

सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांकडे वा त्याउलट विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांकडे जाताना प्रसिद्धी माध्यमांमार्फत जात असे. या देवाणघेवाण मार्गातील करवसुली पत्रकारही, त्या डब्यातील पानांचा, सुपारीचा आस्वाद घेऊन करीत असत.

पत्रकार व आमदार यांचेही संबंध परस्परसौहार्दाचे राहत असत. पण त्याचा अर्थ दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात टीका करताना पत्रकार मागेपुढे बघत असत, असे नाही.

जुन्या विधानभवनात आज जिथे विधान परिषदेचे सभागृह आहे, तिथे विधानसभेचे कामकाज चालत असे. त्यातील पत्रकार दालनात खूप कमी जागा राहत असे. पत्रकार नेहमीच काळजी घेत की, आपली कागदपत्रे वा अहवाल वगैरे खाली पडू नये. पण एकदा तरुण भारतचे ज्येष्ठ पत्रकार यशवंतराव शास्त्री यांच्या आसनाजवळील पुस्तकांना-कागदांना कुणाचा तरी धक्का लागला आणि अहवाल, पुस्तके तर धाडकन खाली कोसळली. पण कागद मात्र छान तरंगत तरंगत खाली येत होते. पुस्तक खाली पडताच सर्व पत्रकार गॅलरीकडे बघू लागले. यशवंतराव शास्त्री यांनी प्रसंगावधान दाखवीत, अध्यक्षांकडे बघत आपले दोन्ही हात जोडले व जणू क्षमायाचना केली. अध्यक्षांच्या आसनावर तेव्हा विधानसभा अध्यक्ष सयाजीराव सिलम होते. सयाजीरावांनी हातानेच अभय दिले व आपल्या ध्वनिक्षेपकातून घोषणा केली की, ''आता सभागृहात काहीही झालेले नाही. घडलेले नाही. कुठलेही पुस्तक खाली आले नाही की कागद तरंगले नाहीत. मी ते बघितले नाही''. आणि एक हक्कभंग मुळातच जिरला.

## पत्रकारांचे प्रयास

जशी सयाजीराव सिलम यांच्या रूपाने अध्यक्षांची दिलदारी या विधानभवनाने बघितली, तशीच अध्यक्षांच्या निर्णयावर मात करीत बातम्या प्रसिद्ध करण्याचे पत्रकारांचे प्रयासही बघितले आहेत. छगन भुजबळ तेव्हा शिवसेनेचे एकमेव आमदार विधानसभेत होते. त्यांना भूखंडाच्या श्रीखंडाकडे लक्ष वेधायचे होते. ते काही बोलले असते तर अध्यक्ष ते कामकाजातून काढून टाकू शकले असते. त्यामुळे सभागृहात येताच आपल्या आसनापुढे भुजबळांनी एक बॅनर लावला. त्यावर एकच वाक्य होते, ''भूखंडाचे श्रीखंड कुणी खाल्ले?''. सभागृह सुरू होताच अध्यक्षांनी ते बॅनर काढण्याची आज्ञा केली. भुजबळ फक्त हात जोडून मिस्कीलपणे हसत उभे होते. त्यांनी ना बॅनर काढले वा ना एकही शब्द उच्चारला. त्यामुळे अध्यक्षांना सभागृहाच्या कामकाजांतून काहीही काढता आले नाही. काही वेळाने मार्शलने येऊन तो बॅनरही काढला. पण ''भूखंडाचे श्रीखंड कुणी खाल्ले?'' या शीर्षकासह ती बातमी सर्वच वृत्तपत्रांत दुसऱ्या दिवशी झळकली.

याच सभागृहाने विधानसभेत छगन भुजबळ यांनी केलेले पक्षांतर बघितले. छगन भुजबळ यांच्यासह सेनेतील काही आमदारांनी पक्षांतर केले. सुरुवातीला ती संख्या जास्ती होती. नंतर त्या पक्षातील काही जणांनी सेनेत परत जाण्याचा निर्णय घेतला. हे पक्षांतर व त्या संदर्भात विधानसभा अध्यक्ष मधुकरराव चौधरी यांनी दिलेला निर्णय खूप गाजला होता. आजही तो निर्णय प्रत्येक पक्षांतराच्या वेळी आदर्श मानला जातो. छगन भुजबळ यांच्या पक्षांतरामुळे सेनेतील नेते मनोहर जोशी यांचे विरोधी पक्षनेतेपद गेले व त्या जागी भाजपाचे गोपीनाथ मुंडे यांची निवड झाली.

पक्षांतर केल्यानंतर काही दिवस स्वत: छगन भुजबळही तणावात होते. काही दिवसांनी संपूर्ण पोलीस संरक्षणात भुजबळ सभागृहात आले होते. काँग्रेसी भुजबळांना पहिल्यांदा याच नागपूरच्या विधिमंडळाने बघितले.

## बदलाचे बीजारोपण

नागपूर विधिमंडळाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे अनेक मुख्यमंत्री बदलाचे बीजारोपण याच अधिवेशनात झालेले बघायला मिळाले. बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री असताना विधिमंडळ काँग्रेसची बैठक झाली होती. सामान्यत: अशा बैठकी विधानसभेचे कामकाज संपल्यावर होतात. त्याही दिवशी अधिवेशन संपल्यावर ही बैठक झाली. त्या बैठकीला



नागपूर अधिवेशन

जाण्यापूर्वी पत्रकारांशी बोलताना बाबासाहेब भोसले म्हणाले होते, ''आता बंडोबा थंडोबा झालेत''. आणि ते बैठकस्थळी पोचण्यापूर्वी त्यांचे वाक्य बैठकस्थळी पोचले होते. उणीपुरी ती बैठक १०-१५ मिनिटेही चालली नाही. मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले संपूर्णत: भेदरलेले व पायात चप्पलही न घालता त्या बैठकीतून जवळजवळ पळ काढतच खाली आले आणि कारमधून बसून निघून गेले. त्या बैठकीत आमदार बाबासाहेबांच्या अंगावर धावून गेले होते, असे सांगितले जाते. महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपूर अधिवेशनानंतर नेतृत्व बदल होणे, ही जणू परंपराच मधल्या काळात झाली होती.

शरद पवार (पुलोद शासन), बॅ. अ. र. अंतुले, त्यानंतर बॅ. बाबासाहेब भोसले,



**नागपूर अधिवेशनात हुर्डा पार्टी झालीच पाहिजे...**

सुधाकरराव नाईक यांना नागपूर अधिवेशनानंतरच आपले पद गमवावे लागले होते. तसेच विरोधी पक्षनेतेपदाचेही होत गेले. मृणाल गोरे, निहाल अहमद, गोपीनाथ मुंडे, दत्ता पाटील यांना या नागपूर अधिवेशन काळातच विरोधी पक्ष नेतेपद मिळाले. मनोहर जोशी यांना नागपुरातच आपले विरोधी पक्ष नेतेपद गमवावे लागले होते.

नागपूर अधिवेशन हा विनाकारण खर्च आहे, असे मधल्या काळात बोलले जायला लागले होते. पण ते खोटे होते. कर्मचारी, अधिकारी यांना भत्ते तेवढे जादा द्यावे लागतात. ज्या वेळी नागपूरचा अधिकारी अधिवेशन काळात मुंबईला जातो, त्या वेळी त्यालाही भत्ता द्यावाच लागतो. पण या भत्त्यापोटी, जो खर्च होतो, त्याच्या मोबदल्यात या परिसरातील नागरिकांना आपले म्हणणे, गाऱ्हाणे सरकारच्या कानावर टाकता येते, हा मोठा फायदा आहे.

## मागण्यांची परिपूर्तता

नागपूर अधिवेशन काळात निघणाऱ्या मोर्चांची संख्या मुंबई अधिवेशनापेक्षा किती तरी अधिक आहे. एकेका दिवशी ८-८, ९-९ मोर्चे नागपुरात निघतात. तसेच या अधिवेशन काळात पूर्वी आमदार निवास ते विधानभवन या मार्गावर धरणे देऊन धरणेकरी बसत असत. ती संख्याही थोडी थोडकी राहत नसे. एके वर्षी अंतुले यांनी, शरद पवार यांनी आणि आता आता देवेंद्र फडणवीस यांनी या धरण्यांना भेटी देऊन त्यांच्या मागण्यांची परिपूर्तता केली होती, हादेखील एक सुखद अनुभव होता. लोकशाहीत प्रश्न सुटतात की नाही हे महत्त्वाचे नाही, तर कुणीतरी आपले म्हणणे ऐकून घेतो आहे, हा सहानुभूतीचा भाव महत्त्वाचा असतो. हा भाव नागपूर अधिवेशनात निश्चितपणे मिळतो.



अधिवेशनातील कामकाज

## जनआक्रोश

नागपूर अधिवेशनाला आणखी एक रूप होते ते म्हणजे जनआक्रोशाचे. नागपूर शहर हे जुन्या मध्यप्रदेशाचे राजधानीचे शहर होते. त्यामुळे राजभवन, विधानमंडळ, आमदार निवास, रविभवन, सचिवालय हे या ठिकाणी आधीपासूनच होते. पण राज्य पुनर्रचना आयोगानंतर नागपूरचा हा दर्जा गेला. त्यामुळे नागपूर व विदर्भात १ मे हा महाराष्ट्र राज्य स्थापना दिवस व नागपूर अधिवेशनाचा पहिला दिवस हा 'काळा दिवस' म्हणूनही पाळला जात होता. यात विदर्भवादी संघटना आघाडीवर राहत. काँग्रेसचा त्याला विरोध होता. पण काँग्रेसमधील अनेकांचा त्याला छुपा पाठिंबा राहत असे. हा काळा दिवस मोर्चे, जाळपोळ, लाठीहल्ला, अश्रुधूर आणि शेवटी गोळीबाराने गाजत असे. साधारणत: या काळ्या दिवसाच्या आसपास ८-१० दिवस तरी त्याच्या झळा समाजाला, सत्ताधाऱ्यांना पोहोचत असत. नागपूर शहरातून रेल्वे मार्ग जातो. त्यामुळे नागपूरचे नैसर्गिकरीत्या (तसा हा शब्दप्रयोग बरोबर नाही. पण नैसर्गिक वाटावे इतक्या सहजतेने) पुलाच्या पलीकडील व पुलाच्या अलीकडील हे भाग पडले आहेत. त्यातील पूर्व नागपुरात या आंदोलनाची धग फारच तीव्र राहत असे. पोलीस दल व सुरक्षा पथकांचा हा काळ परीक्षेचा राहत असे. लोकनायक बापूजी अणे, ब्रिजलाल बियाणी, नंतर जांबुवंतराव धोटे, राम हेडावू, नरेंद्र देवघरे, विश्वंभर घीवाले, हरिकिसन अग्रवाल, एन. एल. राव, बनवारीलाल पुरोहित (आजचे तामिळनाडूचे राज्यपाल), टी. जी. देशमुख, हरीश मानधना, कमलाप्रसाद दुबे, भाई भगवंतराव गायकवाड, सुरेंद्र भुयार, राजे विश्वेश्वर राव ही विदर्भवादी मंडळी फार आक्रमक राहत. त्या वेळी नागपूर महापालिकाही नाविस, खोरिप व जनसंघ यांच्या ताब्यात राहत असे. विदर्भ चळवळीतील अनेक जण नंतर काँग्रेसमध्ये गेले आणि चळवळ बघता बघता क्षीण झाली. पण जवळ जवळ वीस-पंचेवीस वर्षे

तरी नागपूर विधिमंडळ अधिवेशनाचा पहिला दिवस आणि विदर्भ बंद हे समीकरण राहत होते. जनक्षोभ व्यक्त होण्याची ही शैली व त्यातील सातत्य हे नागपूर-विदर्भाचे वैशिष्ट्य राहिले. जांबुवंतराव धोटे यांचा कार्यकाळ अफलातून होता. तो या आंदोलनाचा सुवर्णकाळ होता, असे म्हटले तर वावगे होणार नाही. दोन-तीन खासदार, १४ ते २० आमदार त्या काळात विदर्भ आंदोलनातील राहत असत.

जांबुवंतरावांबरोबर एक वलयच राहत असे. भाऊ एकटे चालायला लागले तरी बघता बघता बघता १००-१२५ लोक त्यांच्या मागे चालत राहत. एक मोर्चाच होत असे. 'व्वाऽऽरे शेर, आ गया शेर' या घोषणांनी जांबुवंतरावांचे स्वागत होत असे. त्यांनीच विणकर समाजाला जगण्यासाठी लढायला शिकवले. भाऊंच्या एका हाकेवर नागपूर बंद होत असे. इतवारी, लालगंज, मस्कासाथ हे भाऊंचे खास भाग होते. एकदा पोलिसांना, भाऊंना अटक करायची होती. जवळ जवळ ८ दिवस पोलीस व विणकर समाज यात जणू युद्ध सुरू होते. पोलिसांना अनेकदा आंदोलकांनी परत पाठविले. जांबुवंतरावांचे वैशिष्ट्य होते की, ते मागे राहून आंदोलन चालवीत नसत. तर संघर्षात ते आघाडीवर राहत. त्यामुळे जेवढा पोलिसी मार भाऊंनी खाल्ला, तेवढा क्वचितच कोणत्या नेत्याने खाल्ला असेल. फक्त जॉर्ज फर्नांडिस यांच्याशीच भाऊंची तुलना होऊ शकते. विणकरांच्या तिखट प्रतिकारामुळे पोलिसांना जेव्हा माघार घ्यावी लागत असे, तेव्हा पोलिसी अत्याचार भाऊंनाच सहन करावे लागत. पण ना कधी भाऊ त्या माराला दबले ना विणकर बंधू पोलिसी मार वा खटले यांना कधी दबले. आर्थिक स्थितीने पिचून गेलेल्या विणकर समाजाला भाऊ एक आधार होता. त्यामुळे विधानभवनावर गेलेल्या एका मोर्चाचे वेळी भाऊ सरळ कस्तुरचंद पार्क मैदानावरच अवतरले आणि त्यांनी त्या मैदानातील झाडावर चढून जमावाला संबोधित केले होते. सामान्यत: भाऊंचा मोर्चा पोलीस कॉटन मार्केट चौकात अडवीत असत. त्यामुळे जो काही समर प्रसंग अनुभवयाला मिळायचा तो कॉटन मार्केटमध्येच!

ज्या वेळी कापूस एकाधिकार योजना महाराष्ट्रात सुरू झाली, तेव्हा विदर्भातून त्याला मोठा विरोध होता. अशाच एका




विरोधाच्या आंदोलनात भाऊंनी शेतकऱ्यांच्या बंड्या (बैलगाडी) पार विधानभवनापाशी नेल्या होत्या. त्या वेळी विधानभवनाला आजच्या इतकी सुरक्षा व्यवस्था राहत नसे. रात्री चार-दोन पोलीस असत. तेही रात्री सुस्तावत. अशाच एका क्षणी पहाटे शेतकऱ्यांच्या बैलबंड्या विधानभवनाभोवती जमा करण्यात भाऊ यशस्वी झाले. बैलबंड्या एकात एक गुंतवून, त्यांची साखळी करण्यात आली. प्रत्येक बंडीजवळ बैल चारा खात बसवून ठेवण्यात आले होते. हा घेराव उठवता उठविता पोलिसांचे पार घामटे निघाले होते. विधानसभा सुरू होताना कशीबशी मुख्यमंत्री, मंत्री, आमदार यांच्यासाठी प्रवेशाला जागा निर्माण करण्यात आली. आता तर प्रचंड सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

**(माजी संपादक, दै. तरुण भारत, नागपूर)**



मोर्चाशिवाय अधिवेशन नाही..



**'एचआयव्ही' संसर्गाच्या प्रसाराला आळा घालण्याकरिता शासकीय आणि अशासकीय सर्व घटकांनी एकत्रितपणे मिळून अडीच दशकांपासून, गतिमान प्रयत्न केल्यामुळे 'एचआयव्ही' चा प्रादुर्भाव कमी करण्यात यश आले आहे. राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम सध्या चौथ्या (एनएसीपी-४) टप्प्यात आहे. अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचणे, त्यांना दर्जेदार सेवा पुरवणे, तपासणी करणे आणि उपचार घेणाऱ्यांचे प्रमाण वाढवणे, अशा उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात येत आहे.**

# सहजसाध्य मुक्ती

**डॉ. दीपक सावंत**
(मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग)

गेली दोन दशके शासकीय यंत्रणा तसेच स्वयंसेवी संस्थांनी सर्वोतोपरी प्रयत्न करून एचआयव्ही/एड्सचा प्रादुर्भाव कमी केला आहे. एचआयव्हीचा प्रादुर्भाव कमी झाला असला तरी समाजामध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना व जनजागृती करणे हे फार महत्त्वाचे आहे.

एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तीला एकदा एआरटी औषधोपचार सुरू केल्यावर आयुष्यभर ते दररोज नियमितपणे घ्यावे लागते. हे एआरटी औषधोपचार सरकारी रुग्णालयात मोफत देण्यात येते. एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींना जीवनाविषयी नेहमी सकारात्मक विचार करून, आरोग्यपूर्ण जीवनपद्धतीचा अवलंब करण्यासाठी एआरटी केंद्राची मदत होते. औषधासोबत नियमित व्यायाम, संतुलित व पौष्टिक आहार घेतल्यास रुग्ण दीर्घकाळ सर्वसामान्य जीवन जगू शकतात.

मे-२०१७ पासून ट्रिट-टू पॉलिसी (Treat -II Policy) याची अंमलबजावणी करण्यात आली. यामुळे सीडी-४ प्रमाणाची अट पूर्णपणे संपुष्टात आली. या ऐतिहासिक निर्णयामुळे आता एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींना मोफत एआरटी औषधोपचाराचा लाभ घेता येईल.

एचआयव्ही संसर्ग झाल्याचे निदान हे आयसीटीसी (ICTC) मध्ये रक्त तपासणी केल्यानंतर समजते. आयसीटीसी मध्ये रक्त तपासणीपूर्वी व्यक्तीला समुपदेशन करून एचआयव्हीची माहीती दिली जाते. रक्त तपासणीकरिता त्याची संमती घेतली जाते. समुपदेशन व इतर माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते. राज्यात एचआयव्हीविषयी माहिती व तपासणीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. सर्व शासकीय रुग्णालयामध्ये एचआयव्हीचे मोफत समुपदेशन व तपासणी करण्यात येते.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था अंतर्गत महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यांमध्ये (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) ५९५ स्वावलंबी एकात्मिक समुपदेशन व तपासणी केंद्रे (आयसीटीसी) कार्यरत आहेत. तसेच १,८११ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ६१ शहरी आरोग्य केंद्रे, ११६६ पी.पी.पी. केंद्रे, ६ मोबाइल आयसीटीसी कार्यरत आहेत. त्यामुळे राज्यातील ग्रामीण रुग्णालय स्तरापर्यंत समुपदेशनाची व एचआयव्ही तपासणीची सोय उपलब्ध झाली आहे. सद्य:स्थितीत राज्यात २,१६,२९१ एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींकरिता ७३ एआरटी केंद्रे आणि १६६ लिंक एआरटी केंद्राच्या माध्यमातून मोफत एआरटी औषधोपचार सेवा देण्यात येत आहे. यासोबत क्षयरोग व इतर आजारांसाठी संदर्भ सेवा, वैद्यकीय व्यवस्थापन, समुपदेशन या सेवादेखील देण्यात येत आहेत. एचआयव्ही/एड्सविषयी अधिक माहिती व मार्गदर्शन मिळावे या करिता टोल फ्री राष्ट्रीय एड्स हेल्पलाइन नं. १०९७ सुरू केली.




'जनता व स्वंयसेवी संस्थांनी सामाजिक बांधिलकीच्या नात्याने एचआयव्हीग्रस्त महिला व बालके यांना शैक्षणिक गरजा, आहार, संगोपन, नोकरी इत्यादी बाबतीत प्राधान्यक्रम द्यावे. त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सर्वतोपरी मदत करावी.'

**- डॉ. दीपक सावंत**

जिल्हा सामान्य रुग्णालयातील जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षामार्फत एक खिडकी योजनेतून गरजू रुग्णांचे अर्ज भरून ते शासकीय यंत्रणेमध्ये पूर्ततेसाठी सादर करून त्याचा पाठपुरावा केला जातो. राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम सेवांवर व दर्जांवर लोकांचा असलेला दृढ विश्वास हा कार्यक्रमाचा गाभा आहे. त्यामुळे महाराष्ट्र नेहमीच राष्ट्रीय स्तरावर प्रशंसेस पात्र ठरला आहे. महाराष्ट्राच्या उपक्रमाचे अनुकरण राष्ट्रीय पातळीवर होताना दिसत आहे.

एड्स नियंत्रण कार्यक्रम हा व्यक्तिगत उपक्रम नसून; ही एक सामाजिक चळवळ आहे. एचआयव्ही/एड्सचा प्रादुर्भाव कमी करून निर्मूलनाकडे वाटचाल करण्याकरिता समाजातील प्रत्येक घटकांचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे. त्याकरिता आपण सर्वांनी एकत्रित येऊन मोफत तपासणी आणि मोफत एआरटी औषधोपचार याविषयी जनमानसात जनजागृती करणे गरजेचे आहे. जागतिक एड्स दिनानिमित्त एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तीकरिता आणि एचआयव्ही संसर्गाचा प्रतिबंध करण्याकरिता कटिबद्ध होणे आवश्यक आहे.




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th December 2017
Date of Publication : 10th of every Month




प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह